# छात्र प्रबोधन

सौर चैत्र शके १९२३
वर्ष १ अंक ७




वासंतिक विशेषांक


ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक

# जेव्हा चेहरे बोलतात .....


सध्या क्रिकेटच्या सामन्यांचे वारे वाहात आहेत. प्रत्यक्ष मॅच पाहात असताना, प्रत्येक चेंडूबरोबर, प्रत्येक फटक्याबरोबर मॅच पाहायला बसलेल्यांच्या चेहेऱ्यावरचे भाव बदलत असतात. येथे चित्रकाराने चेहेऱ्यावरचे हे विविध भाव काही रेषा बदलून व्यक्त केले आहेत.



वा ! काय छान मॅच चाललीये. | छे:! साधा बॉल काय? अडवता येत नाही | रन आऊट?



काय एकेक खेळताहेत ! | आई गं! तेंडुलकर आऊट! | आता कसले जिंकतोय?



टेन्शन वाढतच चाललंय! | हॅ! हे म्हणे आपण जिंकणार | सगळ्यांना घरीच बसवलं पाहिजे

तुम्हीही असेच विविध भाव व्यक्त करणारे चेहरे काढायचा प्रयत्न करा आणि आमच्याकडे ते जरूर पाठवा.

# छात्र प्रबोधन

वर्ष १ अंक ७
सौर चैत्र शके १९२३

## वासंतिक कथा विशेषांक

### मनोवेधक कथांची मेजवानी

३. वेंधळा - आश्लेषा महाजन
११. अदृश्यतेचा शाप - अरुण हेबळेकर
१९. अखेर जिंकली - नीलिमा करमरकर
२५. लंगडा बायसन - उषा वाणी
३५. सूड - अनघा भट-बेहेरे
४१. पॉकेटमनी - अनघा लवळेकर
४८. जनरेशन गॅप - सुहासिनी देशपांडे
५४. त्याचा पहिलाच धनादेश - अविनाश दर्प
६२. प्रिय देवा - उमा बापट

*याशिवाय कृतीपर, माहितीपर, आदी मनोरंजक खजिना*

२. संवाद - महेन्द्र सेठिया
७. यंदाचा अर्थसंकल्प - डॉ. वसंत पटवर्धन
१०. कविता पानोपानी
वसंत उत्सव - बजरंग सरोदे
सृष्टीचे कलाधर - विद्या प्रभू
१७. डोळस भटकंती - डॉ.प्र.के.घाणेकर
२३. वाचलेच पाहिजे असे काही
निसर्गोत्सव- ले. दुर्गा भागवत - शैलजा देशमुख
२८. करून तर पाहा ! - मेधा सुदुंबरेकर
२९. क्रिकेटचे अनभिषिक्त सम्राट - डॉन ब्रॅडमन - सुहास यादव
३२. हसरे पान
३३. स्वच्छतेसाठी मधमाशा डोकेही वापरतात! - डॉ. पुरुषोत्तम जोशी
३४. काही नवं शिकूया ! - संगीता केळकर
३९. रोजच्या आचरणात 'स्वदेशी'
भारतीय खेळ- लेख ५ - विश्नाथ गुर्जर
४५. जीवन-मृत्यूचा संघर्ष - भाग्यश्री काकडे
५२. कविता पानोपानी-
कालचक्र - वि.म. कुलकर्णी
हे नव्हे चांदणे -शंकर रामाणी
५८. भूमितीतील सौंदर्य
५९. हस्तलिखित ध्वनिफित निर्मिती व कोलाज या स्पर्धांचे निकाल.
६२. हे तुम्हाला माहीत आहे का?
६४. छात्र प्रबोधनची उपक्रम केंद्रे.

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.,M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
श्री.दत्ता टोळ B.A.,B.Com.

**कार्यकारी संपादक**
वर्षा कुलकर्णी

**मुखपृष्ठ व आतील सजावट**
गिरीश सहस्रबुद्धे

**अक्षर जुळणी**
छात्र प्रबोधन, पुणे ३०

**संपर्क पत्ता - छात्र प्रबोधन,**
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ
पुणे ३० ☎(०२०) २४४७७६११,
फॅक्स : २४४९१८०६
E-mail : prabodhini@vsnl.com

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर ११ चैत्र शके १९२३
१ एप्रिल २००१

**वर्गणी**
वार्षिक : रु.१५०/- द्वैवार्षिक : रु.२७५/-
त्रैवार्षिक : रु.४००/- आजीवन : रु.२०००/-
या अंकाची किंमत : रु.२०/-

दिवाळी अंक रजिस्टरने हवाअसल्यास प्रतिवर्षी रु.३०/- जास्तीचे भरावेत.

चैत्रामधली चैत्रपालवी आशेला नव अनुभव दावी, झाले - गेले घडून जाई, नवीन वर्षी नव नवलाई.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे ! ... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

## संवाद

**प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,**

वार्षिक परीक्षा संपवून सुट्टीची मजा लुटायला एव्हाना तुम्ही सुरुवात केली असेल. तुमच्या आनंदात हा **'वासंतिक कथा विशेषांक'** नक्कीच भर घालेल, असा विश्वास वाटतो.

परीक्षा चालू असतानाच सुट्टीचे वेध लागायला सुरुवात होते. खूप गोष्टींची मनातल्या मनात यादी होते. परीक्षा संपल्यावर मात्र आता सुट्टीत काय करायचं, हा प्रश्न कायमच पडतो. पहिले पाच-सात दिवस काहीही नियोजन न करता अगदी मुक्तपणे घालवा; पण नंतर मात्र यादी करायला घ्या. यादीमध्ये भटकंती, मित्रांबरोबर खेळ, गप्पा, घरातील कामे, विविध प्रकारच्या शिबिरांमध्ये सहभागी होणे, काही साहसी मोहिमा करणे, विविध कला छंद जोपासणे, वाचन करणे, बाग फुलविणे, एखादा विक्री उपक्रम किंवा काम करून पैसे मिळविणे इ. या यादीतील सर्व गोष्टी याच सुट्टीत करता येतील असे नाही. काहींसाठी वेळ अपुरा पडेल तर काहींसाठी पैसे कमी पडतील. आपल्या मर्यादा लक्षात घेऊन यादीतील ४-५-७ गोष्टींची निवड करा अन् त्याचे तपशिलात नियोजन करून, त्यामध्ये मनापासून सहभागी व्हा ! सुट्टीतील २५ ते ३०% वेळ तरी तुम्ही नियोजनपूर्वक वापरायला हवा ! त्याचबरोबर ३० ते ४०% वेळ अनेक गोष्टी मुक्तपणे करण्यासाठी आवर्जून मोकळा ठेवा.

गेल्यावर्षीच्या उन्हाळी सुट्टीमध्ये आपण **'वाचकवीर व्हा'** असे आवाहन केले होते. त्यावेळी ४० जणांनी सुट्टीत एक हजार किंवा त्याहून अधिक पाने वाचून 'वाचकवीर' हा किताब मिळवला होता. या वर्षी १०० जण तरी वाचकवीर व्हायला हवेत ! तुम्ही त्यातले एक होणार ना ! त्यासाठी सुट्टीमध्ये चरित्रे, प्रवासवर्णने, कथा, कादंबऱ्या इ. विविध प्रकारच्या पुस्तकांची एक हजार एक पाने वाचा. (मासिक, दैनिक, कॉमिक्स नव्हे) ज्यांना या योजनेत सहभागी व्हायचे आहे त्यांनी पोस्टकार्डावर आपले नाव, संपूर्ण पत्ता, इयत्ता व शाळा कळवावी, तसेच वाचकवीर योजनेमध्ये सहभागी व्हायचे आहे असे लिहावे. या योजनेसंबंधी सविस्तर पत्रक व तुमच्या वयोगटामध्ये आवर्जून वाचावीत, अशी छान २५ पुस्तकांची यादी आम्ही तुम्हाला पाठवू. सर्व वाचकवीरांना छान छान पुस्तकेही नंतर भेट म्हणून मिळतील. मग पाठवताय ना पत्र !

या सुट्टीत अजून एक गोष्ट तुम्ही करावी असे मला वाटते. शक्यतो गटाने मिळून पण गट नसेल तर एकट्यानेसुद्धा हा उपक्रम करायला हरकत नाही. आपल्या गावाच्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी जाऊन (उदा. बस स्टँड, सरकारी दवाखाना, रेल्वे स्टेशन, बाग, इ.) ह्या ठिकाणी काय काय अडचणी, गैरसोयी जाणवतात, कोणत्या सुधारणा करता येतील, अडचणींवर कोणते उपाय योजता येतील, कोणकोणत्या नवीन सुविधा निर्माण करता येतील, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जा गाठण्यासाठी काय काय बदल तुम्हाला सुचतात, अशा प्रकारे विचार करून एक टिपण तयार करा. सर्वसामान्य माणसे, व्यवस्थेतील माणसे, अधिकारी इ. विविध व्यक्तींशी बोलून या टिपणांमध्ये भर घाला. ते नीट लिहून त्याची एक प्रत संबंधित व्यवस्थेच्या अधिकाऱ्यांना द्या. एक प्रत आमच्याकडे पाठवा. उत्कृष्ट टिपण केलेल्या सर्वांना अर्थातच छानसं बक्षीस मिळेल; शिवाय अनेक अनुभव तर मिळतीलच अन् सार्वजनिक व्यवस्थांबाबत नुसतेच तक्रारखोर होण्यापेक्षा विधायक विचार करण्याची सुरुवात तरी नक्कीच होईल. करून तर बघा ! सुट्टीत घेतलेले वैशिष्ट्यपूर्ण अनुभव अन् वर्षभरातील विविध आघाड्यांवर केलेली प्रगती, मिळविलेली बक्षिसे कळवायला विसरू नका !

बरंय तर मग ! अनुभव संपन्न सुट्टीसाठी खूप खूप शुभेच्छा !

सुट्टीतील काहीवेळ पत्र लिहायला राखून ठेवा बरं का!

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



**नवेपणाच्या आनंदाने नवतेजाने न्हाले। नव्या युगाचे नव्या दमाचे वर्ष नवे हे आले।।**

# वेंधळा

कथा विशेषांक

(विनोदी कथा)

“नमनाला घडाभर तेल असतं तुझं गणेश.”

डोळे वटारून आई म्हणाली. तोंडाने ‘चक्’ करत मी आपला निषेध नोंदवला. अभ्यासाला बसायचं म्हणजे सुरुवातीची दहा-पंधरा मिनिटं पेन्सिल शोधणं, त्याला टोक करणं इत्यादी हस्तकौशल्याच्या कामात वाया जातात. दरवेळी मी पेन्सिलीच्या टाळक्यात शार्पनरचा मुकुट फिरवला की आई ‘टेप’ केल्याप्रमाणे म्हणते. “नमनाला घडाभर तेल पुरे की गणूराया.”

माझ्या आख्ख्या म्हणजे ‘होल’ आयुष्यात अतिशय मनापासून मी एकच काम करतो. ते म्हणजे पेन्सिलीला टोक करणे. टोक करताना माझी अशी काही समाधी लागते की ज्याचं नाव ते. आमच्या वर्गातली ‘कोमा’ तर दरवेळी मलाच टोक करण्याचं काम सोपवते. (कोमा म्हणजे कोमल मालसुरे. मीच तिचं नव्याने बारसं केलं.) एकदा तर वर्गातल्या मोजून पंचवीस मुलांच्या पेन्सिलींना टोकं करून देण्याचा, घवघवीत विक्रमही मी केला होता. ‘एकमेकां साह्य करून’ मी ‘अवघा सुपंथ’ धरला, तरीही मला सरांच्या वाक्ताडनाला सामोरं जावं लागलं. कारण तो जीवशास्त्राच्या परीक्षेचा दिवस होता. परीक्षेत उत्तर लिहिण्याऐवजी मी पंचवीस पोरट्यांच्या पेन्सिलींची हजामत केली होती. त्यावेळी मी जेमतेम काठावर पास झालो.

जीवशास्त्रातल्या आकृत्यांनी जीव वाचवला. बाकी काहीही म्हणा, आकृत्या आणि चित्रकला ह्यातच माझं डोकं (नव्हे हात!) चालतं. माझा हा ‘कल’ जाणून न घेता आई नुसती ‘कलकल’ करत म्हणत असते,

‘नुसता चित्रं खरडत असतो.’

आई शप्पथ ! इतकं वाईट वाटतं ना मला ! आपल्या कलेची लेको कुणाला कदरच नाही. तंद्रीमध्ये मी पेन्सिल अर्धी खरवडली होती. विठोबाच्या पायावर, जशी फुलं वाहिलेली असतात तशी माझ्या पायावर पेन्सिलीच्या लाकडाची रंगीबेरंगी फुलं भक्तिभावानं (माझी मलाच वाहिली गेली. कमरेवर रुक्मिणीसारखे हात ठेवून संयतपणे आई हे सारे डोळे भरून पाहात होती.

चेहऱ्यावर उसनं प्रेम आणत आई म्हणाली,



“सगळी पेन्सिल आजच्या आजच ‘टोकरायची’ आहे का?” मी शरमून हातभर जीभ बाहेर काढली.

‘टोकरायची’ हे आईने बनवलेलं खास क्रियापद. माझ्या पेन्सिल टोकरण्याला टोकायचं काम करत आई म्हणाली, “आता करा की अभ्यासाला सुरुवात.”

भूगोलामधल्या टुंड्रा प्रदेशात उंडारायचं, रेनडिअरच्या स्लेज गाडीमधून भटकायचं आणि बर्फामधल्या ‘इग्लू’ स्वीट होममध्ये कुडकुडायचं, असं मी ठरवलं. त्याचवेळी आमच्या वर्गातल्या ‘गोचि’ने अमेरिकेच्या टोकाला ‘आलास्का’ ‘गेलास्का’ अशा कोट्या करून जे पीजे मारले, त्या आठवणीने मला खुदकन हसू आले. ते पाहून हात नाचवत डोळ्यांनीच आईने ‘काय झालं?’ म्हणून विचारले. हसत हसत मी म्हणालो,

“काही नाही गं आई, गोचिच्या पीजेच्या आठवणीनं...”

“आता ही कुठली गोची?” आईने विचारले.

“अगं, गोचि म्हणजे ‘गोपाळ चिकटे’ गं. त्याच्या नावाची आद्याक्षरे घेऊन मीच त्याला ‘गोचि म्हणण्याचा प्रघात पाडला.” मी शार्पनर साफ करत सांगितले.

“शी:! गोचि काय?” गोचिड



उंच माझा झोका गं, कल्पनेच्या फांदीला। दाही दिशा फिरूनी, येई मग भुईला।।
एकविसाव्या शतकात कोणतेही काम करताना विवेक व सजगता यांचे भान ठेवा. जगा व जगू द्या.

झटकल्याप्रमाणे आई म्हणाली.

आई जरा बऱ्या मूडमध्ये आली होती. तेव्हा संधी साधून मी तिच्याशी प्रेमळ वार्तालाप करायचं ठरवलं.

''मज्जा असते गं अशा नावांमध्ये. आता बघ. आमचे कंटक सर आहेत ना पी.टी.चे, त्यांचं नाव आहे, सदाशिव लक्ष्मण कंटक म्हणजे स.ल. कंटक. आता काटा टोचल्यावर त्याचा सल जाणवणारच. कंटक सर बऱ्याचदा कुचकेपणानं 'सलणारं' बोलतात; आणि ती गप्प गप्प राहणारी 'मुकी' नाही का, अगं, मुकी म्हणजे मुकुल किर्लोस्कर गं! तिला तर सरांसकट सगळी शाळाच 'मुकी मुकी' करून हाक मारतात. तिचं ही बारसं अस्मादिकांनीच केलं.'' मी छाती फुगवत म्हटलं.

''सगळ्यांची बारशी करतोस, पण तुझंही बारसं करणारा एखादा सवाई भेटेल बघ तुला !'' आई फणकारली. ''त्यापेक्षा अभ्यास कर अभ्यास. गेल्यावर्षीपेक्षा चार मार्कं जास्त पडले तर मी म्हसोबाला शेरभर पेढे वाहीन.''

झालं ! आईनं अगदी मर्मावरच आघात केला. एरवी इतकं प्रेमानं वागणारी माझी आई, अभ्यासाच्या वेळी का बरं 'दुर्गामातेचा' अवतार घेते, न कळे. हां ! तसा मी जन्मापासून मुलखाचा मठ्ठ ! उगाच नाही आई मला 'दगडू विटकरे' म्हणत ! हां ! तर काय करत होतो मी... भूगोलाचा अभ्यास – टुंड्रा प्रदेश !

टुंड्रानंतर मी काही आकृत्यांकडे वळलो. पुन्हा पेन्सिलीकडे लक्ष गेलं. मघाशीच तिला टोकारलं होतं. पण तिची मान मोडून ती कोलमडून पडली होती. हे असे कसे घडते? बहुदा आईचाच तिच्यावर पाय...

''मोडलं वाटतं टोक? छान! आता पुन्हा मान वाकडी करून टोक करत बस तिला. ती आख्खी पेन्सिल जेव्हा अदृश्य होईल तेव्हाच तुला समाधान वाटेल.'' आईने माझ्या हालचाली टिपत म्हटले. मी डाव्या बाहीने नाकाला मनसोक्त खाजवले आणि दोन्ही भुवया उंच आभाळाला (!) भिडवल्या. अखेर टोक झाले. ते ठीक झाले की नाही, हे मी दंडाला इंजेक्शनप्रमाणे टोचून पाहिले. टोचल्यावर आपला जीव कळवळला तरच टोक छान जमलं आहे, असा माझा अनुभव आहे. मग आईने किंवा सरांनी मला कितीही टोकलं तरी बेहत्तर !

अशाप्रकारे आदर्श टोक झाल्यावर मी काही आकृत्या रेखाटल्या. आईला त्या खूपच आवडल्या. म्हणाली,

''तुझ्या हाताला सफाईदारपणा आलाय चिमणू.''

हुश्श ! 'चिमणू' हा आईचा खास लाडाचा शब्द. अगदी ठेवणीतला शब्द. ती तो फारच काटकसरीने वापरते. ज्याअर्थी आई मला 'चिमणू' म्हणाली, त्याअर्थी दुर्गामातेकडून वात्सल्यसिंधू मातेमध्ये तिनं प्रवेश केला, हे माझ्यासारख्या जन्मजात मठ्ठालाही कळलं. मी माझी चोच (?) उघडून म्हटलं, ''रागावणार नाहीस ना,'' मी तिच्या प्रेमळ डोळ्यांचा अंदाज घेतला. ''अगं, आज माझी कंपासबॉक्स हरवली. दप्तरात नव्हतीच. कित्ती शोधली शाळेत...''

आई गोड हसली. हसरी आई मला फार आवडते. आईने नेहमी हसत राहावं, असं मला वाटतं. आई दुसऱ्या खोलीत गेली आणि हातात कंपासबॉक्स घेऊन हजर झाली.

''बाबांच्या पुस्तकांच्या कप्प्यात होती. रात्री त्यांनीच त्यांच्या कामासाठी घेतली होती. वेंधळेपणानं तिथंच विसरले आणि तुला मात्र...'' आईला पुढचं बोलवेना, सुचेना.

आमचे बाबा किनईऽऽऽ जाऊ दे. पण तेसुद्धा माझ्यासारखेच होते म्हणे लहानपणी. म्हणजे मी त्यांच्यासारखा आहे म्हणू हवं तर. गेल्या वर्षीपर्यंत मी रोज दोन पेन्सिली हरवत असे. संध्याकाळी अभ्यासाला बसावं तर पेन्सिल गायब ! पुन्हा दोन नव्या टोकदार पेन्सिली माझ्या दप्तरात विराजमान होत. दिवसाला दोन, आठवड्याला (रविवार सोडून) बारा अशाप्रकारे वर्षाला मला किती हजार पेन्सिली लागतील, याचं गणितही आईनं मांडलं होतं. पेन्सिलीबरोबरच शार्पनर आणि खोडरबर हीसुद्धा जणू काही हरवण्यासाठीच असतात, असा माझा समज होता. शाळा सुटल्यावर नीट दप्तर आवरून कधी मी वर्गाबाहेर पडलोच नाही. सदैव पायाला भिंगरी. त्यामुळे रोज काहीतरी विसरायचं किंवा हरवायचं. शिपाईबाई वर्ग झाडायला लागल्या की त्यांना मोठ्ठा खजिना सापडत असे. त्यांच्याकडे वशिला लावून काही पेन्सिली, रबरं आणि शार्पनर मी मिळवीत असे. पण



**जे जे असेल अज्ञात, घेता करुनिया ज्ञात। पाठीवरी मात्र हवा कुण्या प्रेमळाचा हात।।**

''शंका कसली? किमया असली, घडवू या हातांनी, सान वयातच स्वराज्य तोरण बांधियले शिवबांनी.''

आमच्या शाळेतील या शिपाईबाई म्हणजे तोफखाना ! त्यांच्याशी बोलायचं म्हणजे आधी शेरभर मीठ खावं लागायचं. त्यातच बाबांनी मला खोडरबर न हरवण्याच्या युक्त्या लिहून दिल्या होत्या त्या अशा –

१) खोडरबर स्वत:चे काही खुणेचं चिन्हं आखणे, नाव घालणे.

२) खोडरबराला भोक पाडून त्यात दोरा ओवणे.


३) खोडरबरला बारीक घुंगरं लावणे.

४) खोडरबरला चुंबक लावणे व ते कंपासबॉक्सला खेटून ठेवणे.

हे सर्व उपाय करूनही 'हरवल्याचा शोध' घेण्याचे प्रसंग माझ्यावर रोजच ओढवत होते. ह्याच चार युक्त्या शार्पनरसाठीही मी अंमलात आणल्या. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

माझ्या वस्तू हरवतात पण मला इतरांच्या हरवलेल्या वस्तू चुकूनसुद्धा सापडत नाही, हे एक महान आश्चर्य ! मी आपलं रबर हरवलं की म्हणतो, ''जाने दो ! रबर रबर पर लिखा है सोम्या-गोम्या का नाम!'' जाऊ दे झालं.

बाबांनी त्यांच्या लहानपणी मनगटाच्या घड्याळाला दोरा बांधून त्यात खोडरबर अडकवलं होतं म्हणे ! त्यांनी 'रेडीमेड' सांगितलेले सगळे उपाय मीही करून पाहिले. शर्टाच्या बटणाला दोरा लावून त्याला पेन्सिल बांधण्याचं धाडसही मी केलं होतं. काम होताच पेन्सिल लगेच खिशात ठेवणं सोयीचंही होतं. पण माझ्या त्या प्रांजळ प्रयत्नाला वर्गातल्या नतद्रष्ट



कारट्यांनी सुरुंग लावला. मी वर्गामध्ये दोरे बांधून कठपुतळ्या नाचवत आहे, असा फतवा वर्गशिक्षकांकडे गेला आणि मला माझ्या दोऱ्यांसकट 'रंगे हाथ' सरांनी पकडले. माझ्या गळ्याला त्यांनी तोच दोरा आवळायचा फक्त बाकी ठेवला होता. ह्या कारस्थानामध्ये वादा (म्हणजे वासू दामले) आणि फाटा (म्हणजे फाल्गुन टाकसाळे – हा शिपाई) ह्यांचाच हात होता. वर्गामध्ये मी शब्दश: नाही तर खरंच 'उघडा' पडलो. शर्टाला इकडून तिकडून बांधलेले दोरे सोडवताना मला चक्क शर्ट सर्वांदेखत काढावा लागला. त्या नुसत्या आठवणीने माझा थरकाप झाला आणि हाता-तोंडाशी आलेलं पेन्सिलीचं ताजं कोरं टोक तडकन् डोळ्यादेखत मोडलं. कट्ट्याजवळ पाठमोरी उभी असलेली आई करुण स्वरात म्हणाली, ''वेंकट, आता पुरे झाली झटापट त्या पेन्सिलीशी. आता आपला पाठांतराकडे वळ.''

'वेंकट' हे माझं पाळण्यातलं दुसरं नाव. खरं नाव गणेश. आई कानडी असल्याने तिनं एक नाव तिच्या पसंतीचं ठेवलं होतं. प्रेमात असली की कधीकधी, पण फारच क्वचित-ती मला 'वेंकट' म्हणत असे. माहेरच्या आठवणीनं व्याकूळ झाली की मग. 'वेंकट' चा ती जपच करायची. मला स्वत:ला मात्र 'वेंकट' नाव तितकंसं आवडत नसे.

मी माझं दप्तर नीट आवरलं. कंपासबॉक्स उघडून तपासून बघितली. दोनच्या जागी तीन पेन्सिली बाबांनी ठेवल्या होत्या. दोन रंगीत सुगंधित खोडरबरंही होती. एक पोपटाच्या तर दुसरे डायनॉसारच्या आकाराचे. बाबा स्वत: लहानपणी वेंधळे होते. म्हणून ते मला गुपचूप अशी सामग्री पुरवत होते तर! त्यांना नेहमी माझी दया येत असे. पेन्सिल हरवली, शार्पनर मोडलं आणि आई माझ्यावर तोंडसुख घ्यायला लागली की, बाबा मध्येच पडून म्हणायचे, 'जाऊ दे गं. नको रागावूस त्याला. थोडा मोठा झाला की सांभाळेल आपल्या वस्तू नीट.'

बाबा एरवी खूपच कठोर, रुक्ष आणि कोरडे असले तरी पेन्सिल खोडरबराच्या बाबतीत एकदम दिलदार-राजामाणूस ! त्याबाबतीत आपण बाबांवर बेहद्द फिदा ! वस्तू हरवणे, त्या व्यवस्थित न ठेवणे, त्या सापडत नाहीत म्हणून तणतण करणे, ह्या बाबतीत बाबा आणि मी एकसारखेच. अशावेळी आई 'गुन्हे अन्वेषण' विभागातल्या चाणाक्ष अधिकाऱ्याप्रमाणे क्षणात वस्तू शोधून देण्यात पटाईत. तिला 'रिसर्च



**आई आम्हा, बाबा आम्हा, मौज करु द्या काही ! रबर नाही, पेन्सिल नाही ! ऐट कधीही नाही !**

'सबसे बडी कला है मन को ईश्वर में लगाना।'

ऑफिसर' ही सन्माननीय पदवी बाबांनीच बहाल केली आहे.

कंपासबॉक्स तपासताना करकटक हातात आलं आणि सहज चाळा म्हणून मी ते हाताळू लागलो. कंपासबॉक्स मागे एक गुलाबाचं फूल कोरलं. मग नुकतंच मनात घोळणारं 'वेंकट' हे नावही गंमत म्हणून कोरलं. त्याच्यापुढे धनंजय लाड हे बाबाचं नावही तंद्रीत कोरून टाकलं. नंतर शार्पनर, खोडरबर, दप्तर सगळीकडे 'वेंकट' असं लिहित सुटलो. वेंकट नावाने जणू मी वेडापिसा झालो.

त्याच्या दुसऱ्याच दिवशी वर्गात एक नवीन मुलगी आली. बेंचवर मी एकटाच होतो. म्हणून ती माझ्याशेजारीच बसली. मोठी गोड मुलगी होती ती. पण ओळख नसल्याने एकदम बोललो नाही. मी तिच्या वहीत



डोकावून तिचं नाव पाहण्याचा प्रयत्न करू लागलो तर माझी कंपासबॉक्स घरंगळून खालीच पडली. आम्ही दोघंही एकदम खाली वाकलो तर आमची टक्करच झाली. मग मात्र तिनेच चपळाईने कंपासबॉक्स उचलून मला दिली. तेवढ्यात वर्गशिक्षक वाघमारेसर अवतीर्ण झाले. त्यांनी वर्गात त्या नव्या मुलीची ओळख करून दिली. तिचे नाव 'माधुरी उदर सरवटे.'

नंतर मधल्या सुट्टीत मी तिच्याशी गट्टी केली. तिच्यावर खूपच इंप्रेशन मारलं. ती भारी हसरी आणि मोकळी वाटली मला. हसत हसत मी तिला म्हटलं,

''मी तुला 'माउस' म्हणणार गं ! मा-ऊ-स म्हणजे माधुरी उदय सरवटे...'' आद्याक्षरांवर मी भरपूर जोर दिला आणि टाळीसाठी हात पुढे केला, पण टाळी न देता ती म्हणाली. ''मी तुला 'वेंधळा' म्हणणार रे ! वेंधळा - वें-ध-ळा म्हणजे वेंकट धनंजय लाड !'' आता मात्र तिनंच टाळीसाठी हात पुढं केला. मी तिला फुसकी टाळी दिली आणि मनात म्हणालो, शेरास चांगली सव्वाशेर भेटली की...

कंपासबॉक्सवर वेंकट नाव कोरल्याने एका क्षणात मी 'वें-ध-ळा' झालो...


●●●

**– आश्लेषा महाजन**
२३० चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर - १, पुणे - ९



**लहान असुनी, महान आम्ही ! भावी विश्वाचेही स्वामी ! मोठे झालो तरिहि मनाने निर्मळ राहू आम्ही !**
'सुने हुए को मनन करो, मनन करनेसे शक्तिशाली बनोगे।'

## विज्ञान प्रयोग – बाटलीतील कारंजे




**साहित्य :** २ बाटल्या झाकणासहित, मेण, स्क्रू, २ भोके पाडलेल्या स्ट्रॉ, रंगीत पाणी.

**कृती :** १) सुरुवातीस सर्व पाणी खालच्या बाटलीत असेल. बाटल्या उलट्या करा.

(वरची बाटली खाली, खालची बाटली वर)

२) आता बाटली क्र. १ मधील पाणी खालच्या बाटलीत येते व हवेची जागा घेते; तर हवा हलकी असल्याने वरच्या बाटलीत येते

३) स्ट्रॉला काही भोके पाडली आहेत. पाण्याचा दाब सगळीकडे सारखा असल्याने, काही पाणी/पाण्याचे थेंब, हवा वर येत असते त्या स्ट्रॉच्यामधून आत शिरतात; (स्ट्रॉ क्र. १) व खाली जाण्याची वाट शोधतात.

४) परंतु खालून वर येणाऱ्या हवेचा दाब जास्त असल्याने, खाली जाणारे पाण्याचे थेंब वर उचलले जातात व स्ट्रॉच्या बाहेर फेकले जातात.

५) त्यामुळे कारंजे तयार होते.

**कल्पना :** यावर आधारित घड्याळ बनवता येईल. एक तास कारंजे उडायला जेवढे पाणी लागते तेवढे पाणी बाटलीत भरावे. फक्त तास मोजायला कोणाला तरी बसवावे लागेल.

●●●



**लहान असुनी, महान आम्ही ! भावी विश्वाचेही स्वामी ! मोठे झालो तरिहि मनाने निर्मळ राहू आम्ही !**

'सुने हुए को मनन करो, मनन करनेसे शक्तिशाली बनोगे।'

# यंदाचा अर्थसंकल्प

– डॉ. वसंत पटवर्धन

यंदाचा श्री. यशवंत सिन्हा यांचा अर्थसंकल्प गेल्या दशकातील एक सर्वोत्तम अर्थसंकल्प म्हणावा लागेल. विशेषत: विद्यार्थी व शिक्षण यांच्याबाबत त्यात यावेळेला जास्त परामर्ष घेतला गेला आहे. त्याचा प्रथम विचार करून, मग अन्य महत्त्वाच्या गोष्टींचा थोडासा विचार करता येईल.

देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी आता साडेसात लक्ष रुपयांपर्यंत व परदेशांत शिक्षणासाठी पंधरा लक्ष रुपयांपर्यंत कर्ज मिळेल. त्यावर फक्त ८.५ टक्के व्याज असेल. दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये मदत मिळेल. चौदा वर्षापर्यंतच्या छात्रांना, आठ वर्षाच्या एका शिक्षणक्रमाचा लाभ घेण्याची 'सर्व शिक्षा अभियान योजना', आता देशांतील सर्व



जिल्ह्यात लागू होईल. ग्रामीण भागातील व्यावसायिक शिक्षणासाठी दिलेल्या देणग्यांना १०० टक्के करमाफी आहे. ती सवलत अभियांत्रिकी संस्थांसाठीही आता मिळेल. विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवून, या सर्व योजनांचा फायदा करून घ्यायला हवा.

कुठलेही अंदाजपत्रक सर्वांनाच खूष करणारे कधीच असू शकत नाही. ज्यांना करातील वाढ सहन करावी लागते ते असंतुष्ट असतात आणि ज्यांना सवलती मिळाल्या आहेत ते सवलती मिळाल्यानंतरही त्यापेक्षा कमी-अधिक सवलतींची मागणी करतात. हे सर्व लक्षात घेऊन सिन्हा यांनी चतुरपणे आपले आकडे मांडले आहेत त्यांचे हे भाजप आघाडीमार्फत चौथे 'बजेट' आहे. श्री. सिन्हांनी पायाभूत संरचना क्षेत्र व कृषि यांचे महत्त्व जाणून, तिथे भरघोस सवलती दिल्या आहेत. उद्योगांना हवी ती 'एक्झिट पॉलिसी' दिली आहे आणि गुंतवणूक व भांडवली क्षेत्रातही बऱ्याच अपेक्षा पुऱ्या केल्या आहेत. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण व तांत्रिक शिक्षण वाढविण्यासाठी उत्तेजन दिले आहे. तसेच अर्थतज्ज्ञ ज्या गोष्टीवर सतत भर देतात त्या वित्तीय तूट व शासकीय वाढता डोलारा, याकडेही लक्ष देण्याचे भान त्यांनी राखले आहे. आयात-निर्यातीचाही चपखल विचार अंदाजपत्रकात आहे. वित्तीय तूट सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ४.७% अपेक्षित आहे.

उद्योजकांवर तर त्यांनी सवलतीचा वर्षाव केला आहे. कॉर्पोरेट करावरील (कंपन्यांच्या उत्पन्नावरील कर) तेरा टक्के अधिभारापैकी भूकंपासाठी लावलेला दोन टक्के अधिभार वगळता, अकरा टक्के अधिभार रद्द केला. सीमाशुल्कावरील दहा टक्के अधिभारही काढून टाकला. सीमाशुल्काची कमाल पातळी फक्त ३५ टक्क्यावर आणली व पुढील तीन वर्षात ती वीस टक्क्याइतकी खाली आणण्याचे आश्वासन दिले. कंपन्यांना व म्युच्युअल फंडांना लाभांश वा उत्पन्न वितरणावर लाभांशकर २० टक्क्याने द्यावा लागत होता तो दहा टक्क्यावर आणला. (चलाख कंपन्यांनी गतवर्षाच्या २० टक्के करातून सुटण्यासाठी जून २००० पर्यंत भरघोस अंतरिम लाभांश जाहीर करून व देऊन 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखवलेच होते.) आणि निर्धारित व्याजदर दीड टक्क्याने कमी करून रिझर्व्ह बँकेलाही व्याजदर कमी करण्याचा संकेत दिला. (रिझर्व्ह बँकेने बजेटपूर्वी बँकरेट अर्धा टक्क्याने कमी केलाच होता. अर्थसंकल्पाच्या दुसऱ्याच दिवशी तो आणखी अर्धा टक्क्याने कमी झाला आहे.)

राष्ट्रीय आपत्ती वितरण निधीसाठी यंदा वेगळा अधिभार होता. तो काढला आहे. पण त्याऐवजी आरोग्यविघातक अशा सिगारेटवर १५ टक्के अधिभार लावला जाईल. विड्याही तितक्याच महाग होतील. पानमसाला व अन्य तंबाखूच्या पदार्थांवरही एकूण ६० टक्क्यांची जबर ड्यूटी असेल. गेल्या वर्षाच्या सप्टेंबरमध्ये हायस्पीड डिझेलवरील उत्पादनशुल्कात 'ममता' दाखवून ते १६ ऐवजी १२ टक्के केले होते. ते शुल्क पुन्हा १६ टक्के होईल. पण त्याचा फटका ग्राहकांना दिला जाणार नाही. वस्त्रोद्योगासाठी काही सवलती तर

काही ओझी आहेत. ब्रँड असलेल्या तयार कपड्यांवर आता १६ टक्के उत्पादन शुल्क असेल. कापसाचे धागे, बॉल व रोलर बेअरिंग व खासगी उपयोगाची शस्त्रे काड्यापेट्या वगैरे बाबतीतही काही सुसूत्रीकरण केले आहे.

कृषी व वस्त्रोद्योगाला डंपिंगपासून संरक्षण म्हणून काही आयातीवर सीमाशुल्क वाढणार आहे. सध्या गहू, तांदूळ, मका यांच्या आयातीवर ५०, ७० ते ८० टक्के सीमाशुल्क आहेच. त्यामुळे शेतकऱ्यांना हवे ते संरक्षण आहेच. आता चहा, कॉफी, नारळ व खोबरे यावरील सीमाशुल्कही ३५ ऐवजी ७० टक्के राहील व रिफाईन्ड तेलावर ते ८५ टक्के असेल. फक्त सोयाबीन तेलावर जागतिक व्यापार संघटनेच्या बंधनामुळे सीमाशुल्क ४५ टक्के राहील. विज्ञापन, तंत्रज्ञान व टेलिकॉम वस्तू व त्याचे सुटे भाग यावरील सीमाशुल्क बजेटच्या दुसऱ्या दिवसापासूनच १५ टक्के इतके कमी केले गेले आहे.

एप्रिलपासून संख्यात्मक बंधने जाणार असल्याने, मोटर धंद्याला संरक्षण म्हणून, वापरलेल्या गाड्यांच्या आयातीवर, एकूण १८० टक्के सीमाशुल्क राहील. अन्य स्वयंचलित दुचाक्या, मोटार सायकलीच्या आयातीवरही असेच जबर सीमाशुल्क असेल. विदेशी दारुवरचे शुल्कही वाढले जाईल. कापडधंद्यात आधुनिक यंत्रे यावीत म्हणून त्यांच्या आयातीवर १५ ऐवजी फक्त ५ टक्के शुल्क असेल.

खऱ्या अर्थाने आर्थिक सुधारणांचा दुसरा टप्पा आता स्पष्टपणे सुरू झाला आहे. समाजवादी विचारसरणी व प्रचंड बेकारी या गोष्टींच्या प्रभावामुळे भारतात श्रमिक जगाबद्दल बोलायचा अधिकार फक्त श्रमिक नेते व राजकीय नेते यांनाच मिळाला होता. मात्र देशात बेकारी नष्ट करण्याची नितांत जरूरी आहे; हे ध्यानात घेताना, त्यासाठी प्रत्येकाला काहीतरी कौशल्य आत्मसात करण्याची जरूरी आहे व गुणवत्तेबरोबर उत्पादकता वाढवायची गरज आहे, इकडे दुर्लक्ष केले गेले व श्रमिकांच्या संघटित शक्तीचा दुरुपयोग, उद्योग वाढवण्याऐवजी मारण्याकडे केला गेला. हे श्रमिकांनाही कळले नाही. कामचुकार मंडळींना काढता येत नव्हते. तोट्यात चालणारे उद्योग बंद करता येत नव्हते. कुठलाही गुणी व कामसू श्रमिक काढायला उद्योजक तयार नसतो. पण भारतात स्वातंत्र्यापूर्वी उद्योगजगात कामगारांना पिळले गेले, त्यांचे



वाजवी हक्कही नाकारले गेले. त्यामुळे लंबक दुसऱ्या टोकाला गेला, हे उद्योग जगतानेही ध्यानात घेतले नाही. श्रमिकांच्या कौशल्यवृद्धीसाठी वेगळे प्रयत्न केले नाहीत आणि एक दुष्टचक्र निर्माण झाले. शासनाच्या संमतीखेरीज कारखाने बंद होणार नाहीत, अशी तरतूद झाली. कारखाना बंद करता येत नसल्याने जिंदगी, यंत्रे गहाण टाकून चालवले गेले. परिणामी नवी तंत्रे आली नाहीत. संगणकाची भारतात सुरुवात झाली तेव्हाही त्यामुळे बेकारी वाढेल असा धोशा लावला गेला. आता मात्र संगणकामुळे रोजगार वाढतो आहे, ठिकठिकाणी सायबर कॅफे निघून रोजगाराचे विकेंद्रीकरण होत आहे व हा गैरसमज दूर झाला आहे व स्वेच्छानिवृत्तीही बरेच जण घेत आहेत. तरुणांनी आता रोजगार देईल, असं शिक्षण घ्यायला हवं आहे. केवळ पदवी देणारे नव्हे.

या अर्थसंकल्पामध्ये तोट्यात चालणाऱ्या किंवा अडचणीत आलेल्या कारखान्यात जर एक हजारापेक्षा कमी कामगार असतील तर कामगार कपातीचा अधिकार उद्योग जगताला दिला गेला आहे. मात्र कामावरून कमी करताना द्यावयाची नुकसान भरपाई, दरवर्षाला पंधरा दिवसाच्या पगाराऐवजी पंचेचाळीस दिवसांची केली गेली आहे. कंत्राटी कामगाराला कायम नेमणूक मागण्याचा हक्क असणार नाही. उद्योजकांना हवी असलेली निर्गम धोरणे (एक्झीट पॉलिसीज) मिळाली आहेत. नव्या तंत्रज्ञानामुळे व स्वयंचलित यंत्रामुळे दिवसेंदिवस मोठ्या कारखान्यातील मोठी कामगार संख्या दिसणार नसल्याने

एक हजाराची मर्यादा वाजवी आहे. हे यापुढे नोकरदारांनी ध्यानात ठेवायला हवे. लघुउद्योग वाढायचा असेल तर पुरवठा वेळेवर व गुणवत्तेच्या वस्तूंचाच होईल, याची काळजी संरक्षणावर जगण्याचे दिवस संपले आहेत आणि आरक्षण नाहीसे झाले आहे, हे त्यांनी व त्यांच्याकडील श्रमिकांनीही ध्यानात घ्यायला हवे.

अर्थसंकल्पात गुंतवणुकीसाठी अनेक सवलती दिल्या गेल्या आहेत. त्यातील काही पुढीलप्रमाणे आहेत.

१) औषधकंपन्यांना संशोधन व विकासासाठी सवलती मिळतील.

२) भागीदारी संस्थांनाही विदेशात गुंतवणूक करता येईल.

३) भारतीय कंपन्यांना विदेशात ५ कोटी डॉलर्सपर्यंत गुंतवणूक करणाऱ्यास प्रतिबंध असणार नाही.

४) विदेशी गुंतवणूक संस्थांना पोर्टफोलिओद्वारा ४९ टक्क्यांपर्यंत भाग भांडवल घेता येईल. त्यामुळे चांगल्या कंपन्यातील विदेशी भांडवल वाढेल.

५) लाभांशावरील कर गेल्या वर्षी दहा टक्क्यांवरून वीस टक्के केला गेला होता. तो पुन्हा दहा टक्क्यांवर आणला गेला आहे. त्याचा गुंतवणूकदारांना लाभ होईल.

६) स्टॉक ऑप्शन्स असणाऱ्या कर्मचाऱ्यांना विदेशात आता दरवर्षी २०,००० डॉलर्सपर्यंत गुंतवणूक करता येईल. (सध्या ती तीन वर्षात एकदा होती.)

७) शेअरविक्रीत भांडवली नफा झाला तरी तो प्राथमिक बाजारात (नव्या इश्युत) गुंतवला तर नफाकर द्यावा लागणार नाही. यामुळे शेअर बाजार सुधारावा अशी अपेक्षा आहे.

८) ८८ कलमाखाली पगारदारांना गुंतवणूक १ लक्ष रुपयांपर्यंत करता येईल व त्यावर देयकरातून ३० टक्के वजावट मिळेल.

कृषि, उद्योग, विज्ञापन, गुंतवणूक या क्षेत्रातील महत्त्वाच्या धोरण-विषयक बाबींमुळेच हा अर्थसंकल्प लक्षात राहील, असेच नाही तर प्रत्येक क्षेत्रांत काहीतरी आमूलाग्र बदल करण्याचा व भावी काळासाठी काही धोरणे स्पष्ट करण्याचा त्यात इरादा दिसतो, म्हणून तो महत्त्वाचा ठरेल. २१व्या शतकातला समर्थ भारत निर्माण करायची त्यात पूर्वचिन्हे आहेत. नागरिकांनी, विशेषत: उद्योजकांनी आता अर्थमंत्र्यांना 'हम साथ साथ है' म्हणत साथ द्यायला हवी.

●●●

**– डॉ. वसंत पटवर्धन**
७५९/३९, सरस्वती हाईट्स,
डे. जिमखाना, पुणे ४.

# हार्पिक

पहिल्या महायुद्धाच्या काळातील ही गोष्ट आहे. हॅरी पिकप (Hary Pickup) हा ब्रिटिश नागरिक व्यवसायाने हीटिंग अँड सॅनिटरी इंजिनिअर होता. लंडन शहरातली घरं नियंत्रित तापमान ठेवून उबदार राखणे व सांडपाणी वगैरेचा निचरा करण्यासाठी लागणाऱ्या साधनांची विक्री व दुरुस्ती करणे, हा त्याचा उद्योग.

सन १९२० मध्ये हॅरीला अचानकपणे मोठं सरकारी कंत्राट मिळालं. लंडनच्या आसपासच्या, जुन्या ॲम्युनिशन फॅक्टरींच्या आवारातल्या तुंबलेल्या पाईपलाईन्स साफ करून मोकळ्या करण्याचं काम होतं.

हे करीत असताना हॅरीला अनेक किचकट अडचणींना तोंड द्यावं लागलं. नाना प्रयोग केल्यावर त्याला आढळलं की अशुद्ध (Nitre) सोडियम/पोटॅशियम नायट्रेटच्या टाकाऊ तुकड्यांमध्ये, भरपूर पाणी मिसळून एकजीव केलेलं रसायन इतकं जहाल होतं की पाईपांच्या आतील भागावर चढलेली चुनखडीसारखी कठीण पुटं, सहजासहजी विरघळून आपोआप वाहती झाली.

या कामाच्या अनुभवामुळे हॅरीला सोन्यासारखा शोध लागला. कचऱ्याच्या भावात मिळणारे नायट्रेटचे तुकडे घेऊन, थोडेसे घरच्या कॉफी ग्राईंडरमध्ये टाकून पावडर तयार केली. त्यात पाणी मिसळून त्यानं संडासातलं कमोड धुतलं. दोन मिनिटात ते भांडं लख्ख निघालं !

हॅरीनं या स्वस्त नि मस्त पावडरचं लहान प्रमाणात उत्पादन सुरू केलं. आपल्या नावातली Har आणि Pic ही अक्षरं जुळवून 'हार्पिक' असं त्यानं आपल्या पहिल्या अपत्याचं नामकरण केलं. थोड्याच वर्षात हार्पिक लोकप्रिय झालं. सन १९३२ मध्ये रिकिट ॲन्ड सन्स या ब्रिटीश कंपनीने हार्पिक ब्रॅण्डचे हक्क विकत घेतले. पावडर दाहक असल्याने, ओलाव्यापासून संरक्षण व्हावे म्हणून पॅकिंग करताना खास काळजी घ्यावी लागे.

सन १९६० मध्ये सुवासिक हार्पिक, फवारा मारता येण्याजोगा, सोईस्कर आकाराच्या प्लॅस्टिक बाटल्यांमध्ये बाजारात मिळू लागली. सन १९७० मध्ये यात ब्लीच मिसळून 'टू इन् वन्' स्वरूपात हार्पिकला १०० टक्के जंतूनाशक करण्यात आलं.

आता रिकिट ॲण्ड कोल्मन कंपनीने सुमारे १०० देशात आपलं उत्पादन लोकप्रिय केलं आहे.

●●●

**– श्रीनिवास पटवर्धन**
१/बी/१, विश्रांतीनगर, हिंगणे
खुर्द पुणे – ४१.

अवतीभवती फुटला मोहोर, श्वास मातिच्या ओंजळीतला, ओळ सुगंधी ओठावरती, अंगणी चाफा मुक्त बहरला

# कविता पानोपानी




सण रंगांचा, रंगगंध नव, घेऊन आला घरा
वसंत उत्सव, उत्साहाने, आज करू साजरा ।।

वाहू लागले नवीन वारे, फुलू लागली फुले
नव पर्णांनी, नव रंगांनी सृष्टी अवघी खुले
नव्या रुपाने राणी सजली आज ही वसुंधरा
वसंत उत्सव, उत्साहाने, आज करू साजरा ।।

प्रसन्न वदना सुगी निघाली, रानामधुनी घरी
समृद्धीच्या कलशामध्ये वैभव सारे भरी
मोद विलसतो सकल मुखावर तृप्ती सुखाचा झरा
वसंत उत्सव, उत्साहाने, आज करू साजरा ।।

ढोल वाजवू मृदंग, वेणू, छेडू सूर बहार
परस्परावर प्रेम उडवू, विविध रंग तुषार
नृत्ये रंगवू, गाणी गाऊ प्रमोद येई भरा
वसंत उत्सव उत्साहाने आज करू साजरा ।।

रंगपंचमी नाचत आली तिच्या पदी पैजणं
मुक्त कराने शिंपित आहे, पुनवेचं चांदणं
सकल सृष्टीवर पहा पसरला, रंगांचा फुलवरा
वसंत उत्सव, उत्साहाने आज करू साजरा ।।

***

**– बजरंग सरोदे,**
''कौस्तुभ'' हनुमान मंदिराजवळ,
रणपिसे नगर, अकोला – ४४४००१.

**ऋतू वसंत म्हणून, झाड झाड पल्लवित, जशी प्रत्येक पानात, तेवतसे दिव्य ज्योत.**
छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा !

# कविता पानोपानी

## सृष्टीचे कलाधर


घर सुघड सुग्रणीचे
कसे झाडावर झुले।
पाती तृणांची वेचून
जीव ओतून विणिले ।।





जीव इवला पिपीका
कण घेऊन मृत्तिकेचे
एकजुटीने वारूळ
बांधी शैल–शिखरांचे ।।

जीवभाव मधुकोषी
मधुमाशीने साकारले
दालनांचे षट्कोन
कसे अचूक मापले ।।



दिव्य कलाधर हे सृष्टीचे
श्रम, एकतेचा बाणा
मन ओतल्या कलेचा
मग आविष्कार देखणा ।।

•••

– श्रीमती विद्या प्रभू
हरि ॐ को. ऑ. हौ. सोसायटी,
शनिनगर, बदलापूर (प.)
जि. ठाणे ४२१५०३.



ऋतू वसंत म्हणून, झाड झाड पल्लवित, जशी प्रत्येक पानात, तेवतसे दिव्य ज्योत.
छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा !

# अदृश्यतेचा शाप

– अरूण हेबळेकर

कथा विशेषांक

(विज्ञान कथा)

**श**रदचं आज काही तरी बिनसलं होतं. तो जेव्हा घरी आला तेव्हा त्याची आई म्हणजे माझी पत्नी कामिनी हळदीकुंकवाला शेजारी गेली होती. मी आज घरी थोडा लवकर परतलो. हां, माझंही माझ्या ऑफिसात बिनसलं होतं. माझा बॉस, मेजर जनरल श्रीकंठन् माझ्यावर उखडला. कारण साधंसं. त्याच्या संगणकानं त्याचं ई-मेल डाऊन लोड करायला नकार दिला; त्याचा राग त्यानं माझ्यावर काढला.

''डॉ. पद्मनाभन.'' (याने के मी !) तुम्ही आपलं काम नीट बजावलेलं नाही, असाच ह्यातून अर्थ निघतो. नाहीतर मला सांगा, हा डाऊन लोडिंगचा प्रॉब्लेम कधी निर्माण झाला? दोन आठवड्यांपूर्वी; आणि अजूनही तुम्ही त्यावर तोडगा काढलेला नाही. किती दिवस लावणार आहात तुम्ही? यू नो, तुमच्या ह्या वेळकाढू धोरणामुळे, सबंध अग्निबाणप्रक्षेपण यंत्रणा ठप्प होऊन पडलेली आहे. उद्या आपल्या शत्रूनं आपल्या देशावर हल्ला केला आणि आपल्या आर्मीनं अग्निबाण सोडायचा ठरवलं तर ते होणार नाही. तुम्हाला समस्येचं गांभीर्य कळलंय नं?'' त्यांनी विचारलं होतं. माझ्याकडे त्यावर उत्तर नव्हतं. म्हणून मी घरी लवकर परतलो होतो. बॉस बोलल्याचा मला राग आलेला नव्हता. परंतु माझ्या अक्षमतेचा मला राग आलेला होता. मी आमच्या सेनादलातील सर्वश्रेष्ठ संगणकतज्ज्ञ म्हणवून घेत होतो. सेनादलाच्या सर्व संगणक नियंत्रक यंत्रणेचा मी नागरी प्रमुख होतो. यानेके सिव्हिलियन हेड. संगणकात उद्‌भवलेल्या सर्व समस्या मी सोडवायला हव्या होत्या आणि गेले दोन आठवडे आमचे सारे संगणक, सुपर संगणक 'बृहस्पती' सह, नीट काम देत नव्हते. कुठंतरी काहीतरी बिघडलेलं होतं. कुठं आणि काय ते मात्र माझ्या लक्षात येत नव्हतं. मी पार वैतागलो होतो. हं ! तर मी कुठे होतो.

शरद आज लवकर आला. हा, माझा चौदा वर्षीय एकुलता एक सुपुत्र, लाडावलेला; आणि माझा जिवलग मित्र.

''हाय शरू !'' मी माझी उदासी लपवून प्रसन्नतेनं म्हटलं, ''आज लवकर?''

''हाय!'' निरुत्साही स्वरात शरदनं माझ्या 'हाय'ला उत्तर दिलं. ''मी फारसा लवकर आलेला नाही. तुम्ही फार लवकर घरी आलेलो दिसता आणि मम्मी दिसत नाहीये. कुठं गेलीये?

''माझा उदास मूड पाहून ती हळदीकुंकवाचं निमित्त करून शेजारी गेलीये.'' मी म्हटलं.

''उदासीचं कारण?'' शरदनं विचारलं.

''तूही थोडा उदास दिसतोयस. तुझं काय बिनसलं?'' मी विचारलं.

''रोजचं भांडण. संगणक सर आणि मी. ते मला मानायलाच तयार नाहीत. माझं असं म्हणणं नाही की त्यांनी मला जीनियस म्हणावं. परंतु मी थोडा अधिक हुशार आहे हे त्यांनी का मान्य करू नये?'' शरदनं विचारलं.





हिरव्या रानी फुलाफुलातून गीतभ्रमर गुणगुणती, आम्रतरुवर बसून कोकिळ वसंतकूजन करिती

''तुला वाटतंय की तू अधिक हुशार आहेस?'' मी थोडं साशंक होत विचारलं.

''निश्चितच ! डॅड, संगणक सरांनी चाळीशी गाठलीये आणि त्यांचं संगणकी ज्ञान तितकंच जुनं आहे.'' शरदनं म्हटलं. मी माझ्या हाता–पायांच्या बोटांवर माझं वय मोजलं. ते बेचाळीस भरलं.

परंतु माझा मेजर जनरल श्रीकंठन पन्नाशी ओलांडलेला माणूस होता.

''तुमचं कुणाशी बिनसलं?'' शरदनं विचारलं.

''माझा बॉस. मेजर जनरल श्रीकंठन्. त्यालाही वाटतंय की माझं संगणक ज्ञान जुनं आहे. मीही चाळीशीतला आहे नं? त्यानं पन्नाशी ओलांडलेली आहे.'' मी म्हटलं. शरद हसला. विनोद बुद्धीला तोटा नाही. अखेर बेटा किसका?

''कमॉन डॅड ! चीयर अप ! संगणकाचे प्रॉब्लेम असतील तर तुमच्या ह्या बरखुरदाराला विचारा. निदान तुम्ही तरी ह्या जीनियसला दाद द्या. अखेर तुमचीच क्रिएशन आहे.'' शरद म्हणाला.

तोंडात चांदीचा चमचा घेऊन जन्माला येण्यासंबंधी ऐकलेलं होतं. बोटं संगणकाच्या कीबोर्डवर ठेवून मुलानं जन्माला यायचा प्रघात पडला तर तो आमच्या ह्या शरदपासून सुरू झाला असावा, असं खुशाल समजावं.

''हे बघ बेटा, आमचे सगळे प्रॉब्लेम्स टॉप सिक्रेट असतात; आणि ते कुणाही सोम्या गोम्याला सांगता येत नाहीत.'' मी म्हटलं.

''डॅड, एक वेळ आपला हा घरचा संगणक तुमच्या ऑफिसच्या संगणकाशी बृहस्पती धरून, लॅनमध्ये जोडा. मी तुमचा कोडेड पूर्ण डेटा बेस उलगडून दाखवतो. केवळ अर्ध्या तासात.'' शरद म्हणाला. मी त्याच्याकडे किंचित चिंतेने पाहिलं.

बढाई मारण्यात शरद थोडा माझ्यावर गेलाय हा आरोप मला मान्य आहे. परंतु तो मला ह्यात पूर्णपणे चीत करीत होता. त्याचीच काळजी वाटू लागलेली होती.

''डॅड, माझ्याकडे इतक्या अविश्वासानं पाहू नका.'' मी बोलायला तोंड उघडण्याआधीच त्यानं म्हटलं. ''माझे सरही माझ्यावर विश्वास ठेवतात. माझ्या क्षमतेवर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. ते फक्त एकाच गोष्टीवर अविश्वास दाखवतात. त्यांना मी सांगितलं की कुठलाही पासवर्ड डिकोड करण्यासाठी मी एक कार्यक्रम तयार केलाय; आणि तो यशस्वीरित्या राबविलाही आहे. ते म्हणतात की तो कार्यक्रम आधीच सॉफ्टवेअर विचेसनी तयार केलेला आहे; आणि म्हणे, मी तो त्यांचा चोरलेला आहे. डॅड, तसा कार्यक्रम अजूनही अस्तित्वात आलेला नाही, हे त्यांना कोण सांगणार?''

मी थोडा सावध झालो.

''असा कार्यक्रम अस्तित्वात आलेला नाही, असं तू कोणत्या बळावर म्हणतोयस?'' मी विचारलं.

''तसा कार्यक्रम केवळ भारतीय स्वरलिपीवर आधारून तयार करता येतो आणि तसा प्रयत्नही अजून झालेला नाही. किंबहुना, झाला असल्यास, तो यशस्वी झालेला नाही.'' शरद आत्मविश्वासानं म्हणाला.

मी माझ्या ओठांवरून जीभ फिरवली. शरदला सांगावं का न सांगावं अशा द्विधा मनस्थितीत सापडलो. शरद म्हणतो तसा कार्यक्रम अस्तित्वात नसल्यास आमच्या संगणकांनी पुकारलेल्या बंडाचं कारण कोणतं असावं? हे एक आणि दुसरं, शरदला अशा कार्यक्रमाविषयी माहिती असल्यास तो माझ्या समस्येवर तोडगा काढायला मदत करू शकेल का? दोन्हींसाठी त्याला सारं खरंखुरं सांगावं लागेल. पण तसं सांगणं कितपत बरोबर होईल? राष्ट्रीय गुपित वगैरे !

''कमॉन डॅड, बी अ स्पोर्ट. मी तुम्हाला माझ्या उदासीचं कारण सांगितलं. तुम्ही तुमचं सांगा.'' शरद म्हणाला. मी उसासा टाकला. राष्ट्रीय गुपित वगैरे बाजूला ! तोडगा महत्त्वाचा. मी घसा खाकरून साफ केला.

''शरद, मी जे काही सांगणार आहे ते राष्ट्रीय गुपित आहे. तेव्हा ते ह्या कानाचं त्या कानाला समजता कामा नये.'' मी सुरुवात केली.

''डॅड, एक मिनिट ! तुम्ही चुकीच्या म्हणी वगैरे, वापरू नका प्लीज. ह्या कानाची त्या कानाला समजता कामा नये.' ह्यात एक फंडामेंटल चूक होतेय. आपण ऐकताना दोन्ही कानांनी ऐकतो. तेव्हा दोन्ही कानांना सारखंच ऐकू येतं. म्हणून एवढंच म्हणा की, ही गोष्ट दुसऱ्या कोणाला कळता कामा नये. बरं आता बोला.'' शरदनं म्हटलं.

''ती एक बोलायची पद्धत आहे.

तुला अर्थ कळला ना? बस्स !'' मी किंचित वैतागून म्हटलं.

''डॅड, अर्थ समजला नाही. मी सरळ ही खबर दुसऱ्या कुणाला सांगितली असती आणि तुम्ही विचारलं असता म्हटलं की मी माझ्या दुसऱ्या कानाला सांगितली नाही. तुमचा शब्द पाळला. पण डॅड, प्लीज, वाद घालू नका. समस्या सांगा. वेळ घालवू नका.'' शरद किंचित दरडावून म्हणाला. मी अचंबित झालो. वाद तोच घालीत होता आणि तेही मला बोलू न देता आणि वरून मलाच दरडावीत होता. मला राग आला होता. परंतु गरज माझी होती. मी पुन्हा घसा खाकरला. शरदच्या कपाळावरील आठ्या पाहून घाईघाईनं बोलायला सुरुवात केली.

''गेले पंधरा दिवस आमच्या संगणकाचा पासवर्ड बदलू लागलाय. आम्ही दिलेला पासवर्ड वापरला तर संगणक प्रतिसाद करीत नाही. त्यामुळे आम्हाला आमचाच डेटा बेस मिळेनासा झालाय.'' मी थोडक्यात सांगितलं.

''किल्ब सिंड्रोम !'' शरद म्हणाला. मी अवाक् हा कुठला नवा सिंड्रोम? आणि मला कसा काय तो माहीत नाही?

''काय म्हणालास? किल्ब सिंड्रोम? म्हणजे काय?'' मी गांगरून विचारलं.

''ओह डॅड...!'' शरद बोलायचा थांबला. परंतु त्याच्या स्वरावरून त्याला काय म्हणायचं होतं ते कळलं. थोडक्यात, त्यानं स्पष्ट शब्दांत तसं न म्हणता मला बुद्धू ठरवलेलं होतं.

''खूप पासवर्ड झाले की ही अवस्था निर्माण होते. एक छोटासा व्हायरस अनपेक्षितरीत्या शिरतो आणि ही समस्या निर्माण होते. विद्युत् दाबातील चुकून निघालेली छोटीशी आंदोलनं असा एखादा व्हायरस संगणकात आणू शकतात आणि तो मग पासवर्डच्या दुनियेत हाहाकार उडवतो. किल्बचा अर्थ 'किड इनसाइड लॉक्ड बाथरूम' असा आहे. लहान मूल बाथरूममध्ये असताना चुकून दार बंद झालं की त्याला बाहेर कसं यावं, ते समजत नाही आणि ते आत अडकून पडतं. तसं तुमच्या डेटा बेसचं झालंय.''

मी शरदकडे कोणत्या भावनेनं पाहावं हेच मला कळलं नाही. आदरानं? कौतुकानं? मत्सरानं? का सुटकेच्या भावनेनं?

''त्यावरील तोडगा तुला माहीत आहे का?'' मी विचारलं.

''आहे नं !'' 'अदृश्यतेचा शाप' मीच बनवलेला तो कार्यक्रम. अतिशय हरफन मौला पद्धतीचा आहे तो. बहुउद्देशीय.'' शरदनं अगदी सहज स्वरात म्हटलं. ही त्याची ढब आहे. दुसऱ्यांना जेव्हा तुच्छ लेखतो नं, तेव्हा तो असाच बोलतो.

''मला दे !'' मी निर्णायक स्वरात म्हटलं.

''नो डॅड, सॉरी ! पेटंटेड आहे तो. मी अजून ऑफिशियल पेटंट मिळवलेलं नाही. परंतु मिळवणार आहे.'' माझा ॲप्रोच चुकलेला होता. थोडं चुचकारून, गोंजारून सारं काढून घ्यायला हवं.

''नाव 'अदृश्यतेचा शाप' का? थोडं अवास्तव वाटतं.'' मी थोड्याशा नरमाईनं विचारलं. शरदनं माझ्यावरून एक राजेशाही नजर फिरवली.

''अवास्तव नाही. हा जो कार्यक्रम आहे त्याला तसा शापच आहे. तो कुठल्याही यादीत उमटणार नाही. तो संगणकात भरला गेलाय की नाही हेदेखील कळणार नाही. परंतु तो सर्व कार्यक्रमांना विद्युत् दाबातील आगंतुक आंदोलनापासून, हेतू पुरस्सर घडवून आणलेल्या पासवर्ड डिकोडर कार्यक्रमांतर्गत सर्वांपासून संगणकाला संरक्षण देईल. इतकंच नव्हे, इतर संगणकातील पासवर्ड उलगडून दाखवेल आणि हे सारं करण्यासाठी त्याला अदृश्य राहाणं भागच आहे.'' शरद म्हणाला. त्याच्या स्वरात ''इतकं सोपं सामान्य ज्ञान तुम्हाला माहीत नाही?' ह्या प्रश्नाचं अनुच्चरित रूप दडून होतं.

''ठीक आहे, ठीक आहे. शरद, आपण एक सौदा करूया. तू मला तो कार्यक्रम दे. मी तुला...'' मी बोलता बोलता थांबलो. मी त्याला जी ऑफर देणार होतो त्यात एक छोटीशी अडचण होती. त्यामुळे मी माझ्या देणगीत थोडासा बदल करायचा ऐनवेळी ठरवलं. ''माझी आल्टो चालवायला देईन.''

''कधी?'' शरदनं विचारलं. मासा गळाला लागला होता. ह्या माशाला गाडी चालवण्याचं वेड होतं. परंतु वयाची पाबंदी असल्यानं आणि त्याच्या आईची परवानगी नसल्यानं मी त्याला गाडी चालवायला देऊ शकत नव्हतो.

''आपण असं केलं तर?'' मी त्याच्या प्रश्नाचं उत्तर शोधता शोधता



**हा मोहोराचा वास करी सुगंधित मन। गोड गंधित जाहले हिरवेकंच सारे रान।**

वेळ काढायला म्हटलं.

''कसं?'' बराच वेळ माझ्याकडून उत्तर येत नाहीसं पाहून शरदनं विचारलं. जीनियस ऑर नो जीनियस, बेट्याच्या वयाची आतुरता लपत नव्हती. त्याच्या कपाळाला अजून आठ्या पडलेल्या होत्या.

''तू मला तुझी फ्लॉपी का सीडी जी काय ती दे. मी पटकन ऑफिसात जाऊन ते काम उरकून येतो. मग आपण लाँग ड्राईव्हसाठी जाऊया. गावाबाहेर पोचलो की तू गाडी चालवायला घे. कसं?'' मी ऐनवेळी सुचलेला तोडगा सांगितला.

''डॅड, तुमच्या ह्या बालिश सूचनेत अनेक दुष्ट हेतू स्पष्टपणे दिसून येतात. तुमची अशी ऑफर मी स्वीकारीन असं तुम्हाला वाटलं तरी कसं?'' शरदनं शांतपणे विचारलं.

''म्हणजे, तू मला मदत करणार नाहीस का?'' मी हताश होऊन विचारलं.

''मदत करतो नं ! परंतु माझ्या अटींवर.'' शरद म्हणाला. पुढं बोलेचना.

''ठीक आहे. अटी सांग.'' मी शरण गेलो.

''पहिली अट, आपण तुमच्या ऑफिसमध्ये जायचं. दोघांनीही. मी आल्टो चालविणार.'' शरद बोलायचा थांबला.

''तुझी आई शेजारीच आहे. आपण दोघं जाताना तिला दिसणारच. मी गाडी वळणावर गेलो की तुला देतो.'' मी तडजोडीचा मार्ग सुचवला.

''नो वे! मी गाडी इथूनच घेणार.'' शरद म्हणाला.

''अरे पण, तुझी आई मग मला कच्चा खाईल त्याचं काय?'' मी विचारलं.

''तो तुमचा प्रॉब्लेम !'' शरद म्हणाला. मी डोकं हलवलं. ''मान्य? गुड ! दुसरी अट, मला एक माझाचा असा वेगळा संगणक आणि वेगळी अशी माझी गाडी हवीय.'' तो पुढं म्हणाला.

''अरे, ह्या तर एकदम दोन अटी झाल्या.'' मी म्हटलं.

''शक्य आहे. दोन्हींची जात एकच म्हणून एकत्र सांगितल्या. मान्य?'' त्यानं विचारलं. मी आकाशाकडे मदतीसाठी पाहिलं. तिथून जेव्हा कसलीच मदत आली नाही तेव्हा मी मान डोलावली. ''तिसरी अट, तुमच्या प्रॉजेक्ट्समध्ये ह्यापुढें मला सहभागी व्हायला संधी द्या.'' तो म्हणाला आणि मी पुरा हादरलो.

माझ्या मेजर जनरलपुढे हा प्रस्ताव जर का मी मांडला तर माझं काय होईल ह्या कल्पनेनंच मी पूर्ण वितळलो.

''हे बघ, शरद, आर्मीत वयाची अठरा वर्षे पुरी झाल्याशिवाय नोकरी मिळू शकत नाही. तू हवंतर एन.डी.ए. च्या परीक्षेला बस. पास हो आणि ऑफिसर हो. मी काही म्हणणार नाही.'' मी म्हटलं.

''डॅड, तुमच्या बॉसकडे सांगून तर बघा ! म्हणावं, ह्यानं आपल्या सर्व समस्या सोडवल्या आहेत. जॉब द्या. मी सांगतो नं, डॅड, सर्वकाही सुरळीत होऊन जाईल.'' शरदनं म्हटलं.

मी बावरून गेलो. मेजर जनरल जॉब देणार नाही, ह्याची मला खात्री होती. परंतु, त्यानं ह्या प्रस्तावावर मला डोकं तपासून घ्यायला मानसशास्त्रज्ञाकडे पाठवलं असतं आणि माझ्या नोकरीवर गदा आली असती. तरीही, शरदच्या समाधानासाठी आणि माझ्या सध्याच्या गरजेसाठी मी त्याच्या तिन्ही अटी मान्य केल्या आणि आम्ही निघालो.

''फ्लॉपी का सीडी घेणार नाहीस?'' शरद तसाच निघालेला पाहून मी विचारलं.

''डॅड, 'अदृश्यतेचा शाप'



कार्यक्रम इथं अदृश्य आहे. तो तसाच राहिलेला बरा.'' त्यानं कानाच्या वरच्या बाजूस बोट दाखवीत म्हटलं.

ऑफिसमध्ये शरदसाठी पास घ्यावा लागला. पास देताना तिथल्या मेजरनं बरेच प्रश्न विचारले.

''मी फक्त त्याला संगणक कसा काम करतो ते दाखविणार आहे. चौदा वर्षाच्या मुलाला कार्यक्रमांविषयी फारसं काय कळणार? काळजी करू नका राष्ट्रीय गुपितं गुपितच राहणार.'' मी आश्वासन देत म्हटलं. मेजरनं शेवटी माझ्या आश्वासनावर शरदला आत येऊ दिलं. माझं सुदैव म्हणजे



**कसे पानात खेळती, किती खट्याळ हे वारे, झाड ओथंबुन आले, बाळकैऱ्यांच्या ग भारे**

इतका अपमान होऊनही शरद त्या मेजरवर भडकला नाही. मी त्याला त्याचं कारण विचारलं. त्यानं हसत माझ्याकडे पाहून डोकं हलवलं.

''तुमचा मुलगा झाला म्हणून काय झालं? मी तुमच्यावर गेलोय असं का वाटलं. माझ्यात तेवढीदेखील अक्कल नाही असं वाटलं का?'' त्यानं मला विचारल्यासारखं वाटलं. तो बोलला नाही तेच बरं झालं !

माझ्या वातानुकूलीत खोलीत आम्ही दोघंही टर्मिनलवर बसलो. त्याला कसल्याच सूचना द्याव्या लागल्या नाहीत. त्यानं भरभर संगणक सुरू केला आणि बटणं दाबत त्यानं काम सुरू केलं. मी त्याच्या कामाचा माग घेऊ पाहात होतो. सेटअपमध्ये जाऊन तो काही भानगडी करीत होता. एका क्षणाला भीती वाटली. उगाच काहीच्या बाही करून असलेल्या फाईल्स त्यानं कंटॅमिनेट केल्या तर? मला माझ्या भावुकतेचा राग आला. मी माझ्या नकळत त्याच्या बढायांवर गेलो होतो आणि संगणक त्याच्या हाती सोपवून बसलेलो होतो. अजून तरी तो 'बृहस्पती' वर गेलेला नव्हता. परंतु त्याला 'बृहस्पती' उपलब्ध होता. मी विचार केला, त्याला थांबवावं? म्हणावं की, मी मूर्ख आहे आणि त्याला इथं बोलवून आणण्याचा मी मोठा मूर्खपणा केलाय. आपण परत जाऊ या. परंतु का कोण जाणे, माझं मन पूर्णपणे निर्विकार झालेलं होतं. जमलं त्याला तर करू दे. नाहीतर, जाऊ दे संगणक आणि मेजर जनरल जहन्नममध्ये ''हुं ! झालं काम ! तुमचा सर्वात अलीकडचा पासवर्ड होता 'पांडव' त्यानंतर तुम्ही तो केला 'सरमा.' त्यानंतर 'मंदार.' आता नोंदला गेलाय तो 'सारस.' ठीक? आता सारस शब्द दिला की झाली तुमच्या नावाची ई-मेल अनलोड.'' असं म्हणत शरदनं बटणं दाबली आणि पडद्यावर मसुदे येऊ लागले.

मी काही वेळ पाहात राह्यलो.

''डॅड, ह्यापुढे काही झालं तरी तुमचा पासवर्ड ब्लॉक होणार नाही.'' शरद म्हणाला.

''परंतु शरद, आम्ही बॅकअप यू पी एस वापरला असताना विद्युत दाबातील आंदोलनं संगणकाकडे कशी पोहोचतात?'' मी खरोखर मनापासून विचारलं.

''मलाही नीट माहीत नाही, डॅड.'' एखाद्या जाणकारासारखा शरद म्हणाला. ''परंतु मला वाटतं की संगणकाचे की बोर्ड आणि माऊस वापरून वापरून जेव्हा थोडे झिजू लागतात तेव्हा त्यामधील असमांतर स्पर्शांमुळे विद्युत प्रवाहात आंदोलनं निर्माण होत असावीत आणि जाणारे पल्सेस नीट नोंद होत नसावेत. उपाय म्हणजे, की बोर्ड, माऊस वगैरे वरचेवर बदला आणि माझा 'अदृश्यतेचा शाप' वापरा.''

शरदचं बोलणं संपतंय न संपतंय तितक्यात मागून टाळ्यांचा आवाज झाला.

''वा, बापसे बेटा सवाई निघाला.'' आणि पाठोपाठ मेजर जनरलचा आवाज. आम्ही दोघांनी उठून उभं राहात मागे वळून पाहिलं. मागे मेजर जनरल श्रीकंठन् आणि मघाचा मेजर उभे होते. ''बराच वेळ झाला तरी तुम्ही लोक परतत नाही असं पाहून मेजर तुमचा शोध घेत आला. त्यानं ह्या मुलाला संगणक हाताळताना पाहिलं म्हणून तो मला बोलवून घेऊन आला. आम्ही सारं काम पाहिलं. तुमचं बोलणं ऐकलं. तुमचा पोरगा खरोखर जीनियस वाटतो. गुड.'' जनरलनं वळून मेजरकडे पाह्यलं. ''मेजर, सध्या, डॉ. पद्मनाभना घेऊन इथंच थांबा. त्यांना जाऊ देऊ नका. मी ह्या पोराला घेऊन जातो. मला त्याच्याशी बोलायचंय.'' जनरल म्हणाले आणि त्यांनी शरदला बोटाने यायला खुणावलं. शरद आता किंचित घाबरलेला दिसला. मीही घाबरलो होतो. मी थरथरत्या पायांनी खुर्चीत बसलो. जनरल आणि शरद गेले. मेजर माझ्यावर नजर ठेवून उभा होता. त्या वातानुकूलनातही मला घाम फुटला.

शरद जवळ जवळ तासाभरानं परत आला. त्या अवधीत कामिनीचे तीन फोन आले. शरद परत येताच आम्ही निघालो. शरद गप्प होता. मी लगेच त्याला काही विचारलं नाही. मी गाडीच्या ड्रायव्हिंग सीटकडे जाताना एकदम आठवलं, चावी शरदकडे होती. मी हात पुढे केला. शरदनं हसत डोकं हलवलं आणि तो पुढे होऊन ड्रायव्हिंग सीटवर बसला. मी उसासा टाकला आणि त्याच्या शेजारी बसलो.

''जनरलनं काय विचारलं?'' मी विचारलं.

''काही नाही. त्यांनाही संगणक शिकायचा आहे म्हणे. उद्यापासून त्यांनी शिकवणी ठेवलीये.'' शरदनं अगदी सहज स्वरात म्हटलं. त्याच्या

ह्या वक्तव्याला उपमा शोधायच्या प्रयासात अंतर संपून घरी केव्हा पोचलो ते कळलं नाही. घरात कामिनीनं जेव्हा तोंडाचा पट्टा सोडला आणि शरदला होऊ शकणाऱ्या अपघातांचा आणि शिक्षांचा पाढा वाचला तेव्हा मी तो प्रयासही सोडून दिला.

रात्रभर माझ्या झोपेत, जनरल, शरद आणि कामिनी यांच्या मला अदृश्य करू पाहणाऱ्या प्रयत्नांचीच स्वप्नं पडत राह्यली.

दुसऱ्या दिवशी सकाळी शरदला न्यायला जनरलची गाडी आली. मी माझ्या आल्टोनं गेलो. 'शरदच्या शाळेचं काय' हा कामिनीचा प्रश्न मी आणि शरदनं अनुत्तरीत ठेवला. शरदनं तो अनुत्तरीत ठेवायचं कारण मला माहीत नव्हतं. माझं कारण सोपं होतं. मला त्याचं उत्तर माहीत नव्हतं म्हणून.

ऑफीसच्या दारातील जवानानं मला जनरलनी भेटायला बोलावल्याचं सांगितलं. मी जाणलं, आता माझ्या हजाम्पट्टीची पाळी होती. मी नशिबावर हवाला ठेवून गेलो.



''डॉ. पद्मनाभ, तुमची कितीतरी दिवसांपासूनची इच्छा होती नं? तुमचा विभाग स्वतंत्र असावा आणि एखादा नागरी अधिकारी त्याचा प्रमुख असावा? आणि त्या विभागात तुमच्यावर कोणी नागरी अधिकारी नव्हता. परंतु ह्यापुढे तुमचा विभाग एका नागरी अधिकाऱ्याखाली राहील. सध्या त्याची सोय तुमच्याच केबिनमध्ये केलीये. बेस्ट ऑफ लक.'' असं म्हणून त्यानं डोकं कामात खुपसलं.''

मी थोडा साशंक होत माझ्या केबिनकडे आलो. दार उघडलं आणि आत आलो.

''हाय, डॅड !'' माझ्या खुर्चीत बसून शरद माझं स्वागत करीत होता.

***

**– अरुण हेबळेकर**
एम/२ हाऊसिंग बोर्ड, कॉलनी,
फोंडा, गोवा – ४०३ ४०१.



**माझ्या आंब्याच्या झाडाला आला आला गं मोहोर, रान सारे पुलकित झाले, मन जाहले विभोर**


## बिनविजेची घंटी

दारावरील बटन दाबले, म्हणजे वाजणाऱ्या घंट्या आपल्या घरात बसविलेल्या असतात. त्या विजेवर चालतात. पण आपण हवेवर चालणारी घंटी तयार करू. म्हणजे लाईन बंद असली, तरी ती बंद पडणार नाही.

आपल्या डॉक्टर काकांकडून इंजेक्शन देण्याच्या दोन जुन्या सिरींज मागून आणा. त्यातील पिस्टन (दट्ट्या) मात्र चांगल्या पाहिजेत. पिस्टन सहज मागे-पुढे व्हावा, म्हणून सिरींजला आतून थोडे खोबरेल तेल लावावे.

सिरींजच्या खालच्या टोकात फिट्ट बसेल, अशी रबरी नळी किंवा प्लॅस्टिकची नळी घ्या. सलाईनची नळी बसली, तर पाहा. नळी मात्र फिट्ट बसली पाहिजे. नळीच्या एका टोकात एक सिरींज बसवा. दुसऱ्या सिरींजच्या बाहेर दांड्याभोवती एक लवचीक स्प्रिंग बसवा. ह्या स्प्रिंगमुळे दट्ट्या नेहमी मागे ओढलेला राहतो.

एका लाकडी पाटीवर एक सायकलची घंटी उभी करा व त्याच्या शेजारी पहिली सिरींज पक्की करा. (आकृती पाहा.) आता दुसऱ्या सिरींजचा पिस्टन आत दाबा. त्यामुळे हवा दाबली जाते व ही हवा घंटीजवळच्या सिरींजमध्ये जाऊन तिथल्या पिस्टनला बाहेर लोटते. त्यामुळे घंटीवर टोला पडतो.




सिरींजवरील दाब काढला, की स्प्रिंगमुळे दांडा मागे येतो व दाब कमी झाल्याने घंटीला टेकलेला पिस्टन मागे सरकतो. अशा प्रकारे कितीही वेळा ही घंटी वाजविता येते व तिला विजेचा खर्च येत नाही.

***

('छंदातून विज्ञान' पुस्तकातून)

# अखेर जिंकली!

(साहस कथा)

– नीलिमा करमरकर

वातावरणात अजून पहाटेपूर्वीचा अंधार असतानाच, समुद्रावरचं खवळलेलं वादळ शांत होत गेलं. अंतोनियो मोठ्या काळजीतच होता. उत्तरेकडून येणाऱ्या सुसाट वाऱ्यांनी त्यांना लाटांवरून ढकलत ढकलत पुन्हा उलटं क्युबाच्या जवळच आणून टाकलं होतं. अंधारामुळे त्याला अंतराचा अंदाज येत नव्हता. पण त्यांच्या या भयानक प्रवासाचा सहावा दिवस सुरू झाला होता. हा त्यांचा प्रवास होता फिडूल कॅस्ट्रोच्या राजवटीपासून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी आणि त्यांचे वाहन होते– मोठमोठ्या सहा जुन्या रबरी ट्यूब्स एकावर एक बांधून तयार केलेली बोट किंवा तराफा म्हणाना! ट्यूबसुद्धा आता कुजण्याच्या मार्गाला लागल्या होत्या. आकाशात पहाटेची लाली दिसू लागताच या सात प्रवाशांच्या लक्षात आले की किनाऱ्यालगतच्या एका पर्वताजवळ ते येऊन पोहोचले आहेत.

आता विचारपूर्वक निर्णय घेण्याची वेळ आली होती. कारण या प्रवाशांजवळचा अन्न-पाण्याचा बराचसा साठा संपला होता. कंडेन्स मिल्कचे दोन डबे व थोडेसे पाणी शिल्लक होते. क्युबाच्या किनाऱ्यावर उतरून रातोरात थोडेसे अन्न-पाणी भरून घेऊन पुन्हा देशाबाहेर पडायचे की आत्ताच किनाऱ्यावर उतरण्याचा धोका न पत्करता तसेच उलटे परत फिरायचे? क्षणार्धात अंतोनिओने विचार करून वल्ही हातात घेतली. आपल्याच देशात पुन्हा आपण गेलो आणि पकडले गेलो तर तुरूंगवास नक्कीच होणार होता आणि आता पुन्हा गजाआड जाण्याची हिम्मत नव्हती. देशापासून दूर जाण्याचा निर्णय झाला आणि वल्ही जोरजोरात फिरू लागली.

पण असं घडलं तरी काय! क्युबा बेट हा एक लहानसा देश. उत्तर अमेरिकेतलं फ्लॉरिडा राज्य आहे, त्याच्या दक्षिणेला अटलांटिक महासागरात, छोट्या छोट्या बेटांचे समूह आहेत. त्यापैकी एक क्युबा. तिथे सशस्त्र क्रांती झाली आणि सामान्य जनतेच्या आशा पल्लवित झाल्या. कारण आता कॅस्ट्रोची राजवट सुरू होऊन खऱ्या अर्थाने लोकशाही सुरू होईल, असा जनतेचा विश्वास होता. पण साधारण इ.स. १९६० च्या सुमारास असं लक्षात आले की ही जनतेची एक भुलावण आहे. एक हुकूमशाही संपली आहे आणि दुसरा हुकूमशहा गादीवर आला आहे. या हुकूमशहाला हुसकावण्याचा कट करणाऱ्यांच्या एका गटात अंतोनिओ खेचला गेला. स्फोटक द्रव्ये जवळ ठेवल्याच्या आरोपावरून तो पकडला गेला आणि त्याला ३० वर्षे तुरुंगवासाची भयावह शिक्षा झाली. तुरुंगातून पलायन करण्याचे त्याचे दोन प्रयत्न अयशस्वी झाले आणि परिणामत: त्याला अंधार कोठडीत एकांतवासात डांबले गेले. एकांतवासात विचार करकरून अंतोनिआने ठरवले की आता पळून जाण्याचा प्रयत्न न करता 'एक आदर्श कैदी' बनायचे म्हणजे तीस वर्षांच्या शिक्षेतून सूट मिळेल. त्याचा अंदाज खरा ठरला. त्याची आदर्श वागणूक बघून नऊ वर्षांनी त्याची पॅरोलवर सुटका झाली

पॅरोलवरील कैद्यांसाठी तुरुंगात वेगवेगळ्या बरॅक्स होत्या. त्यांना तुरुंगाबाहेर वेगवेगळ्या कामांसाठी नेण्यात येत असे आणि रात्री एकदा त्यांची हजेरी घेण्यात येई. अंतोनिओला एका सरकारी एजन्सीमध्ये लॉरी ड्रायव्हरची नोकरी देण्यात आली. इथे पॅरोलवरील कैद्यांना कामावर ठेवत. पण त्यांच्यावर बारीक नजर असे. सलग पंचवीस दिवस काम करून घेतल्यावर त्याला पाच दिवसांची सुट्टी मिळाली. या काळात त्याला घरी जाऊन कुटुंबियांसोबत राहाण्याची परवानगी होती. अंतोनिओ घरी गेला. पण हे पाच



खूप पाहिले, खूप साहिले केवळ दुसऱ्यासाठी। भूतकाळाचे अनुभव सारे, आता माझ्या गाठी।।

दिवस चुटकीसरशी संपले. तेव्हा तो आपली पत्नी व्हेरेंडा हिला म्हणाला, ‘या देशात राहून आपलं भवितव्य काय? मी कैदेत राहून महिन्यातले फक्त पाच दिवस घरी येणार. यातच आपलं आयुष्य संपून जाईल.



देशाबाहेर पडण्याचा काहीतरी मार्ग शोधायला हवा.’ व्हेरेंडाने त्याला अनुमोदन दिले.

त्यावेळी अमेरिकेच्या रोखाने अनेक शरणार्थी विमानसेवेद्वारा जात होते. पण अंतोनिओ हा राजकीय कैदी होता. त्यामुळे त्याला अवैध मार्गाचा अवलंब करून पळण्याशिवाय गत्यंतर नव्हते. म्हणजे आता पर्याय होता तो म्हणजे फ्लॉरिडाची सामुद्रधुनी पार करून ‘मियामीच्या’ किनाऱ्याला लागायचे. अंतोनिओच्या डोक्यात सतत विचारचक्र सुरू झाले. एक दिवस एजन्सीच्या गॅरेजमध्ये लॉरी ठेवताना त्याला लॉरीच्या टायर्सच्या आतल्या मोठ्या ट्यूब्ज दिसल्या. मनात आशेचा किरण उजळला. उत्तर सापडले. या प्रचंड ट्यूब्ज एकावरएक ठेऊन करकचून बांधायच्या, वरून कॅनव्हासच्या कापडाची खोळ तयार करून त्यावर चढवायची आणि छोटासा पडाव तयार करायचा. ट्यूबमधील हवा कमी करून त्या दुमडून गॅरेजमध्ये लपवून ठेवणे सहज शक्य होते.

पुढचे काही महिने अंतोनिओची हालचाल सुरू होती. त्याने सहा ट्यूब्ज चोरून एकत्र आणून दडवून ठेवल्या. त्यापैकी काही सुस्थितीत होत्या तर काहींवर ‘पॅचवर्क’ करावे लागले. मग भक्कम लाकडाच्या फळ्या गोळा करून त्यांना वल्ह्याचा आकार देण्याचे काम सुरू झाले. एकीकडे त्याची पत्नी व्हेरेंडा ही कॅनव्हासचे कापड मिळविणे, टिकाऊ खाद्यपदार्थ गोळा करणे या तयारीला लागली.

अखेर १७ ऑगस्ट हा दिवस उजाडला. अंतोनिओ आणि व्हेरेंडा हे जोडपं आणि त्यांची दोन मुलं, ११ वर्षाचा टोनी आणि १० महिन्यांचा कार्ल्स सर्वजण एकत्र बसली आणि त्यांचा तोंडाने ट्यूब्ज फुगवण्याचा कार्यक्रम सुरू झाला. तासाभराने फुंकून फुंकून छाती फुटण्याची वेळ आली तेव्हा कुठे ट्यूब्ज फुगून टम्म झाल्या. मग दोराने आवळून त्या बांधल्या. कुठे हवेची गळती होत नाही ना? याची खात्री केली. व्हेरेंडाने शिवलेली कॅनव्हासची खोळ त्यावर चढवली. आता त्याला जरासा छोट्या होडीचा आकार प्राप्त झाला.

थोडे दिवसांनी अंतोनिओला घरी येण्यासाठी पाच दिवसांची सुट्टी मिळाली. हवामानाचा अंदाज घेतल्यावर त्याला समजले की क्युबाच्या उत्तरेकडे पुढील आठवड्यात वादळाची शक्यता नाही. म्हणजे चार-पाच दिवसांच्या प्रवासानंतर ते फ्लॉरिडाची सामुद्रधुनी पार करू शकणार होते. मग एखाद्या मोठ्या जहाजाला हात करून त्यांची मदत घेण्याचा त्यांचा विचार होता. या चार जणांच्या कुटुंबाबरोबर आणखी तीन सहप्रवासी होते. व्हेरेंडाचा भाऊ लुईस, त्याची मुले सिल्हिओ आणि ज्युलिओ. त्यांच्याजवळ एक ‘कंपास निडल’ होती. दिशादर्शक म्हणून वापरायला जवळ ठेवली होती.

क्युबाची राजधानी हॅवाना येथून ४० कि.मी. अंतरावर एक निर्मनुष्य किनारपट्टी होती. तेथील एका चिंचोळ्या तटावरून त्यांनी फुगवलेल्या ट्यूबांची होडी पाण्यात सोडली एक एक जण त्यावर आरूढ झाले. उत्तरेच्या बाजूला दीडशे किलोमीटर वल्हवत ते सर्वजण आले तेव्हा ते कमरेपर्यंत भिजून ओलेचिंब झाले होते आणि पुढच्या सर्व प्रवासात ते तसेच राहणार होते. अंतोनिओजवळ नकाशा नव्हताच आणि त्यांच्यापैकी कोणालाही

समुद्रात वल्हविण्याचा अनुभवही नव्हता. होती ती फक्त जिद्द. त्याच्या आधारे प्रवास सुरू होता. दिवसा कंपासामुळे दिशा कळत होती आणि रात्री आकाश निरभ्र असल्यास ध्रुव ताऱ्यामुळे. चार पुरुष मंडळी सतत सहा-सात तास वल्ही मारत होती. पण नंतर सिल्हिओ आणि टोनी यांना बोट लागून उलट्या सुरू झाल्या. ज्युलिओचे खांदे भरून आले. पुढच्या चोवीस तासात लुईसही ढेपाळला. आता एकटा अंतोनिओ धडधाकट अवस्थेत राहिला. कॅनव्हासवर बसून, घर्षण होऊन सर्वांच्या बैठकीवर, मांड्यांवर आणि पायांवर छोटे व्रण पडू लागले. जखमांवर खारे पाणी पडले की भयंकर वेदना व्हायच्या. व्हेरेंडा तर छोट्या कार्ल्समुळे जखडलीच होती. तेरा किलोचे त्याचे वजन पेलून तिचे हात भरून आले. कमरेभोवती कार्ल्सच्या हातांचा सतत विळखा होता. त्याला ऊन लागू नये म्हणून ती त्याच्या डोक्यावर सावली धरण्याचा प्रयत्न करीत होती. अशा अवस्थेत तीन दिवस पार पडले. अखंड प्रवास सुरूच होता.

तेवढ्यात अंतोनिओ ओरडला, 'सर्वजण जाळीखाली लपा' या लोकांनी बरोबर निळ्या रंगाची मच्छरदाणीसारखी जाळी घेतली होती. हेतू होता कॅमुफ्लॉज शत्रुपासून स्वत:ला झाकण्याची युक्ती. समुद्राच्या निळ्या लाटांच्या रंगात बेमालूम मिसळून जावे म्हणून निळी जाळी सर्वांनी पांघरली. कारण अंतोनिओला दूरवर एक जहाज दिसले. त्यावरील निशाण पाहून त्याने ओळखले की हे साम्यवादी रशियाचे जहाज आहे. या रशियन लोकांनी नक्कीच त्यांची क्युबन सरकारकडे पाठवणी केली असती. पण



अंतोनिओचा बचाव पवित्रा अचूक ठरला. हळूहळू जहाज दूरवर गेले. त्यांची नजरही इथवर पोहोचली नाही.

आता अन्नपाण्याचा साठा खूपच कमी झाल्याने त्यावर रेशनिंग आणले गेले. अपवाद होता फक्त छोट्या बाळाचा. फ्लॅशिंग सिग्नलसाठी एक आरसा बरोबर ठेवला होता. पण तो खऱ्या पाण्याने खराब झाला. टॉर्च बॅटरीज निकामी झाल्या. अशा स्थितीत पाचवा दिवस सुरू झाला. आकाश काळवंडले आणि उत्तरेकडून येणारे जोरदार वारे समुद्र ढवळून काढू लागले. विजा चमकू लागल्या आणि बोट पुन्हा क्युबाकडे ढकलली जाऊ लागली. पहाटेच्या सुमारास क्युबाची पर्वतरांग दिसताच सर्वांचे धैर्य खचले. पण किनाऱ्यावर आलोच आहोत तर पटकन उतरून गोडे पाणी भरून घ्यायचे ठरले. तेवढ्यात दक्षिणेकडून वारे वाहणे सुरू झाले आणि होडी पुन्हा किनाऱ्यापासून दूर सरकली. सर्वजण नेटाने पुन्हा वल्ही मारू लागले. दिवस मावळायच्या सुमारास



**नाही आता खंत मनाला, नाही उरला राग। गाव जाते मागे मागे, मना येई वेग।।**

होडीवरील सर्व गोडे पाणी संपले. लुईस तर तापाने फणफणला होता.

दुसऱ्या दिवशी पहाटेपासून समुद्रपण शांत झाला. आकाशपण निरभ्र होते. पण आता सूर्य जोरात तळपू लागला. तहान व भूक यांचा पोटात डोंब उसळला. मग समुद्रातील शेवाळ्यासारखा वनस्पती ओढून काढून मोठ्या माणसांनी खाल्ल्या. टोनीने प्लॅस्टिकची पिशवी आणि निळी जाळी याचा वापर करून मासे पकडण्याचा प्रयत्न सुरू केला. अंतोनिओला आता बायकोची काळजी वाटू लागली. कारण डोळे लाल झाले होते. ओठ सुकून त्याला भेगा पडल्या होत्या. छोट्या कार्ल्स बाळाने रडून, चिडून आईला ओरबाडले होते. खाऱ्या पाण्याने बाळाच्या अंगावर जखमा होऊन तो अधिकच चिडचिडा, पिसाळल्यासारखा झाला होता. सर्व राग तो आईवर काढत होता आणि आई मात्र शक्तिहीन झाली होती.

अखेर नववा दिवस उजाडला. बाळ आता अगदी शांतपणे पहुडले होते. दंगा नाही, हालचाल नाही. हाक मारल्यावर क्षीण डोळ्यांची फक्त उघडझाप करीत होते. सर्वांवर उदासीनता पसरली होती. पण अंतोनिओला आशा होती की ते आता योग्यदिशेने चालले होते. आता समुद्रावरून विमाने जात होती. अंतोनिओने एका सुकाणूला फडके बांधले आणि तो ते जोरजोराने हलवून विमानांना दाखवत होता.

अकराव्या दिवशी अंतोनिओला हवेत झालेला सूक्ष्म बदल जाणवला. त्याला गोड्या पाण्याचा दुरून वास येत होता. पूर्वेकडे कुठेतरी पाऊस पडत होता आणि वाऱ्याबरोबर पावसाचे काळे ढग त्यांच्या दिशेने येत होते. 'आता नक्कीच पाऊस येणार' अंतोनिओ ओरडला. 'लुईस आणि ज्युलिओ तुम्ही प्लॅस्टिकच्या पिशव्यात पावसाचे पाणी धरून ठेवा. सर्वांनी आपले चेहरे आकाशाकडे वर करा आणि तोंडात पावसाचे पाणी घ्या.' सर्वजण दहाच मिनिटांच्या पावसाने ओलेचिंब झाले. कोणीही बोलत नव्हते. सर्वजण पावसाचे ताजे पाणी अनुभवत होते. व्हेरेंडाने बाटलीत पाणी भरून घेतले. कार्ल्स बाळाला पाजले. तो आणखी मागत होता. तरी अर्धी बाटली पाणी संध्याकाळसाठी राखून ठेवले.

पहाटेच्या सुमारास दूरवर दिवे दिसले. एखादे मोठे जहाज असावे ते. चौघांनी हातवारे, आरडाओरडा करून निशाण दाखवण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ!

अंतोनिओ म्हणाला, 'हरकत नाही. आता एकापाठोपाठ बोटी येऊ लागतील. आपण आपल्या इष्ट स्थळाच्या अगदी जवळ आलो आहोत. कोणाचे तरी लक्ष आपल्याकडे जाईल व आपणास मदत मिळेलच. धीर धरा.'

तेवढ्यात तेलाचा एक अमेरिकन टँकर दूरवर दिसला. सर्वांनी लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. बावटा दाखवला. लवकरच त्यांना जाणवले की लाल दिव्यांची उघडझाप करत बोटीवरच्या घंटांचा आवाज करत तो टँकर त्यांच्या रोखाने येत होता. त्यांना संदेश कळला होता.

अंतोनिओने पडाव वल्हवत टँकरपासून २० मीटर अंतरावर आणला. डेकवरून आवाज आला, 'तुम्ही कोण आहात?'

अंतोनिओ ओरडला, 'आम्ही क्युबन्स आहोत. स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी, बारा दिवस समुद्रात तरंगत इथवर आलो आहोत. आम्हाला मदत करा.' टँकरच्या डेकवरून एक मोठा दोर खाली सोडण्यात आला. अंतोनिओने तो ओढून घेतला. पडावावरील सर्वजण आनंदाने एकमेकांना आलिंगन देत होते. मिनिटभरात डेकवरून खाली शिडी सोडण्यात आली. व्हेरेंडाने अंतोनिओला सांगितले, 'आधी बाळाला वर न्या.' एका हातात बाळाला पकडून अंतोनिओ कसाबसा शिडीवरून वर चढला. टँकरवरील खलाशांच्या हातात बाळाला देऊन अतिश्रमाने ग्लानी येऊन तो डेकवर कोसळला. पाठोपाठ सर्वजण शिडी चढून वर आले. व्हेरेंडाने बघितले की डॉक्टरांचे पथक बाळाला व अंतोनिओला उपचारासाठी आत नेत आहेत. ती निर्धास्त झाली. तिने परमेश्वराचे आभार मानले व स्वत:शीच म्हणाली,

'अखेर आम्ही जिंकली!'

✻✻✻

**– नीलिमा करमरकर**
इ/६ शशिकिरण
अशोकपथ
लॉ कॉलेज रस्ता, पुणे ४.

## वाचलेच पाहिजे असे काही

# निसर्गोत्सव

– शैलजा देशमुख

'मरणाची पाऊले जवळ जवळ वाजताना, ऐकू आल्याचा भास होताना, मीही निसर्गाचा एक भाग आहे, असे माझा अनुभव मला हरघडी सांगत असतो. या जाणीवेमुळे मला एकटे वाटत नाही. निसर्ग माझा सदा संनिध असलेला सखा झालेला आहे.'' हे उद्गार आहेत सुप्रसिद्ध लेखिका दुर्गा भागवत यांच्या 'निसर्गोत्सव' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील ! पुस्तकाच्या शीर्षकातूनच एका तीव्र संवेदनशील, बुद्धिमान आणि अतिशय व्यासंगी अशा स्त्रीच्या नजरेला जाणवलेले, निसर्गाचे विविध विभ्रम येथे आपल्याला भेटणार आहेत हे समजते.

पहिल्या सहा लेखात विविध झाडे, ऋतू, स्थळे यांच्या संदर्भातील लेखिकेच्या आठवणी आहेत. 'सिमेंटचं जंगल' म्हणून ज्याची संभावना केली जाते अशा मुंबई नगरीतील, वसंतागमनाच्या जागोजागी दिसणाऱ्या खुणा, लेखिकेच्या नजरेला जाणवतात; आणि एका वेगळ्याच दृष्टीने मुंबईतील वृक्षदर्शनाची सफर घडते. ''निसर्ग म्हणजे प्रकृती. जे असते ते किंवा मूळ स्वरूप आणि संस्कृती म्हणजे उपयोगाच्या दृष्टीने घडवलेली कर्मसृष्टी,'' अशी धारणा असल्यामुळे संस्कृतीचे दर्शन घडते. 'वाळूतली पाऊले' या पहिल्याच लेखात समुद्रावर तांदूळमणी वेचायला येणारी एक अनाथ मुलगी आपल्याला भेटते. बरोबर तिचा लहान भाऊ! तांदूळमण्याच्या बदल्यात पैसे मिळणार म्हणून ती आनंदित होते. तिची भूक पाहून कळवळलेली लेखिका तिला हवे ते खाऊ घालते अन् नंतर ती मुलगी पुन: भेटत नाही म्हणून हळहळते. तिची ती 'वाळूतली पाऊले' लेखिकेच्या कायमची स्मरणात राहिली आहेत. श्रावणातल्या दुपारच्या वाऱ्याचे, पावसाचे, प्रकाशांचे, झाडांचे, पानांचे अगदी सूक्ष्म वर्णन येथे आहे. मैदानावर हजारोंनी उगवलेली भूछत्रे, लेखिकेच्या मनाला भुरळ घालतात. भाद्रपदाच्या अखेरचा ऊन-पाऊस आणि त्या काळातील चिमण्यांच्या घरट्यातील नवजन्मोत्सवाचे नाट्य, चिमणाचिमणींच्या हालचाली यांचे, सूक्ष्म निरीक्षण 'ऊन-पाऊस' या लेखात येते.

गुलमोहोराच्या आठवणी सांगताना, वेगवेगळ्या ऋतूत या झाडात होणारी विविध स्थित्यंतरे लेखिकेने बारकाव्याने वर्णन केली आहेत. लेखिकेच्या स्मरणातील वैशिष्ट्यपूर्ण झाडंही आपल्याला या लेखात भेटतात. या लेखामध्ये ''निसर्गाची विविध'' रूपे वेगवेगळ्या व्यक्तींना, वेगळ्या रूपात भेटत असतात. प्रत्येकाने आपल्याला आवडणाऱ्या निसर्गदृश्यांची जर छोटी-छोटी टिपणे ठेवायची म्हटले तर आमच्या सौंदर्याभिरुचीचा एक मनोज्ञ इतिहास त्यामधून तयार होईल. यात शंका नाही'' असा एक मोलाचा विचार लेखिकेने मांडला आहे.

तुळस, रानझाडे, गेंडा, हत्तीची कथा, पक्ष्यांचे बोल, पाकोळी यासारख्या लेखातील, लेखिकेने दिलेले विविध संदर्भ वाचताना अक्षरश: चकित व्हायला होते. एखाद्या विषयावरची इतकी सखोल माहिती, सहजपणे द्यायला व्यासंग किती दांडगा हवा हे जाणवून मन नम्र होतं.

१९३६ ते १९४० या चार वर्षात मध्यप्रदेशातील जंगलात हिंडताना, तिथल्या आदिवासी स्त्रियांशी लेखिकेचा संबंध आला तेव्हाचे काही उद्बोधक, हृदयद्रावक अनुभव 'वनकथा' या लेखात लेखिकेने मांडले आहेत. रायपूर जिल्ह्यातील एका खेड्यातील लोकांचे दारिद्र्य, किती तरी बायकांनीसुद्धा फक्त रुंद लंगोट्याच धारण केलेल्या ! तेथील लहान मुले, पुरुष, स्त्रिया सर्वांच्या पाठी कशा कोळशासारख्या करपलेल्या. तिथल्या मुक्कामात एके दिवशी रात्री या पाठीचे रहस्य लेखिकेला उमगले. थंडीच्या कडाक्यापासून रक्षण करण्यासाठी वस्त्रे नाहीत. मग झोपडीच्या मध्यावर शेकोटी धुमसत असलेली- बाळ शेकोटीजवळ, आई पलीकडे.



**या मातीचा रंग निराळा, निराळाच गंध, रंगागंधामध्ये वेगळ्या, एक भावबंध.**

शेकोटीची धग लागून बाळाची पाठ कोळशासारखी करपून जायची. त्याची खूण पाठीवर कायमची कोरली जायची.

'वेडे झाड' या लेखात झाडांचे वेगवेगळे विभ्रम त्यांच्या भिवविणाऱ्या सावल्या, झाडांचे आपापसातील मैत्र, भावनांमधील सुसंवाद, लेखिका प्रथम वर्णन करते आणि त्या पार्श्वभूमीवर, स्वत:त हरवलेल्या वेड्या 'अलाटा' या झाडाबद्दल माहिती सांगते. अशा बंड करणाऱ्या झाडांचे वेडेपणही वृक्षसृष्टी सोसून घेते. पण माणसांना मात्र असे वेगळेपण सोसता येत नाही, हे सांगणारा लेखाचा शेवट एकदम उंची गाठतो.

असा हा निसर्गोत्सव! त्यातील निसर्गाच्या बदलत्या सूक्ष्म रूपांची वर्णने मुळातूनच वाचायला हवी. 'ऋतूचक्र' मध्ये विविध ऋतूतील निसर्गाची वर्णने येतात. पुस्तकातील लेखांमध्ये असे कोणतेही समान सूत्र नाही. लेखिकेने वेगवेगळ्या परिस्थितीत लिहिलेले वेगवेगळे लेख येथे संपादित केले आहेत. आपल्या सभोवताली घडणारी निसर्गातील स्थित्यंतरे घडणारी निसर्गातील स्थित्यंतरे, डोळे भरून पाहण्याची वेगळी दृष्टी हे पुस्तक नक्कीच आपल्याला देईल.

**निसर्गोत्सव**

लेखिका – दुर्गा भागवत

दिलीप प्रकाशन

मूल्य ७५ रु.

पृष्ठसंख्या १२७

***

**शैलजा देशमुख**

बी/७, गुरुराज सोसायटी,

पद्मावती, पुणे ३७.

## ''या शास्त्रज्ञांचे शोध कोणते?'' ची उत्तरे

छात्र प्रबोधनच्या विज्ञान विशेषांकात (वर्ष १ अंक ५) **''या शास्त्रज्ञांचे शोध कोणते?''** असे विचारले होते. त्याची उत्तरे पुढीलप्रमाणे –

**१) लिओ गॅलिलिओ**
खगोलशास्त्रज्ञ, पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ, हैड्रोस्टॅटिक बॅलन्स, दुर्बिणीतून अंतरिक्ष निरीक्षण

**२) लुई पाश्चर –** आम्लिकआम्ल (टार्टरीक ॲसिड), किण्वण (फर्मेंटेशन), यीस्ट, बॅक्टेरिया (जीवाणू), पाश्चरायझेशन, लॅक्टीक ॲसिड बॅक्टेरिया, रेशमाच्या किड्यावरील रोगजंतूंचा शोध

**३) मायकेल फॅरेडे –** विद्युत चुंबकीय प्रवर्तन, विशिष्ट उत्पादकत्व प्रवर्तकतत्व, इलेक्ट्रोमोटिव्ह फोर्स.

**४) जोसेफ प्रीस्टले –**
रसायनशास्त्रज्ञ, सोडावॉटर बनविण्याची पद्धत, प्राणवायूचा शोध, फ्लोजिस्टन तत्त्व

**५) ब्लासी पास्कल –** द्रवाचे संतुलन, संभाव्यता सिद्धांत

**६) विक्रम साराभाई –** वैश्विक किरण (कॉस्मिक रे पार्टीकल्स)

**७) आयझॅक न्यूटन –**
गुरुत्वाकर्षण, प्रकाश व रंगसंगती, प्रकाशाचा कण सिद्धांत, बायनॉमिअल थेअरम, गणिततले संशोधन

**८) जेम्स वॅट –** बाष्पचलित यंत्र

**अचूक उत्तरे देणाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे –**

भूषण लुंपाटकी – डोंबिवली
अदिती पिंपरीकर – परभणी
पुरुजित गुर्जर –
तेजल भोंगळे – पेण
रोहन दांडेकर – रसायनी
कोमल गवळी – रसायनी
राधिका जोशी – एच एच सीपी.– पुणे
पूर्वा खोपकर – रसायनी
शुभांगी जगताप – सासवड
कौस्तुभ कांबळे – रत्नागिरी
सुप्रिया हिरुरकर – अमरावती
किरण जाजू – पुणतांबा
पराग फाटक – बदलापूर
मीनल पाटील – नवापूर
रवींदू गेजगे – माडग्याळ
सरला सुरेश देवरे – देऊर
प्रितल हळपाठक – जामखेड
सुप्रिया मंद्रुपकर –इस्लामपूर
अभंग रेवळनाथ – राशीन
अंकुश पाटील – अलिबाग
नीलिमा लांडगे – सासवड
हर्षद लव्हेकर – सोलापूर
नचिकेत कुलकर्णी – इचलकरंजी

*वरील सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !*

✻✻✻

कथा विशेषांक

(प्राणी जीवनावरील कथा)

# लंगडा बायसन

– उषा वाणी



वैशाख महिन्यातलं रणरणतं ऊन ! सगळीकडे शुष्क वाळलेल्या झाडांची खोडं, जंगलात सरळसोट निष्प्राण होऊन उन्हाशी सामना करीत उभी होती. काही झाडांवर वसंतातली पालवी आपलं हिरवेपण अलगद धरून होती. पक्षी तिथे पानापानाआड स्वत:ला दडवून घेत होते.

उन्हाने सगळेच हैराण झाले होते. प्राणी जिथे कुठे थोडीफार झाडी दिसायची, तिथे जाऊन सावलीखाली विसावत होते. गरम हवेने अंगाची लाही लाही होत होती. त्यातून पाण्याचे दुर्भिक्ष ! झऱ्यांचे पाणी केव्हाच आटले होते. तलावात कुठेतरी थोडेफार पाणी साठलेलं होतं. तिथवर जायचं म्हणजे जाताजाताच प्राण्यांची दमछाक व्हायची !

जंगलातला रानम्हशींचा, बायसनचा कळपही पाण्याच्या शोधात वणवण हिंडत होता. सगळा कळप पुढे चालला होता. शेवटी मागे एक लंगडा बायसन, आपला लंगडा पाय ओढत ओढत त्यांच्या मागून निघाला होता.

त्या लंगड्या बायसनचं नाव होतं 'हम्प्री'. हम्प्री लहान पिलू असताना, एकदा दगडांच्या फटीत पाय चुकून अडकल्याने, कायमचा लंगडा झाला होता.

त्याच्या लंगडेपणामुळे त्याला सगळे टाळत असत. न कुणी कधी खेळायला घ्यायचे न कधी त्याच्यासाठी थांबायचे. हम्प्रीला ह्याचे फार वाईट वाटायचे. रागही यायचा. पण कळपाला सोडून एकटं जंगलात राहाणं शक्य नव्हतं. तो तसाच लंगडत कळपामागे फिरत राही. कधी कधी मागे पडला तर कळप शोधता शोधता रडकुंडीला येई.

पाण्यासाठी आता सगळे बायसन निघाले होते. कुठे म्हणून पाण्याचा मागमूस लागत नव्हता. पावसाळ्यात खळखळ वाहणारे झरे जणू काही जमिनीत गडपच झाले होते.

हिंडून फिरून सगळे थकले. सूर्य माथ्यावर आल्याने तर सगळ्यांचा जीव कासावीस झाला होता. शेवटी ईश्वरालाच त्यांची दया आली. थोडी हिरवी झाडी दिसली आणि त्यातून पलीकडचं पाणी चकाकलं! सगळे आनंदाने चीत्कार करीत धावत सुटले! पण बिचारा हम्प्री...!

हम्प्री कसाबसा त्या पाण्याजवळ जाऊन पोहोचला. पण तोपर्यंत त्याला सारा कळप त्या डबक्यावर तुटून पडलेला दिसला. हम्प्रीलाही खूप तहान लागली होती. त्यानं कळपात घुसून पाहिलं. पण त्याला कुणी जागा देईना. शेवटी जेव्हा सारे ओठावरून जीभ फिरवत बाजूला झाले तेव्हा हम्प्रीने पाण्याला तोंड लावून पाहिले. छे, थोडंसं उरलेलं पाणी आणि तेही चिखलाचं! शिवाय तहान भागवण्याएवढंही नव्हतं. हम्प्रीचा जीव अधिकच कासावीस, झाला. होतं तेच पाणी मोठ्या नाईलाजाने तो प्यायला आणि परत फिरलेल्या कळपामागे पाय ओढत ओढत जाऊ लागला.

आज त्याला फार वाईट वाटलं. कुणीही आपला का विचार करीत नाही बरं? त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

सगळा कळप चरायला पुढे निघून गेला. तो मात्र तसाच एका झुडपात स्वस्थ पडून राहिला.

एकदाची संध्याकाळ झाली. जो तो सवयीप्रमाणे आपापल्या विसाव्याच्या जागी जाऊ लागला. आपापल्या जागेवर ते संथपणे रवंथ करू लागले.

मोठ्या बायसनमध्ये, उद्या पाणी



**रस्ता गेला दूरदूर, झाडे दुतर्फा लागली, पसरली वाटभर, त्यांची विपुल सावली**

शोधायला कुठल्या दिशेला जायचे याची चर्चा सुरू झाली. मध्येच हम्प्रीने हिम्मत करून त्यांना माहिती दिली. ''आजच नीलगाईंचा कळप पूर्वेकडच्या जंगलात निघून गेला आहे. बहुधा त्यांना पाण्याचा पत्ता लागला असावा. हत्तींचाही कळप त्याच बाजूला जाताना दिसला. शिवाय...''

''ठीक आहे. ठीक आहे. बघू उद्या,'' म्हणत एका मोठ्या बायसनने त्याला मध्येच थांबविले. हम्प्रीने उदास होत आपली मान दुसरीकडे वळवली.

हळूहळू रात्र जंगलभर पसरली. रातकिडे किर्र गाऊ लागले! एखादा पिंगळा घुणघुण करत वरून उडून जाई. कोल्हेही एका सुरात कुईकुई ओरडत होते. पण मग सगळेच हळूहळू शांत झाले. सारा कळप थकून झोपी गेला.

हम्प्रीला मात्र आज झोप येत नव्हती. कळपातले सगळेजण आपल्याशी असे तुसडेपणाने का वागतात? आज तर आपल्या तहानेचाही कुणी विचार केला नाही. त्याला फार वाईट वाटले.

तो आकाशातल्या ताऱ्यांकडे पाहात उद्याचा विचार करू लागला. त्याने लंगडा पाय मध्येच लांब केला. मानही दुसऱ्या बाजूला करून भुईला पोट टेकवलं.

आकाशात असंख्य तारे चमचमत होते. आज त्याला त्या चमचमणाऱ्या ताऱ्यांचा हेवा वाटत होता. कसं छान चमचमणारं आयुष्य आहे यांचं !

बघता बघता मध्येच त्याला उत्तरेकडे क्षितिजावर केशरी प्रकाश दिसला. तो नीट बघू लागला. पिवळ्या-केशरी रंगाची प्रकाशरेषा हळूहळू उंच आणि रुंद होत होती. काय असेल बरं ! हम्प्री विचार करू लागला. आता ती रेषा दोन्हीही बाजूने रुंदावत होती. धुरांचा राखाडी रंगही दिसू लागला. तसा त्याच्या मनात विचार आला, अरे हा तर वणवा आहे वणवा. तो घाबरला. वणवा म्हणजे जंगलातली आग! जंगलावरचं संकटच नव्हे तर महासंकटच!

जंगलात उन्हाळ्यात झाडावर झाड घासलं गेलं की ठिणगी पडते एखादी घर्षणाने. ती पडते खालच्या वाळलेल्या गवतावर. तिथे पडताच ती पेट घेते. पाला-पाचोळा बघताबघता पेटत जातो आणि ही आग जंगलाला चहूबाजूकडून वेढून घेते.

हे सारं त्यानं मोठ्या बायसनच्या गप्पांतून ऐकलं होतं. आता त्याला खात्री झाली की नक्कीच वणवा पेटला आहे.

तो ताडकन् उभा राहिला. धुराचे आता लोळ उठू लागले होते. त्यात ज्वाला जणू नृत्य करीत थरथरत होत्या. त्यातून वाळलेल्या झाडांच्या फांद्या कडाकड कोसळत होत्या. हे सगळे सध्या जरी दूर होतं तरी हम्प्री घाबरला होता. कळपातले तर सगळे झोपले होते. आता करावं तरी काय?

हळूहळू त्या दिशेने पक्ष्यांचाही कलकलाट ऐकू येऊ लागला. त्याने घाबरून कळपाजवळ जाऊन 'हम्बो हम्बो' करून आवाज केला. शिंगाने जवळच्याला स्पर्श करून जागं करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दोघं-तिघं बायसन खाडकन् उभे राहिले आणि त्याच्याकडे रागाने पाहू लागले.

हम्प्रीने त्यांना आग दाखवली. त्याबरोबर ते ओरडू लागले. नाक फुरफुरवून जवळच्या वासाचा अंदाज घेऊ लागले. मग सगळे पळापळा म्हणत उलट दिशेने धावू लागले. छोटेछोटे बायसनही मधेमधे घुसून पडतझडत धावू लागले.

मात्र आताही कुणीही हम्प्रीकडे वळून पाहिलं नाही. शेवटी हम्प्री नेहमीसारखा लंगडत लंगडत त्यांना गाठायचा प्रयत्न करू लागला.

सगळं जंगलच आता थरथरलं. हरणं पळू लागली. नीलगाई पळू लागल्या. ससे, कोल्हे, हत्ती, वाघ, सिंह सारेच लहान-मोठे प्राणी जीवाच्या भीतीने धावू लागले. पक्षीण अजून घरट्यात खोळंबली होती. हम्प्री एकदा झाडावरचा पक्ष्यांचा कलकलाट ऐकून थांबला. पण तो त्यांना काय मदत करणार? पक्षीण घरट्यातल्या पिलांचा विचार करत होती. आज तर साऱ्यांनाच आपला जीव वाचवायची चिंता पडली होती तिथे तिला कोण मदत करणार?

शेवटी एकदाचा बायसन कळपही डोंगरापलीकडील नदीकाठी जाऊन पोहोचला. दमल्याने तोंडातून फेस येत होता. सगळे एकमेकाला जवळ करीत एकदाचे बसले जमिनीवर.

हम्प्री मात्र अजून मागेच होता. तोही कसातरी त्यांचा मागोवा घेत येत



**डोंगर व्हावे पेंगुळलेले, पोफळबागा सुस्त निजाव्या, अंगणातल्या हौदावरती, तहानलेल्या मैना याव्या.**



होता. इकडे तिकडे कानोसा घेत, शेवटी एकदाचा तो कळपाजवळ येऊन पोहोचला. तेव्हा त्याचा जीवात जीव आला. पण आपल्याबद्दल कुणालाच कसे काही वाटत नाही, याचं त्याला फार फार वाईट वाटलं. उजाडताच, आपण कळपाला सोडून दूर निघून जायचं; असा त्याने मनाशी पक्का निश्चय केला. तिथं पोहोचताच त्याने जमिनीवर बसकण मारली. सारे थकून भागून परत झोपी गेले. रात्र सरत आली. पूर्वदिशा उजळू लागली. जंगल उजळलं. सारे जागे झाले.

हम्प्री मात्र ग्लानीने डोळे मिटून तसाच पडून होता. मधेच त्याला जवळ हालचाल जाणवली. त्याने हळूच डोळे उघडले. बघतो तर काय? सगळा कळपच त्याच्याभोवती कडं करून मान खाली घालून उभा होता.

हम्प्री घाबरला. धडपडून उठू लागला. पण पाय घसरून तो परत पडला. मग मोठ्या नेटाने उभा राहिला आणि चकित होऊन बघू लागला. सगळे हळूच म्हणाले, ''हम्प्री घाबरू नकोस. आपण सगळे संकटातून वाचलो आहोत. तू वणवा दिसताच आम्हाला जागं केलंस म्हणून वाचलो. नाहीतर रानातली अशी आग वाऱ्याबरोबर भरभर पसरते आणि बघताबघता चहूबाजूने वेढा देते. असंख्य प्राणी होरपळून मरतात. पण साऱ्यांना तू आज वाचवलंस. आता यापुढे तू आमचा नायक. तुला आता मागे न ठेवता आम्ही तुझ्या मागेमागे फिरणार आहोत. तुझ्याशी आतापर्यंत आम्ही खूप वाईट वागलो. क्षमा कर आम्हाला!''

बघता बघता सगळी लहान पिलं पुढे आली. आनंदाने आवाज करू लागली. आपल्या पुढच्या पायांनी ताल देऊन नाचू लागली. मोठ्या बायसननी पण आपली शिंगं हलवून माना डोलावल्या. मधेच 'हम्बो हम्बो' करून सारे ओरडू लागले.

हम्प्रीनेही आनंदाने स्वत:भोवती गिरकी घेतली. आता कळप सोडून त्याला जाता येणार नव्हते. कालचा लंगडा हम्प्री आज बायसनच्या कळपाचा नायक झाला होता.

आकाशातल्या शुक्र ताऱ्याकडे त्याने अभिमानाने पाहिले. तो मनाशी म्हणाला, ''कुठलंच जीवन व्यर्थ नसतं तर! खरं नं?''

***

**– उषा वाणी**
'गुलकंद', बी १३,
श्रीनाथ साईनगर, रिंग रोड,
नागपूर ४४००२७.



**गर्द हिरव्या पालवीत, रंग भरुन आले, आकाशच उतरुन, सोनं पेरुन गेले.**

# करून तर पाहा !!

**१. वाळलेल्या पानाफुलातून आकर्षक फ्रेम बनवा**



या प्रकारच्या फ्रेमसाठी पूर्वतयारी करणे फार आवश्यक आहे.

आपण घरात ठेवायला पुष्पगुच्छ आणतो, पण ४/५ दिवसांनी तो सुकतो तेव्हा आपण तो टाकून देतो. पण तो पुष्पगुच्छ टाकून न देता त्याची फुले काढून जाड पुस्तकात ठेवा. त्याच्याच जोडीला वेगवेगळ्या आकाराची पाने पण ठेवा.

जाड पुस्तकात ही पाने, फुले ठेवल्यामुळे त्यांना चांगल्या प्रकारे इस्त्री होईल. साधारणपणे ५/७ दिवसात पुस्तकातील पाने, फुले चांगल्या प्रकारे आणि पूर्णपणे चपटी होतील.

५/७ दिवसांनी ही पाने, फुले बाहेर काढा. आता पांढऱ्या रंगाचे कार्डशीट घेऊन (कार्डशीट घेताना त्याचा साईज तुम्हाला हवा असेल तेवढा घ्या.) त्यावर योग्यरितीने या पाना-फुलांची रचना करा. फेव्हिकॉलच्या साहाय्याने ही पाने, फुले चिकटवून फ्रेम पूर्ण करा.

**२. भेटवस्तू देण्यासाठी आकर्षक खोके.**


खूप वेळा आपल्याकडे भेट देण्यासाठी काही वस्तू असतात, परंतु त्याला हवे तसे सुशोभन करता येत नाही किंवा आयत्यावेळी घाईघाईने जो रंगीत कागद हाताशी असेल त्याचाच उपयोग करावा लागतो.

अशी वेळ टाळण्यासाठी एक सुंदर आणि सोपा उपाय आहे. आपल्याकडे खूप वेळा मिठाईची खोकी येतात. मिठाई संपली की आपण ते खोकं टाकून देतो, पण ते टाकून न देता, त्या खोक्यांनाच थोडी कलाकुसर केली तर त्या रिकाम्या खोक्याचा चांगला उपयोग होऊ शकतो.

तसेच आपल्याला कोणी भेटवस्तू खोक्यातून घालून दिली, की आपण ते खोकं टाकून देतो. परंतु तेच खोकं थोडी कलाकुसर करून वापरता येते. वेगवेगळ्या आकारांची खोकी आपल्याकडे असली तर त्याचा उपयोगही, वस्तूंच्या आकारमानाप्रमाणे होऊ शकतो.

ही अशी थोडी वेगळ्या प्रकारची खोकी बनविण्याकरिता आपल्याला नक्षीदार कापडाचा उपयोग करावयाचा आहे.

पुढे दाखविल्याप्रमाणे, नक्षीदार कापड वापरताना शक्यतो गडद रंगाचे कापड वापरावे म्हणजे आपण सजवलेलं खोकं जास्त मळणार नाही किंवा त्यावर कापड लावताना त्यावर हाताचे ठसे उमटणार नाहीत.



आपण ज्याप्रकारे पुस्तकाला कव्हर घालतो त्याचप्रमाणे आपल्याजवळील कापडाने या बॉक्सला कव्हर घालायचे आहे.

फेव्हिकॉलमध्ये थोडे पाणी घालून, फेव्हिकॉल सरसरीत करून घ्यावे. खोक्याच्या एकेका बाजूवर फेव्हिकॉल लावून त्यावर त्या आकारमानाप्रमाणे कापड लावून घ्यावे. कापड लावताना खोक्यावर घडी येऊ देऊ नये. कापड अगदी सपाट लागले पाहिजे.

सर्व बाजूंनी कापड लावल्यावर वरच्या बाजूवर हवे असल्यास टिकल्या, आरसे लावावेत त्यामुळे खोकं जास्ती आकर्षक दिसेल.

मग या सुट्टीत या वेगळ्या प्रकारच्या कलाकृती करून सुट्टीचा आनंद घेणार ना?

***


– मेधा सुदुंबरेकर
२६ मित्रमंडळ पर्वती, पुणे ९.



घमघमला सुगंध, आला परंतु कुठून, अहा ! केवढी ही झाडे, पूर्ण गेली मोहरून

# क्रिकेटचे अनभिषिक्त सम्राट
# डॉन ब्रॅडमन

**– सुहास यादव**



अनेक वर्षे क्रिकेट जगतावर राज्य करणाऱ्या, सर डॉन ब्रॅडमन यांचे नुकतेच निधन झाले. क्रिकेटचे ते अनभिषिक्त सम्राट होते. या शतकातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून नुकतेच त्यांना सन्मानित करण्यात आले होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमधील, शतकांचे शतकही त्यांनी साजरे केले होते. केवळ सर्वोत्तम फलंदाज म्हणून नव्हे तर प्रतिभावंत गृहस्थ, कुशल कर्णधार, उत्तम निवड समिती सदस्य तसेच चांगले प्रशासक अशी त्यांची ख्याती होती. सर डोनाल्ड जॉर्ज ब्रॅडमन हे क्रिकेटविश्वाला पडलेले सुखद स्वप्न होते. केवळ ५२ कसोटी सामन्यातील ८० डावात खेळताना त्यांनी ९९.९४ च्या सरासरीने सहा हजार ९९६ धावा केल्या. त्यात २९ शतके होती. त्यापैकी १९ इंग्लंडविरुद्धची आहेत.

त्यांचा जन्म २७ ऑगस्ट १९०८ रोजी झाला. त्याचवेळी त्यांचे कुटुंबीय थंड हवामान म्हणून बाऊरल येथे राहण्यास आले. बालपणापासून अत्यंत उत्साही असणारा डॉन शाळेत जाऊ लागला. त्याला खेळांची अतिशय आवड होती. मात्र त्याकाळी त्याच्या शाळेत 'खेळ' या विषयाचे नियोजन नव्हते. जमेल तेव्हा, जमेल तसे, असा हा प्रकार होता. डॉनच्या शेजारी त्याच्याबरोबर खेळणारी मुले नव्हती. मग त्याने एक नवाच खेळ शोधून काढला. घरामागे बांधलेल्या पाण्याच्या गोल टाकीत गोल्फचा चेंडू टाकायचा आणि तो स्टंपने फटकवायचा. पाण्यात चेंडू कसाही जात असे. तसा हा खेळ सोपा नव्हता. पण छोटा डॉन चेंडूवर नियंत्रण मिळवून तो योग्य प्रकारे फटकावण्याचा प्रयत्न करायचा. यावेळी आत्मसात केलेले कौशल्यच पुढे याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये उपयोगी पडले. शाळा आणि पाण्याच्या टाकीतील क्रिकेट या खेरीज तो पियानोही उत्कृष्ट वाजवायचा. सुतारकाम आणि कुंपणाची कामे करणाऱ्या वडिलांनाही तो मदत करायचा. त्यावेळी आपण लोकांची घरे रंगविणारे रंगारी होऊ, असे त्याला वाटायचे.

वयाच्या बाराव्या वर्षी शाळेच्या संघाकडून खेळण्याची डॉनला संधी मिळाली. त्यावेळी दुसऱ्या डावात त्याच्या संघाच्या धावा झाल्या होत्या १५० आणि त्यापैकी ब्रॅडमनच्या होत्या ११५. या सामन्यात त्याने आठ बळीही मिळवले. त्यावेळी शनिवार–रविवार



**मैदानावर रुबाब याचा, आगळी किती शान। अलौकिक खेळीने मिळविला, जागतिक सन्मान।।**

## बॉडीलाईनचे वादळ

*ब्रॅडमन यांच्या धडाकेबाज फलंदाजीमुळे ऑस्ट्रेलियाचा पारंपरिक प्रतिस्पर्धी इंग्लंड, अक्षरश: वैतागून गेला होता. १९२९ मध्ये त्यांनी इंग्लंड दौऱ्यात लीड्स कसोटीत ३३४ धावा काढल्या व मालिका जिंकली. या पराभवाची भरपाई करण्यासाठी व मुख्य म्हणजे ब्रॅडमन यांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी पुढील मालिकेत इंग्लंडचे तत्कालीन कर्णधार डग्लस जार्डिन यांनी शरीरवेधी गोलंदाजीचा कट आखला व इंग्लंडच्या गोलंदाजानी उसळत्या चेंडूंचा मारा केला. अशा अखिलाडू डावपेचातून त्यांनी मालिका ४-१ अशी जिंकली. तरीही या मालिकेत ब्रॅडमन यांची सरासरी होती - ५६.५७*

तो बाऊरल संघासाठी गुणलेखक म्हणून काम करायचा. या संघाकडून त्याचे वडील, काका, मोठा भाऊ खेळायचे. एका सामन्याच्यावेळी संघाला एक गडी कमी पडत होता. मग त्यांनी डॉनलाच घेतले. आठ गडी बाद झाल्यावर त्याला फलंदाजीला पाठविले तरीही त्याने नाबाद ३७ धावा केल्या. त्याचे बक्षीस म्हणून संघाकडून त्याला एक बॅट बक्षीस मिळाली. आजही ही बॅट ब्रॅडमन यांच्या संग्रहालयात आहे.

फेब्रुवारी १९२१ मध्ये सिडनी क्रिकेट मैदानावर, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी सामना होता. तो सामना पाहण्यासाठी आपल्याला घेऊन जावे, असा हट्ट त्याने वडिलांपाशी धरला. वडिलांनी त्याला सामना पाहण्यास नेले. तेथील खेळ पाहून तो इतका प्रभावित झाला की या मैदानावर खेळण्याची प्रतिज्ञा त्याने केली.

वयाच्या चौदाव्या वर्षी म्हणजे १९२२ मध्ये त्याने शाळा सोडली व बाऊरल रिअल इस्टेट एजन्सी या मालमत्ता खरेदी विक्रीचे व्यवहार करणाऱ्या संस्थेत, कारकून म्हणून तो काम करू लागला. या संस्थेचे मालक पर्सी वेस्टब्रुक, अतिशय प्रेमळ गृहस्थ होते. त्यांनी छोट्या डॉनला क्रिकेटचा सराव करण्याची परवानगी दिली. नंतर सिडनीला जाण्यापूर्वी पाच वर्षे तो वेस्टब्रुक यांच्याबरोबर होता. त्यावेळी बाऊरल संघाकडून स्थानिक पातळीवर खेळताना तो धडाकेबाज फलंदाजी करीत असे. त्यावेळी जिल्हा क्रिकेट स्पर्धेत शतक झळकविल्यास त्याला नवी बॅट घेऊन देण्याचे आश्वासन त्याच्या आईने दिले होते. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात त्याने ३०० धावा केल्या आणि मग आईकडे तीन बॅटची मागणी केली. आईने चांगल्या दर्जाची एक बॅट घेऊन दिली. ऑक्टोबर १९२६ मध्ये त्याला निवड समितीने सिडनीला बोलावून घेतले. निवड समिती खरे तर गोलंदाजाच्या शोधात होती. मात्र, डॉनच्या रूपाने त्यांना अव्वल दर्जाचा फलंदाज गवसला होता आणि मग आतापर्यंत मातीच्या खेळपट्टीवर खेळणारा ब्रॅडमन, आता गवताच्या खेळपट्टीवर सराव करू लागला.

आता त्याचे नाव गाजू लागले होते. कौंटी क्रिकेटमध्ये तो सदर्न टीमकडून खेळू लागला. नंतर तो एन.एस.डब्ल्यू. संघाकडून प्रथम श्रेणीच्या सामन्यात खेळू लागला. १९२८-२९ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी संघात प्रवेश झाला आणि मग त्यांचा खेळ बहरत गेला. त्यांच्या शतकांमधील त्यांच्या दृष्टीने संस्मरणीय ठरलेली कामगिरी म्हणजे १९३० मध्ये त्यांनी इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात केलेल्या २५४ धावा. या मालिकेतील त्यांना खेळायला मिळालेल्या सात डावांमध्ये, त्यांनी ९७४ धावा केल्या. १९४६ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात ते सहाव्या क्रमांकावर खेळायला आले आणि सिड बार्नेसबरोबर ४०५ धावांची भागीदारी करताना ३९० मिनिटात २३४ धावा त्यांनी फटकावल्या. या सामन्याचे वैशिष्ट्य म्हणजे बार्नेस यांच्या २३४ धावा झाल्या. पण त्यासाठी त्यांना ब्रॅडमन यांच्यापेक्षा चार तास जास्त खेळावे लागले.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एका सामन्यात संघाची एक बाद नऊ अशी अवस्था असताना ते मैदानात उतरले. अखेरपर्यंत किल्ला लढवित त्यांनी २९९ धावा फटकावल्या. संघाच्या ५१३ धावा झाल्या. स्वत:चे त्रिशतक व्हावे म्हणून ते शेवटची धाव घेत असतानाच, दुसरा फलंदाज धावबाद झाला. १९३४ मध्ये त्यांनी इंग्लंडविरुद्ध ३०४ आणि

# डॉन ब्रॅडमन यांची कामगिरी

| संघ | डाव | नाबाद | धावा | सर्वोच्च | सरासरी | शतके |
|---|---|---|---|---|---|---|
| **इंग्लंड** | ६३ | ७ | ५,०२८ | ३३४ | ८९.७८ | १९ |
| **वेस्ट इंडिज** | ६ | ० | ४४७ | २२३ | ७४.५० | २ |
| **दक्षिण आफ्रिका** | ५ | १ | ८०६ | २२९ | २०१.५० | ४ |
| **भारत** | ६ | २ | ७१५ | २०१ | १७८.७५ | ४ |
| **एकूण** | ८० | १० | ६,९९६ | ३३४ | ९९.९४ | २९ |

२४४ धावा केल्या. त्यांच्या काही अविस्मरणीय खेळींपैकी या होत्या. भारताविरुद्ध खेळताना १९४७ मध्ये त्यांनी ब्रिस्बेनला १८५ धावा केल्या तर मेलबोर्न येथील सामन्यात १३२ आणि नाबाद १२७ व ॲडलेड येथील सामन्यात २०१ धावा केल्या. १९३६ मध्ये ते ऑस्ट्रेलिया संघाचे कर्णधार झाले. १९४८ पर्यंत म्हणजे निवृत्तीपर्यंत त्यांनी कर्णधारपद सांभाळले. ब्रॅडमन यांचा खेळ ऐन बहरात असतानाच दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यामुळे त्या काळात यांचे विक्रमही कमी झाले. नाहीतर त्यांच्या नावावर आणखीही काही विक्रम नक्कीच नोंदले गेले असते. कमी सामन्यातही त्यांनी अनेक विक्रम केले. त्यांच्यातील खेळाडूला, जंटलमनला, जणू मानाचा मुजरा म्हणूनच 'सर' हा किताब त्यांना बहाल करण्यात आला.

कर्णधार असतानाही ते एक 'जंटलमन' म्हणूनच वावरले. कधीही अखिलाडूवृत्ती किंवा वाममार्गाचा अवलंब त्यांनी स्वत: केला नाही किंवा सहकाऱ्यांना तशी चिथावणीही दिली नाही.

२४ कसोटी सामन्यात त्यांनी ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले. त्यापैकी १५ सामन्यात पराभव अशी त्यांची कामगिरी होती. सहकारी खेळाडूंना प्रोत्साहन तर ते द्यायचेच परंतु प्रतिस्पर्धी संघातील उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूचेही ते मनापासून कौतुक करायचे. एखाद्याचा खेळ खूप आवडला की वयाची बंधने झुगारून ते त्या खेळाडूचे कौतुक करायचे. त्यांच्या या कौतुकाचा बहुमान आपल्या सचिन तेंडूलकरनेही मिळवला आहे.

कुठल्याही खेळातील खेळाडू म्हणून घडताना तुमच्यातील खिलाडूपणा, दुसऱ्या खेळाडूची प्रशंसा करण्याचा मनाचा मोठेपणा, सकारात्मक खेळ खेळण्याचा आग्रह, सहकाऱ्यांना सतत प्रोत्साहन देणे, हे गुण खूप महत्त्वाचे असतात. 'चांगला खेळाडू' म्हणून हे गुण तुम्हाला घडवत असतात. सर डॉन ब्रॅडमन यांच्याकडून खेळासाठीचे कष्ट, स्टॅमिना, याबरोबरच वरील गुणांची देणगी देऊन, त्यांच्याप्रमाणेच एक नावाजलेला खेळाडू म्हणून घडणे, हीच त्यांना, त्यांच्यातील 'जंटलमन' खेळाडूला, खरी श्रद्धांजली ठरेल.

•••

**सुहास यादव**
हिंगणे स्त्री शिक्षण संस्था
हिंगणे खु., पुणे.

# सूड




अनुवाद : अनघा भट–बेहेरे

(रशियन अनुवादित कथा)

अंकगणिताच्या कंटाळवाण्या तासाला बसण्याऐवजी आम्हाला शाळेच्या शेतात बटाटे खणून काढायच्या कामावर पाठवलं. बटाटे खणून काढायचं काम तसं बघितलं तर मोठ्यामोठ्या संख्यांच्या गुणाकारापेक्षा कधीही बरं ! तिथे म्हणजे जोरात बोलता येत नाही. मित्रांबरोबर दंगा करता येत नाही की शिट्ट्या वाजवता येत नाही.

म्हणूनच आम्ही सगळी मुलं आणि मुली उंडारलो होतो. अंधाऱ्या, मरगळलेल्या वर्गाऐवजी सप्टेंबरातलं निरभ्र आभाळ डोक्यावर बघून खूप दंगा करत होतो.

कधी नव्हे इतका सुंदर दिवस होता – शांत, उबदार, निळ्या आणि सोनेरी रंगाचा ! फक्त आमच्या पायाखालची माती, जिच्याकडे आम्ही दुर्लक्षच केलं होतं, ती काळी होती आणि त्या सोनेरी निळाईत तरंगणारे कोळ्याच्या जाळ्याचे धागे चंदेरी होते.

आमचा सगळ्यात मोठा उद्योग म्हणजे लवचिक दोरीच्या टोकाला मातीचा गोळा करून बांधायचा, दोरी फिरवून तो गोळा फेकायचा आणि गोळा किती लांब गेलाय ते पाहायचं. हे असे गोळे (कधीमधी त्यात एखादा बटाटाही यायचा) इतके लांब आणि उंच जात की ज्याने प्रत्यक्ष पाहिलं नाही त्याला कल्पना करणंही कठीण ! मधूनच निळ्याशार आकाशात बरेच गोळे एकदम उडायचे. एकमेकांचा पाठलाग करत ते लहान लहान होत जायचे. कितीही लक्ष ठेवलं तरी कोणाचा गोळा सर्वात उंच गेला हे सांगणं शक्यच व्हायचं नाही.

असंच एकदा मातीचा चांगला घट्ट, जड गोळा बनवावा म्हणून मी खाली वाकलो होतो, इतक्यात मला खांद्याच्या मधोमध एक जोराचा फटका बसला. मी ताबडतोब सरळ झालो आणि वळून पाहिलं तर हातात जाडजूड दोरीचा तुकडा घेऊन माझ्यापासून पळून बटाट्याच्या शेताकडे चाललेला वित्का अगाफोनव मला दिसला. म्हणजे स्वत:चा गोळा आभाळात भिरकावून देण्याऐवजी तो गुपचूप माझ्या मागे आला असणार आणि टोकाला मातीचा गोळा बसवलेल्या दोरीने मला फटका दिला असणार.

खूप खूप किरणांचे अनेक सूर्य माझ्या डोळ्यांसमोर चमकायला लागले. फितुरी केल्यासारखा खालचा ओठ वाकडा झाला. रडू यायला लागलं की होतंच असं ! वेदना मला सहन करण्यासारखी नव्हती असं मुळीच नाही. शारीरिक वेदनेमुळे मी रडल्याचं मला आठवत नाही. जर वेदना कमी होत असत्या तर मी किंचाळलो, ओरडलो किंवा गवतावर लोळलो असतो. पण रडलो निश्चितच नसतो. पण अगदी थोडा जरी अपमान किंवा अन्याय माझ्या वाट्याला आला की लगेच माझ्या डोळ्यात अश्रू जमून येतात.

झालेला प्रकार शेतातल्या कुणाच्याच लक्षात आला नव्हता. सर्वजण पहिल्याप्रमाणेच बटाटे काढत होते. बहुधा आकाशही मघासारखंच निळं होतं आणि सूर्यही मघासारखाच सोनेरी. पण मला मात्र आता ते बटाटे दिसत नव्हते, आकाश दिसत नव्हतं की सूर्य दिसत नव्हता. माझ्या घशात कडवट आवंढा दाटून आला होता. अपमान आणि संतापाने मन काळवंडलं होतं. डोक्याला कल्पना आली की वित्काचा सूड घ्यायचा. असा सूड घ्यायचा की पुन्हा असं करायची त्याची हिम्मतच होऊ नये !

सूडाचा बेत पक्का झाला. अजून थोड्या दिवसांनी हे सगळं विसरलं की, काहीतरी करून मी वित्काला, 'आपण रानात जाऊ, शेकोटी पेटवू', म्हणून रानात बोलवीन आणि तिथे, जंगलात त्याचं थोबाड फोडून ठेवीन.



अन्यायावर करण्या मात, हवा अंगी आत्मविश्वास। ध्येय आपुले गाठण्या, हवी कल्पकतेची साथ।।

अगदी सरळ आणि सोप्पं ! रानात तो एकटात असेल आणि, 'काय, सापडलास का नाही माझ्या तावडीत?' असं म्हटलं की तो घाबरेल. नाही, मी काही त्याला पाठीत मारणार नाही, मी एक ठोसा सरळ त्याच्या नाकावर देईन. का त्यानं जसं केलं तसंच करावं? त्याने मला पाठीत मारलं होतं ना? मग मी पण पाठीतच मारलं पाहिजे. तो वाळक्या काटक्या उचलायला वाकला की मी पण त्याचा कान धरून त्याला असा हासडीन, की डोकंच गरगरायला लागेल. तो माझ्याकडे वळेल. मग मी त्याला म्हणीन, 'काय मग? सापडलास की नाही माझ्या तावडीत !' आणि मग नाकावर ठोसा...

ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी मोठ्या मधल्या सुट्टीत मी त्याच्याजवळ गेलो. बनचुक्या नसलेल्या, साध्या मुलांना मनातलं कपडे लपवणं फारच अवघड असतं. तसं बघितलं तर त्यात काय विशेष आहे? आपल्या वयाच्याच मुलाला रानात शेकोटी पेटवायला बोलवायचं. केव्हातरी त्याच्या जवळून जाता येता पण सांगता येतं. त्याच्यासाठी मनात इतकी खळबळ होत नाही. ह्या वेळेला मात्र मी खूप अस्वस्थ झालो. घसा कोरडा पडला. आवाज माझा नसून कोणा परक्याचाच आला. हात खिशामध्ये दडवावे लागले. अचानक काही कारण नसताना ते थरथरायला लागले.

वित्काने माझ्याकडे संशयाने पाहिले. गवती रंगाच्या केसांखालचे, किंचित बाहेर आलेले त्याचे कान लाल झाले.

'मला म्हायतेय, तुला भांडण काढायचंय ! माझा बदला घ्यायचाय !'

'छे! काहीतरीच काय! मी तर ते कधीच विसरलो. आपण फक्त शेकोटी पेटवू. वाटलं तर त्यावर काठ्या झाळून त्याच्यावर नक्षी कोरू. माझ्याकडे चांगला चाकू आहे. कालच धार करून आणलाय!'

मधल्यामधे माझी परिस्थिती अवघड बनली. फसवून रानात न्यायचं आणि मग कानफटीत द्यायची ते निराळं. त्यालाही काही बोलता आलं नसतं 'करावं तसं भरावं !' म्हणतात ना ! आणि सगळं बोलणं झाल्यावर तसं करणं निराळं! जर वित्काने आढेवेढे घेतले असते, 'नाही' म्हणून मग तो इच्छेविरुद्ध रानात आला असता, तर सगळं काम खूप सोपं होतं. पण माझ्या बोलण्यावर तो या कानापासून त्या कानापर्यंत तोंड पसरून हसला. (त्याचं तोंडच असं आहे. पसरलं की या कानापासून त्या कानापर्यंत) आणि खुशीने तयार झाला.

'ठीक आहे तर मग! जाऊ या आपण.'

'जाऊया काय? दाखवतोच तुला कसं जाऊ या ते!'

मी माझ्या मनाशी म्हणालो. आम्ही रानाची चढण चढून जात असताना सगळा वेळ मी त्याने मला कसं काही कारण नसताना पाठीवर मारलं, मला किती दुखलं, माझा किती अपमान झाला आणि याचं उट्टं फेडायचंय असा मी दृढनिश्चय कसा केला आहे ते मनाशी आठवत राहिलो. हे सारं मला इतकं व्यवस्थित आठवलं की जणू ते आत्ताच घडलं असावं. तेव्हासारखीच पुन्हा माझी पाठ दुखायला लागली, घशात पुन्हा कडूकडू आवंढा दाटून आला आणि खालचा ओठ पण थरथरायला लागला. याचा अर्थ मी चांगलाच रागावलो होतो आणि सूड घ्यायला तयार झालो होतो.

जिथपासून फरची लहान-सहान रोपं सुरू झाली होती नेमकं तिथेच नशीबानं चांगली संधी चालून आली. वित्का माझ्यापुढं चालला होता. तो खाली वाकला आणि जमिनीवरचं काहीतरी निरखून बघायला लागला. त्याचा अजूनच बाहेर आल्यासारखा वाटणारा कान जणू मला म्हणायला लागला, 'सगळ्या ताकदीनिशी मला मार ठोसा!'

'हे बघ ! हे बघ !' जमिनीवर खोलवर गेलेलं एक बीळ दाखवत वित्का ओरडायला लागला. त्याचे डोळे उत्तेजितपणे चमकत होते. 'तिथून मधमाशी आली बाहेर. मी स्वत: पाहिली. चल आपण इथे खणू या का? आत मधाने भरलेले पोळं असेल एखादेवेळेस!'

'ठीक आहे! हे बीळ खणू या आपण. मग बघ मी तुझा बरोबर निवाडा करतो,' मी ठरवले.

'काठ्यांना चांगलं टोक करून घ्यायला पाहिजे. मग त्यांनी खड्डा खणू. चाकू आणलायस ना?'

आम्ही ताबडतोब दोन

दांडक्यांना चांगलं टोक केलं आणि प्रत्येकजण एकएक दांडकं घेऊन खणायला लागलो. तिथे सराटा इतका माजलेला होता की आम्हा दोघांचीही पहिली दांडकी मोडली. मग आम्ही दुसरी दोन दांडकी टोकं करून घेतली, तेव्हा कुठे आम्हाला मऊ जमीन लागली. मात्र बिळात मध सोडाच पण रिकामं पोळंसुद्धा सापडलं नाही. पूर्वी कधीतरी कदाचित इथे मधमाशा राहात असतील पण आता मात्र तिथे काहीच नव्हतं आणि वित्काने बघितलेली मधमाशी तिथे कशासाठी गेली होती, ते काही आम्हाला कळलं नाही !

रानाच्या कडेला गवतावर तांबड्या रंगाच्या अळंब्यांचा एक थवाच आमच्या नजरेला पडला. म्हणजे वित्काच्या नजरेला पडला. त्याचे डोळे चहा प्यायच्या बशांसारखे मोठे आहेत ते काही उगीच नाही!

हिरव्यागार गवतावर चांगल्या पिकलेल्या, लालबुंद पाईनच्या रानात सापडणाऱ्या अळंब्या उगवल्या होत्या आणि दिवसभर सूर्य माथ्यावर तापत असूनसुद्धा त्या हाताला बेडकुळ्यांसारख्या गार लागत होत्या. सगळ्यात मोठ्या अळंबीच्या तांबड्या टोपीवर मधोमध, जणू छान दिसावं म्हणून कुणी मुद्दाम ठेवला असावा असा स्वच्छ पाण्याचा एक थेंब होता. अळंब्या दोरीला बांधून भाजता आल्या असत्या पण मीठ नाही.! नाहीतर छान न्याहारी झाली असती.

''हात् तुझी ! मीठ नाही.'' वित्का म्हणाला, 'रान काही लांब नाही. आपण जाऊन परत येऊ आणि आईकडून एक एक अंडं पण घेऊन येऊ.''

''हात् तुझी; मीठ नाही.'' मी मनातल्या मनात म्हणालो आणि माझ्या दुष्ट बेताची पुन्हा एकदा उजळणी केली. ''हे सारं एवढ्यावरच संपेल असं समजू नको. मीठ घेऊन परत आलो की रानात तुला बरोब्बर ठोकतो. मला चुकवायला जमणार नाही तुला !''

आम्ही जाऊन मीठ आणि दोन कोंबडीची अंडी घेऊन आलो.

''आता चल खड्डा खणू या.''

आम्ही अंडी खड्ड्यात ठेवली. वर माती लोटली आणि त्याच जागेवर शेकोटी पेटवायच्या धगीमुळे माती चांगली तापेल आणि आतली अंडी खरपूस भाजून निघतील. मग ती निखाऱ्याजवळ राखेत जरा वेळ धरली की झालं! म्हणजे त्यांना धुरासा वास लागेल!

आम्ही अगोदर देवदाराची एक छोटीशी, झुपकेदार पण पूर्ण वाळलेली, वाळून लाल पडलेल्या सुईसारख्या पानांची फांदी पेटवली. काड्यापेटीच्या एकाच काडीत, ती अशी धडाकून पेटली की जणू जळण्यातच तिला खूप आनंद होत होता. जणू शेकोटीत असं जळण्याखेरीज इतर काहीही तिच्यासाठी जास्त आनंददायी नव्हतं. ती जणू काही जळत नव्हतीच तर नाचत होती! तांबडाभडक झगा घालून एखादी छोटी पोर नाचावी तशी!

तसं बघितलं तर वित्का काही फार वाईट मुलगा आहे असं नाही आणि रानात आम्हाला मजा येत होती. फक्त त्याने मला त्यादिवशी पाठीत का मारलं कोणास ठाऊक? आता शेकोटी संपेपर्यंत मला थांबावं लागणार.

त्या पेटलेल्या देवदाराच्या फांदीवर आम्ही बारक्या बारक्या वाळक्या काटक्या ठेवायला लागलो. आधी आम्ही त्या एकावर एक आडव्या उभ्या ठेवल्या आणि मग मधोमध तंबूसारख्या उभारल्या. जशा जशा जाडजाड काटक्या आत जायला लागल्या तशी आमची शेकोटी पण एकसारख्या जोमदार ज्वाळा टाकत जळू लागली. जरी लहानशीच शेकोटी असली तरी ती लवकर विझणार नव्हती. अगदी तिच्यात आणखी काटक्या टाकल्या नाही तरी!

मग आम्ही अळंब्यांच्या मागे लागलो. वित्काने जेव्हा आपली पहिली अळंबी दोरीला बांधली तेव्हा त्याने दोरीला बांधलेल्या मातीच्या ढेकळाने मला कसे मारले होते ते



आठवले आणि त्याचा हिशोब आत्ताच चुकवावा असा विचार मनात आला. पण त्यासाठी अजून



**उरात माझ्या होय कसेसें ! गिळे आतल्या आत उसासे। धडधड माझ्या हृदयी चाले! जीव सारखा मग तळमळे।**

पुष्कळ वेळ आहे असे मी ठरवले. मग माझी अळंबी दोरीला बांधली. अळंब्या ज्वाळेमध्ये चुरचुरत होत्या. त्यावरचे मीठ वितळून सगळीकडे पसरत होते. कधी कधी अळंबीला फोड येत होते. स्स् असा आवाज करत, मीठ म्हणा, अळंब्याचा रस म्हणा, कसलेतरी थेंब शेकोटीत पडत होते. दोरीचं टोक काळं पडून धुमसत होतं. आम्ही सगळ्या अळंब्या खाऊन फस्त केल्या पण आमची इच्छा संपली नाही. इतक्या चविष्ट आणि भरीव होत्या त्या म्हणून सांगू ! मीठ पण उरलं होतं ते कसं टाकून द्यायचं म्हणून मग आणखी अळंब्या शोधाव्या लागल्या.

आम्ही शेकोटीखालच्या जमिनीतून अंडी खणून बाहेर काढली तेव्हा जमिनीतून वाफ बाहेर आली, इतकी ती छान वाफली, शेकली गेली होती. अंडी अगदी पाहिजे तश्शी भाजली गेली होती, हे का सांगायला पाहिजे ! मिठाच्या उरलेल्या कण्यांबरोबर आम्ही ती खाल्ली. इतकी चविष्ट अंडी मी यापूर्वी कधीच खाल्ली नव्हती. अंडी अशी भाजायची कल्पना वित्काचीच बरं का! त्याला अशा कल्पना सुचत असतात. त्याचे कान दोहो बाजूंनी बाहेर आल्यासारखे दिसतात ते काय उगीच की काय?

झालं, शेकोटी जळून विझली. आता घरी जायचं. मग वाटेत मला त्याला ठोकावंच लागणार...... तसं बघितलं तर इतक्या लवकर घरीसुद्दा जावंसं वाटत नव्हतं.

''चल, नदीवर जाऊ!' मी वित्काला म्हटलं. तिथे अंघोळ करू. अंग किती घाण झालंय! गार गार पाणी थोडं पिऊया. चल लवकर!''

आमच्या खेड्यात आम्हाला सगळंच अगदी जवळ आहे. रान म्हणू नका, नदी म्हणू नका. स्वच्छ वाहत्या धारेत आम्ही गुडघ्याइतक्या पाण्यात उभे राहिलो. आता सप्टेंबराच्या अखेरीस पाणी चांगलंच गार आहे. आम्ही पाण्यावर ओणवे झालो आणि तसेच वाकून त्या पाण्याचे चवदार घोट घेतले. विहिरीतल्या पाण्याची किंवा घरातल्या हंड्याच्या नळातून येणाऱ्या पाण्याची या पाण्याशी तुलनाच नको! पाण्यातून नदीचा तळसुद्धा दिसतोय-गोटे, वाळू आणि लव्हाळी. तळावर लव्हाळी पसरली आहेत आणि जिवंत असल्यागत त्यांची हालचाल चालू आहे.

पाणी प्यायलं, अंग धुतलं. आता घरी जाण्याशिवाय दुसरं काय करणार? माझ्या पोटात बाक्बुक् व्हायला लागलं. वित्का बिनघोरपणे पुढे चालला होता. त्याचे कान दोन्ही बाजूंना बाहेर आल्यासारखे दिसत होते. त्याला वळवून एक ठोसा ठेऊन देणं सोप्पं होतं.

काय करावं? विचार करा, इतक्या निर्धास्तपणे तुमच्या पुढे चाललेल्या माणसाला मारणं वाटतं तितकं सोपं नाही.

खरं सांगायचं तर माझ्या मनातल्या दुष्टाव्याचा आता कुठे मागमूसही नाही. शेकोटीनंतर, नदीवरच्या सफरीनंतर मला इतकं छान वाटतंय! शिवाय वित्का काही इतका वाईट मुलगा नाही. त्याला सारख्या काही ना काही कल्पना सुचत असतात. अंडी घेऊन येऊ हे



त्यालाच तर सुचलं......

ठीक आहे. जर का त्याने पुन्हा एकदा मला पाठीवर मारलं तर मग मी त्याला सोडणार नाही. यावेळी जाऊ दे.

वित्काला मारायचं नाही हा निर्णय घेतल्यावर माझं मन हलकं झालं आणि दोन जिवलग मित्र असावेत अशा तऱ्हेने आम्ही जोडीने गावात शिरलो.

***

'ब्लादीमीर सलऊखीन
या मूल रशियन कथेचा
अनुवाद :-**अनघा भट-बेहेरे**
३, बसंत बहार अपार्टमेंट,
११९ ब, प्रभात रोड, पुणे.

# रोजच्या आचरणात 'स्वदेशी' – लेख ५ भारतीय खेळ

- विश्वनाथ गुर्जर



''आऽऽउज दॅट्'' – पोरांनी एकदम जोराने गिल्ला केला. ''काय झालं?'' असं म्हणून सुशिलाबाई स्वयंपाकघरातून बाहेरच्या खोलीत आल्या. त्यांचा अमित आणि त्याचे पाच–सहा मित्र दूरचित्रवाणीसमोर बसून क्रिकेटचा सामना पाहण्यात अगदी रंगून गेले होते. वास्तविक उद्यापासून अमितची सत्रान्त परीक्षा सुरू होणार म्हणून अभ्यासाला ही सगळी मित्रमंडळी, त्यांच्या घरी जमली होती. अर्धा तास अभ्यास केल्यावर लगेच सगळे ''आता अगदीच बोअर झालो! आई, थोडा वेळ आम्ही मॅच पाहातो ना!'' असं म्हणून आईच्या परवानगीची वाट न पाहता, त्यांनी टी.व्ही. सुरू केला आणि आता जवळजवळ तास होत आला तरी पुन्हा अभ्यासाला बसण्याची काही चिन्हं दिसत नव्हती.

अमितच्या मित्रमंडळींचं क्रिकेटची मॅच पाहणं रंगात आलं असताना, अमितचे मामा त्याच्या घरी आले आणि त्यांच्यासमोर आईने पुन्हा उद्याच्या परीक्षेची आठवण करून दिल्यामुळे ''आता फक्त शेवटचीच ओव्हर पाहतो'' असं म्हणून अमित पुन्हा टी.व्ही. पाहण्यात रंगून गेला. ''अगं सुशीला, ही लहान पोरंच काय पण अगदी प्रौढ आणि म्हातारी माणसंसुद्धा क्रिकेटच्या वेडाने 'पागल' झालेली असतात. शासकीय कार्यालयातले कर्मचारी तर संप केल्याप्रमाणे कामाच्या वेळात सामना पाहाणं किंवा निदान ट्रान्झिस्टरवर कॉमेंट्री ऐकणं हा जणू काही आपला कायदेशीर हक्कच आहे, अशा आविर्भावात कार्यालयात वागत असतात. सगळ्या समाजाचंच भान सुटत चाललंय, तिथे या पोरांना काय बोलायचं? आमच्या खो–खो, आट्यापाट्या अन् कबड्डीच्या वाट्याला मात्र हे दृश्य येत नाही.''अमितची ती ''शेवटची'' ओव्हर होईपर्यंत मामांनी ही दोन–चार वाक्यं टाकली.

ते ऐकून अमितने काहीशा लटक्या रागाने मामांना प्रश्न टाकला– 'पण मामा, तुमचा क्रिकेटलाच एवढा विरोध का?''

''अरे अमित, माझं क्रिकेटशी मुळीच भांडण नाही. माझा विरोध आहे तो आंधळ्या अनुकरणाला. हे जे एखाद्या मेंढरासारखं एखाद्या खेळाच्या, एखाद्या हीरोच्या, एखाद्या नटीच्या, एखाद्या फॅशनच्या मागे धावणं असतं त्याला माझा विरोध आहे. अरे आपले खो खो, आट्यापाट्या (हे इतके चांगले खेळ असताना तुम्हाला तो महागडा, परदेशी खेळ एवढा का आवडतो हेच मला कळत नाही!''

''मामा, सगळ्या जगभर खेळला जाणारा क्रिकेट तुम्हाला आवडत नाही म्हणजे...'' अमितने पुढचे शब्द न उच्चारुन केवळ अभिनयानेच आपल्या मनातला आशय व्यक्त केला. ''अमित, तुझे मामा कॉलेजच्या क्रिकेट टीमचे कप्तान होते बरं का आणि त्यांनी जर तो खेळ पुढे चालू ठेवला असता तर ते नक्कीच राष्ट्रीय स्तरावर गेले असते!'' सुशीलाबाईंनी अमितच्या 'जनरल नॉलेज' मध्ये भर घातली आणि अमित जरा वरमलाच.

''अमित, माझ्या तरुणपणात मी क्रिकेटप्रमाणे खो खो, कबड्डी, आट्यापाट्यासुद्धा खेळत होतो बरंका; आणि खरं सांगायचं तर खो खो, आट्यापाट्या खेळताना मी जे स्टेपिंग आणि डायव्हिंग शिकलो ना, तेच मला पुढे क्रिकेटमध्येही उपयोगी पडलं. खो खोमुळे माझा स्टॅमिना वाढला, हालचालींमध्ये चपळपणा आला. क्रिकेटमधील अनेक कौशल्ये मी क्रिकेट न खेळता, आधी खो खो, कबड्डी, आट्यापाट्यात शिकलो.'' एरवी बोलताना काटेकोरपणे मराठी शब्दांचाच वापर करणाऱ्या मामांनी, मुद्दाम काही इंग्रजी शब्दांची पेरणी करत अमितला ही माहिती दिली.

''नाहीतरी आमच्या लहानपणी क्रिकेट खेळण्याएवढी आमची ऐपतच नव्हती.'' सुशीलाबाईंनी आपले गरिबीचे दिवस आठवत अभिमानाने उद्‌गार काढले.

''आणि बरं का अमित, क्रिकेट सगळ्या जगभर खेळला जातो हे जे काही तुझं मत आहे ना ते एकदा थोडं तपासून पाहा आणि मला अमेरिका, रशिया, फ्रान्स, जर्मनी, चीन, जपान इ. अनेक आधुनिक देशांमधल्या जगप्रसिद्ध क्रिकेट वीरांची नावे सांग बरं!''

मामांच्या या गोलंदाजीने अमितचा तर त्रिफळाच उडाला. ''खरंच की, आपल्याला उगाच वाटत होतं की क्रिकेट जगभर खेळलं जातं.'' अमितचा एक मित्र पुटपुटला.

अमितच्या मामांना भारतीय क्रीडाप्रकारांचे उत्तम मार्गदर्शक म्हणून द्रोणाचार्य पुरस्कार मिळाला होता. ते अमितला म्हणाले, ''अमित, तुझी परीक्षा संपली की तू एकदा तुझ्या या मित्रांबरोबर आमच्या शिवाजी मंदिरात ये तर! मग बघू पुढचं.'' अमित आणि त्याचे मित्र परीक्षा संपल्यावर सहज कुतूहलाने शिवाजी मंदिरात गेले. त्याच्या शाळेच्या क्रिकेटच्या मैदानाच्या निम्मं मैदान होतं ते. पण

तेवढ्या जागेत दोन खो खोची, दोन कबड्डीची, दोन लंगडीची मैदानं होती. सात-आठ मल्लखांब होते. एक कुस्तीचा आखाडा होता आणि एक सभागृह होतं. त्या तेवढ्या जागेत लंगडीचा खेळ खेळणाऱ्या वय वर्षे ८ पासून नियमितपणे योगासनं करण्यासाठी येणाऱ्या वय वर्षे ८० पर्यंतच्या सुमारे १०० जणांचे विविध खेळ आणि व्यायाम चालू होते.

खो खोच्या मैदानापाशी अमित आणि त्याचे मित्र खेळ पाहात असताना, पाठलाग करणाऱ्या एका मुलाने पळता पळता एकदम अंग झोकून दिले आणि सुमारे ८-१० फूट लांब सूर मारून पळणाऱ्या मुलाच्या पायावर हात मारला, लगेच 'मारलाय' असं पाठलागाच्या संघातील सगळ्यांनी जोरात ओरडून 'अपील' केलं आणि बाद झालेला मुलगाही खिलाडूवृत्तीने स्वत:च हात वर करून मैदानाच्या बाहेर जाऊन बसला. त्याचा सूर पाहून अमितच्या डोळ्यापुढे एकदम क्रिकेटमधल्या एखाद्या कसलेल्या यष्टिरक्षकाने अचानक सूर मारून प्रतिस्पर्धी खेळाडूला झेलबाद केल्याचं आणि त्याच्या संघातील सगळ्यांनी 'आऽऽउज दॅट' असं जोरात अपील केल्याचं दृश्य तरळलं. पाठलाग करणाऱ्या एकेका गड्याला हुलकावण्या देत एका खेळाडूने विरुद्ध पक्षाच्या सगळ्या चांगल्या खेळाडूंना अशा जागी बसवून ठेवलं की त्यांना जवळजवळ दोन मिनिट उठण्याची संधीच मिळाली नाही. संपूर्ण ७ मिनिटं पळती करून तो नाबाद राहिला. तेव्हा त्याच्या संघातील खेळाडूंनी जो जल्लोष केला तो पाहून अमितला, क्रिकेटमध्ये नाबाद राहून शतक काढणाऱ्या 'सुनील', 'सचिन' ची आठवण झाली. ''क्रिकेटमधली अनेक कौशल्यं मी क्रिकेट न खेळताच आधी खो खो, आट्यापाट्या मध्ये शिकलो'' या मामांच्या वाक्यांचा अर्थ आपल्याला आता हळूहळू कळू लागलाय, असं अमितला वाटलं आणि त्याला खो खो, कबड्डी, आट्या-पाट्या या खेळांबद्दल कुतूहल वाटू लागलं.

हळूहळू अमित रोज शिवाजी मंदिरात जाऊ लागला. मामा प्रत्येक खेळाच्या संघातील मुलांना आठवड्यातून किमान दोन दिवस तरी त्यांच्या खेळाच्या व्यतिरिक्त इतर खेळ खेळायला लावत. सगळ्या संघांमधील सर्व मुलांनी आठवड्यातील दोन दिवस थोडा वेळ मल्लखांब आणि दोन दिवस थोडा वेळ कुस्ती करायला पाहिजे, असाही त्यांचा आग्रह असे. त्यामुळे शिवाजी मंदिरात प्रत्येक संघातील मुलगा एका खेळातील उत्तम प्रावीण्याच्या जोडीने इतर खेळ व व्यायाम प्रकारातील, काही किमान पातळीवरील कौशल्ये मिळवीत असे. शिवाजी मंदिरात सर्व मुलांना आसनं आणि सूर्यनमस्कार शास्त्रीय पद्धतीने शिकवले होते.

रोज खेळ सुरू होण्यापूर्वी सर्वजण एकत्र उभे राहून 'मारुतिस्तोत्र' म्हणत असत; खेळ संपल्यावर सर्वजण एकत्र बसून एखादं राष्ट्रभक्तीपर गीत म्हणत. त्यानंतर मारुतिस्तोत्र होऊन दोन मिनिटं ध्यान आणि तीन वेळा ओंकाराचं उच्चारण होऊन कार्यक्रम संपत असे.

हळूहळू अमितच्या अनुभवाला येऊ लागलं की आपल्याला एक तासभर उन्हात क्रिकेट खेळून जेवढा घाम येत होता आणि दम लागत होता तेवढाच घाम खो खो मध्ये ३-४ मिनिटांची पळती करून येतो. पण असं भरपूर दमल्यानंतर सर्वजण एकत्र जेव्हा महाबळी प्राणदात्या मारुतिरायांचं स्मरण करतात, तेव्हा खरोखरच शरीरात जणू काही नवीन प्राणशक्तीचा संचार होतो; तसेच दोन मिनिटांच्या त्या नि:शब्द ध्यानावस्थेत शरीराला आणि मनाला एवढी विश्रांती मिळते आणि मन इतकं ताजंतवानं होतं की जणू काही ७-८ तासांची छान झोप होऊन, नव्या दिवसाच्या स्वागताला आपण उत्साहाने सज्ज झालो आहोत.

रोजचं 'मनोजवं मारूततुल्यवेगं...म्हणताना हळूहळू अमितच्या हेही लक्षात येऊ लागलं की शरीरात चापल्य आणि शक्ती हवी. त्याचबरोबर इंद्रियांवर आणि मनावर जय मिळवायला हवा, जितेंद्रिय व्हायला हवं, तसेच 'बुद्धिमत्तां वरिष्ठ' असायला हवं. शरीर, मन, बुद्धी या सगळ्या साधनांचा संतुलित विकास करण्यावर आणि असं व्यक्तिमत्त्व त्या श्रीरामदूताप्रमाणे ईश्वरशरण आणि समाजशरण असण्यावर मामा जो भर देत असत, त्यातील सखोल दृष्टी अमितच्या आता हळूहळू लक्षात येऊ लागली.

हे सगळं जसजसं त्याला कळायला लागलं, तशी तशी त्याची दृष्टीच बदलून गेली. आपण ज्या मातीत जन्माला आलो, तिथल्या पूर्वजांनी खेळ, व्यायाम प्रकार, शरीर, मन, बुद्धी, व्यक्ती आणि समाज या सगळ्याचा किती सखोल आणि साकल्याने विचार केला आहे, हे पाहून अमितचं मन अभिमानाने भरून आलं आणि त्यानेही निश्चय केला की आपणही आपल्या मामांप्रमाणे, विदेशी खेळ खेळलो तरी स्वदेशी खेळ आणि व्यायाम प्रकार यात कौशल्य मिळवून त्यातील रहस्य जाणून घ्यायचे, केवळ फॅशन म्हणून परदेशी गोष्टींच्या मागे धावायचे नाही.

***

**- प्रा. विश्वनाथ गुर्जर**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.



**कधी वाटतं खेळावं, घामानं निथळावं, व्यायामाच्या धुंदीत, शरीर कमवावं**

कथा विशेषांक

(संस्कार कथा)

# पॉकेटमनी

-अनघा लवळेकर

रस्त्यावरच्या तुडुंब गर्दीतून झपझप पावलं उचलत सत्येन शाळेत चालला होता. खांद्यावर जड दप्तराचं ओझं. एका हातात वॉटर बॅग, डब्याची पिशवी आणि दुसऱ्या हातात आठवणीनं घेतलेली हॉकीस्टीक; अशा



सरंजामासह चाललेल्या सत्येनचं लक्ष मात्र सारखं इकडेतिकडे भिरभिरत होतं. 'नको रे देवा-आज तरी त्या मोहनचं तोंड दिसायला नको. या देवळीच्या पारापाशी पोचलं की छातीत धडधडायलाच लागतं आपल्या. एकदा फसलो ते फसलो. आता परत त्या मोहनशी गाठ नको.' डोक्यात विचारांची गुणगुण चालू असतानाच एकदम पाठीवर थाप पडल्यामुळे सत्येन दचकला. मागे वळून बघतो तो राहुल. ''ह्या! तूच होय! मी कसला घाबरलो होतो.'' ''मला माहीत आहे - तू मोहनला घाबरतोस ते. मी पाठीवर थाप मारली आणि तुला वाटलं मोहनच - हो की नाही?'' राहुल मिस्किलपणे हसत म्हणाला. ''हो ना - अरे, त्या मोहनची मला जाम भीती वाटते.'' ''पण का? किती दिवस मला तुला हे विचारायचंच होतं.'' राहुल सत्येनच्या खांद्याभोवती हात टाकत म्हणाला.

सत्येनच्या डोळ्यापुढे दोन महिन्यांपूर्वीची रविवार सकाळ उभी राहिली.

''आईऽ एऽ आई'' सत्येनच्या टीपेत मारलेल्या हाका ऐकून पदराला हात पुसत आई बाहेर आली. ''अरे, का एवढा ओरडतोयस मघापासून? काम संपेपर्यंत दम नाही का?'' ''आई, मी तुला सांगितलं होतं ना मागच्या बुधवारी-की या महिनाअखेर आम्ही मित्र मित्र मिळून सिनेमाला जाणार आहोत. आई गं - तिकीटाचे पैसे आज द्यायचेत गं - दे ना वीस रुपये प्लीज.'' सत्येन आईला लाडीगोडी लावत म्हणाला. ''अरे - पण परवाच्याच सोमवारी तू माझ्याकडून तीस रुपये घेतले होतेस ना त्याच्यासाठी - मग आता काय पुन्हा?'' ''अगं, ते काय झालं ना की सगळे जण म्हणाले, 'आजचा वडापाव सत्येनला लागू' - त्या दिवशी मी क्रॉसकंट्रीमध्ये पहिला आलो ना म्हणून - संपले गं ते पैसे त्याच्यात - दे ना आई प्लीज !' आई सत्येन समोर येऊन बसली. निर्धारानं पण समजावणीच्या सुरात म्हणाली, ''सत्येन हे बघ - कशात पैसे घालायचे आणि कशात नाही याचा विचार आपणच करायला हवा की नाही? तू पैसे घेतलेस एका कामासाठी आणि खर्च केलेस तिसऱ्याच गोष्टीसाठी - खरं की नाही? तेसुद्धा एकदम. आता सिनेमावर तुला पाणी सोडायला लागणार. तुला मी दर महिन्याला जे पन्नास रुपये देते ते तू दहा दिवसात संपवलेस, त्याला मी काय करू?''

सत्येन चिडून म्हणाला, ''मला माहीतच होतं, तू असं बोलणार म्हणून. त्या रवीची आई बघ- केव्हाही मागितले की पन्नास रुपये काढून देते. कध्धी हिशोब विचारत नाही आणि त्या सुधेन्दुचे बाबा रोज त्याला विचारून लागतील तसे पैसे देतात. हा कसला माझा पॉकेटमनी? पन्नास रुपये - हुडूत!'' ''हे बघ सत्येन, तू अजून नववीत शिकतोयस. आत्ता असे खर्च करणं तुम्हाला खरंच गरजेचं आहे का?'' आई शांतपणानं उठून गेली. सत्येनला अगदी राग आला होता आईचा. आपण सिनेमाला गेलो नाही म्हणजे काही दमच नाही. सगळ्यांना चिडवायला मग आयतंच कारण. आधीच तो रव्या चिडवत असतो आपल्याला - 'चिक्कू चिक्कू' म्हणून. आतातर काय निमित्तच मिळेल त्याला. हॅं! कसंही करून जायलाच हवं सिनेमाला! सत्येनच्या डोक्यात विचारचक्र सुरू झालं.

दुसऱ्या दिवशी शाळेत जाताजाताच, इकडे तिकडे बघत

सत्येन शाळेजवळच्या छोट्या गल्लीत शिरला. तिथेच मोहनचा कंपू बसत असे. मोहनबद्दल त्यानं उडतउडत मित्रांकडून ऐकलं होतं की तो दोन तीनदा नापास झाला होता. मग शाळा सोडून देऊन तिथेच त्यानं एक पानाचा ठेला टाकला होता. पण त्याचा मुख्य व्यवसाय म्हणजे मुलांना पैसे हातउसने द्यायचे आणि मग वसूल करायचे. एरवी सत्येन तिकडे फिरकलाही नसता; पण आज अगदीच 'इज्जत का सवाल' होता. पैसे दिले नसते तर रवीनं आणि सुधेन्दुनं त्याला चांगलंच घोळात घेतलं असतं. वर कंजूसपणाचा शिक्का आणि ग्रुपमध्ये नाचक्की होण्याची भीती होतीच. हळूच सत्येननं हाक मारली, ''मोहनदादा, ए - मोहनदादा'' ''काय रे - काय हवंय - बोल कुठला देऊ पानमसाला लवकर बोल.'' पानाचा तोबरा भरलेल्या तोंडानं मोहननं विचारलं. ''नाही-म्हणजे - मला गुटखा नकोय'' ''नको? मग आला कशाला हितं?'' ''ते सिनेमा बघायला....'' ''ऑ?'' ''नाही म्हणजे सिनेमा बघायला मित्रांना पैसे द्यायचेत ना उसने,'' शब्द चाचपडत सत्येन बोलू लागला. ''अरं, मग असं सांग ना - किती हवेत पैशे - शंभर, पाचशे, हजार?'' ''नाही नाही'' गडबडून सत्येनच्या तोंडून शब्द फुटेना. ''त-तीस हवेत फक्त, रुपये!'' ''हॅ! तीस रुपये? नवीनच दिसतंय बेणं.'' मोहनदादा गडगडून हसत म्हणाला. ''तुला म्हायत आहे ना - आज तीस नेले तर तीन



दिवसात परत - नायतर रोजचा एक रुपया वाढला. म्होरल्या आठवड्यापासून रोजचे दोन रुपये वाढले. महिन्यानंतर पैसे दुपटीनं परत करायला लागतील.'' ''हो हो मी लगेच परत करीन. अगदी उद्याच.'' सत्येन घाईघाईनं म्हणाला. मग कितवीत, कोणत्या तुकडीत वगैरे चौकशी करून मोहनदादानं दहा रुपयांच्या तीन नोटा सत्येनच्या खिशात कोंबल्या. त्या दिवशीची बेईज्जती तर टळली. हा विचार करून सत्येन विजयी मुद्रा करून शाळेत आला. हाच प्रकार नंतर दोन-तीनदा घडला. पंचवीस-तीस रुपये म्हणजे तशी किरकोळ रक्कम होती. प्रॅक्टिकल किट आणायचंय, क्लासचे जादा नोट्सचे पैसे द्यायचेत, अशा सबबी सांगितल्यावर बाबा सहज पैसे काढून द्यायचे. सत्येनला हे सोपं वाटू लागलं. तरीही मनात कुठेतरी एक टोचणी सलत होतीच. जे चाललंय ते काही योग्य नाही. आपण असं वागायला नकोय, हे कळत होतं पण वळत नव्हतं.

त्यातच मागच्या आठवड्यात सुधेन्दुच्या घरी सगळ्यांना पार्टीला बोलावलं होतं. असली पार्टी म्हणजे कॉन्ट्रीब्युशन' आलंच. या वेळी रवीनं वेगळीच टूम काढली. सुधेन्दुच्या घराजवळ एक पूल पार्लर होता. तिथे जाऊन एक तरी गेम खेळायचा. पण त्याची फी होती शंभर रुपये. एवढे पैसे आणायचे म्हणजे - मग त्याला परत एकदा मोहनदादाची आठवण झाली. आतापर्यंतचे पैसे लगेचच परत केले असल्याने तो अगदी रुबाबात पैसे मागायला गेला. पैसेही मिळाले. पण मोहनने बजावले. ''सत्येन, शंभर रुपये मांडून ठेवतोय. दोन दिवसात परत केले नाहीस तर रोजचे पाच रुपये वाढले बघ. जमनार असलं तरच घ्यायचे.'' पण सत्येनच्या डोळ्यांसमोर सुधेन्दुच्या घरातली पार्टी आणि पूलमधला धुडगूस दिसत होता.

पार्टी तर मस्तच झाली, पण दुसऱ्या दिवसापासून सत्येनच्या डोक्यात भुंगा फिरू लागला. काय बरं सांगावं बाबांना आता? शंभर रुपये मागितले तर एकदम कसे मिळतील? शेवटी स्नेहसंमेलनाची वर्गणी आणि नवीन वह्यांसाठी मिळून मागावेत, असं ठरवून तो घरी गेला. संध्याकाळी उशीरापर्यंत बाबा आले नाहीत. ''आई गं, बाबा का नाही आले गं?'' सत्येननं चिंतेनं विचारलं. मुदत उद्या संपत होती. सत्येनच्या पोटात गोळा यायला लागला. ''अरे



**फुलपाखरांशी खेळावे, मनाप्रमाणे वागावे। जेथे जीवन, तेथष न्हावे, हा अमुचा अधिकार।।**

आजच ऑफिसच्या एका महत्त्वाच्या कामासाठी अचानक मुंबईला गेलेत ते. यायला पाच-सहा दिवस तरी लागतील.'' ''बाप रे'' सत्येन ओरडला. ''पाच-सहा दिवस?'' ''त्यात ओरडायला काय झालं? आज काय काय पहिल्यांदा जाताहेत का ते? तुझं काही काम होतं?'' आईनं विचारलं. ''नाही गं काम काय? तसं काही नाही-सहज विचारलं.'' सत्येननं सारवासारव केली. आईला बोलायची सोय नव्हती. तिनं तिच्या गप्पा-प्रश्नांतून सगळं काढून घेतलं असतं, याची त्याला खात्री होती.

त्याचदिवशी सुट्टीत मोहनची थाप सत्येनच्या खांद्यावर पडली. ''काय सत्या, कुठेत पैसे?'' ''नाही आज विसरलो-उद्या नक्की.'' ''उद्या एकशे पाच द्यायचे-काय?'' ''हो हो'' सत्येन कसाबसा म्हणाला. मोहनच्या बाकीच्या कीर्तीची त्याला कल्पना होती. नेमका त्याचदिवशी त्याला सडकून ताप भरला. तीन दिवस शाळा बुडली आणि आज क्रिकेटची मॅच असल्यानं जाणं आवश्यकच होतं. तेवढ्यात राहुलनं रस्त्यात गाठलं!

''ओ-असं आहे तर'' राहुल म्हणजे सत्येनच्या विजूदादाचा पक्का मित्र. त्याच्याच शाळेत शिकलेला. आता बारावीची परीक्षा देणार होता. एकीकडे कराटे आणि ज्युडोच्या क्लासमध्येही शिकवायचा. ''सत्येन,'' राहुल हळूच म्हणाला, ''हे बघ, तू जेव्हा इथून जाताना हळूच मोहनच्या टपरीकडे बघून तोंड फिरवलंस ना, तेव्हाच मी ओळखलं की काहीतरी आहे. मला आधी माहीत असतं तर हे झालंच नसतं. हे घे एकशे वीस रुपये, त्याला देऊन टाक आणि संध्याकाळी माझ्याबरोबर चल. मी तुला एक गंमत दाखवतो.'' राहुलने दिलेले पैसे देऊन सत्येनचा हात धरून त्याला आपल्या क्लासवर नेलं. एका जुनाट घरांच्या दाटीवाटीतल्या वस्तीमध्ये, छोट्याशा हॉलवजा टपरीत तो क्लास होता. ''राहुलदादा आला - राहुलदादा आला.'' मुलं ओरडली. सातवी-आठवीपासून कॉलेजमध्ये जाणाऱ्या वयापर्यंतची बारा-तेराजणं पुढे आली. 'सत्येन, हा किशोर- एकीकडे पेपर टाकतो, दुधाच्या पिशव्या पोचवतो आणि स्वतःच्या फीचे पैसे मिळवतो बरं का! तुझ्याएवढाच आहे. नववीतून आता दहावीत जाणार; आणि हा सुरेश- ह्याचंही शिक्षण चालू आहे. एफ.वाय.ला ना रे तू? सुरेश बुक बाईंडिंगची कामे करतो. शिवाय कॉम्प्युटर शिकून, काही ठिकाणी पडेल तशी कामं करतो. त्याच्या घरातले सगळेच त्याच्यावर अवलंबून आहेत. हा नफीस-ह्याची छोटीशी बेकरी आहे. दहावीनंतर शिक्षण सोडलंय त्यानं- पण अफाट वाचतो. मराठी आणि उर्दू दोन्ही. बरं का रे मित्रांनो, हा आपल्या सत्येन. हा पण खूप छान क्रिकेट खेळतो. आज आपल्याबरोबर गप्पा मारायला आलाय.'' सुरेश, नफीस, किशोर, बाळू, विशाल सगळ्यांबरोबर गप्पा मारताना संध्याकाळ कशी गेली, ते सत्येनला समजलंच नाही. सगळ्यांनी आपल्या आपल्या कामातले अनुभव, गंमती-जमती सांगितल्या. टी.व्ही. सिरियल्सवर जोरजोरात गप्पाही मारल्या. मधेच कुणीतरी आणून दिलेला सिंगल चहा, दोघा-दोघात मिळून मिटक्या मारत संपवला. ते सगळं अनुभवताना सत्येनच्या डोक्यात काहीतरी चमकत होतं. छातीत एक अनामिक हुंदका भरून येत होता. तेवढ्यात राहुल म्हणाला, ''बरं का सत्येन, मी मागच्या वर्षी कल्चरल प्रोग्रॅममधून एक महिना अमेरिकेला जाऊन आलो ना, तेव्हा मला एक महत्त्वाची गोष्ट कळली. अरे, तिकडे अगदी पंधरा-सोळाव्या वर्षीच मुलं काही ना काही काम करून, स्वतःचे पैसे स्वतःच कमवायला लागतात. माझ्या ग्रुपबरोबर एक डोरोथी नावाची तुझ्याएवढीच मुलगी होती. त्या कॅम्पला येण्यासाठीची फी तिनं आजूबाजूच्या घरांची अंगणं झाडून, गवत कापून मिळविली होती आणि तिचे वडील एका मोठ्या कंपनीत अधिकारी असतानाही बरं का.'' ''किशोर, नफीस, सुरेश मला शिकवाल का रे छोटी छोटी कामे करायला?'' सत्येन नकळत म्हणाला. ''अरे का नाही? नक्कीच.''

घरी परतल्यावर सत्येन गप्पगप्पच होता. आईला राहुल दादानं कानगोष्टीत सांगितल्यामुळे तिला सगळं माहीत होतं. राहुलच्या खिशातले पैसे आईनेच त्याला दिले होते, हे कुठे सत्येनला माहीत होतं? आईनं सत्येनच्या इतर मित्रांकडून



**मोठ्यांपासून खूप शिकावे, रोजच काही काम करावे ! फुलाफुलांशी गूज करावे, जुन्यातुनी जग नव निर्मावे !**



हळूच माहिती काढून, राहुलला सत्येनकडे पाठवलं होतं. सत्येनच्या डोक्यात आणि मनात काय चाललंय हे तिला चांगलंच समजत होतं. शेवटी आईच होती ना ती!

म्हणूनच सकाळी नाष्टा करताना जेव्हा सत्येन एकदम मोठ्या आवाजात म्हणाला, ''आई गं - तू बघच थोडे दिवसांत, मीच तुला उलटा पॉकेटमनी देणार आहे गं - मागणार नाही काही.'' तेव्हा आई खूप खूप समजूतदारपणे हसली आणि आपले भरून आलेले डोळे लपवत तिनं सत्येनच्या कपाळाची पापी घेतली.


***

- अनघा लवळेकर
'ज्ञानिया', पद्मावती,
पुणे ९.

## गोळाफुलीचा खेळ

बहुतेकांना हा खेळ परिचित असेलच. चित्र क्रमांक १ मध्ये दिलेल्या आकृतीत नऊ भाग (सेल) आहेत.

दोघा




चित्र क्र. १

प्रतिस्पर्धी खेळाडूंनी क्रमाक्रमाने एकेका सेलामध्ये किंवा भरायचे- एकाने फुली, दुसऱ्याने गोळा. जो एका सरळ रेषेत किंवा प्रथम काढून दाखवेल तो जिंकला. चित्र क्र.१ मध्ये फुलीवाल्याने डाव जिंकला आहे. अर्थात पुष्कळ वेळा हा सामना अनिर्णित राहतो. कारण पारस्परिक विरोधामुळे कोणालाच स्वत:चं चिन्ह एका सरळ रेषेत काढता येत नाही. वरील आकृतीत एकंदरीत ८ सरळ रेषा आहेत - तीन उभ्या, तीन आडव्या आणि दोन कर्णांच्या. एका मोठ्या चौकोनाचे तीन बाय तीन, असे नऊ भाग केले आहेत आणि प्रत्येक सेलमध्ये गोळा किंवा फुली काढता येते.

एक नवीन खेळ

आता ह्यापेक्षा अधिक बुद्धिरंजक खेळ पाहूया. दोन डायमेन्शन्समध्ये (म्हणजे एका समतलावर) चौकोन काढण्याऐवजी तीन डायमेन्शन्समध्ये एक घनाकृती ठोकळा काढूया. (चित्र क्र.२ पाहा) त्याचे तीन बाय तीन असे २७




चित्र क्र. २


भाग केले की प्रत्येक भाग म्हणजे एक लहान घनाकृती ठोकळा होतो. त्याला सेल म्हणूया.

आता दोघा प्रतिस्पर्ध्यांनी फुली आणि गोळा, क्रमाने प्रत्येक सेलमध्ये काढावेत, अशातऱ्हेने की प्रत्येकाचा प्रयत्न स्वत:ची तीन चिन्हे (किंवा एका रेषेत बसतील, अशा जास्तीत जास्त सरळ रेषा असाव्यात हा.

अर्थात ही घनाकृती काढून त्यात किंवा लिहिणे अवघड आहे. त्यावर उपाय म्हणजे चित्र क्र. ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे एकाखाली एक असे तीन चौकोन काढणे.

प्रत्येक चौकोन चित्र क्र. १ प्रमाणे ९ सेल मध्ये विभागला आहे. हे तीन चौकोन एकावर एक ठेवले की, चित्र क्र. २ मधली आकृती तयार होते. तिन्हीत मिळून एकंदर २७ सेल आहेत.

चित्र क्र. ३ मध्ये काढलेल्या फुल्यांच्या दोन सरळरेषा आहेत, पण गोळे-कुठलेही तीन- एका सरळ रेषेत नाहीत हे, ह्या चित्राचं



चित्र क्र. ३

व्यवस्थित अवलोकन केल्यास दिसून येईल.

हिशोब केल्यावर दिसून येईल की तीन सेल सरळ रेषेत असलेल्या एकंदर ४९ सरळरेषा घनाकृती ठोकळ्यात असतात. अर्थात दोन प्रतिस्पर्धी खेळाडू एकमेकांच्या मार्गात अडथळे आणणार, म्हणून दोघांचे 'स्कोअर' बेरीज केल्यावर ४९ पेक्षा पुष्कळच कमी भरतील. मग यंदाच्या सुट्टीत बुद्धिला थोडा ताण देणारा, हा खेळ खेळून पाहणार ना!

***

('गणितातल्या गमती जमती' या डॉ. जयंत नारळीकर यांच्या पुस्तकातून)

# जीवन-मृत्यूचा संघर्ष

– अनुवाद भाग्यश्री काकडे

*ही कहाणी आहे एका अशा भीषण संग्रामाची, ज्यामध्ये उतरली आहेत, जीवनाची दुर्दम्य इच्छा धरणारी माणसे आणि निसर्गाची विनाशकारी, प्रलयंकर क्षमता. डॉ. ज्ञानेश्वर राव हे भूज येथील प्रथितयश सर्जन आहेत. त्या भयंकर भूकंपाच्या दिवशी त्यांनी अनेक लोकांचे प्राण कसे वाचवले, हे वाचल्यानंतर आपणास नक्कीच संभ्रम होईल की या संग्रामातील जेता कोण?*

**डॉ. राव सांगतात,**

मी भूजमध्ये १९८७ पासून राहात आहे. हे शहर बऱ्यापैकी संथ आहे आणि इथले लोकही विशेष महत्त्वाकांक्षी नाहीत. हे इतकं लहान आहे की बहुतेक सगळेच एकमेकांना ओळखतात. त्या काळ्या दिवशी २६ जानेवारीच्या सकाळी मी बॅडमिंटन खेळत होतो. त्यावेळी झालेला भूकंप ही घटना अगदी अनपेक्षित होती. कारण या गावात मी एक घर व हॉस्पिटल बांधले, तेव्हा बांधकाम क्षेत्रातल्या कुणीही आणि कधीही याबाबत मला इशारा दिला नव्हता. फक्त कुमठेकर नावाच्या माझ्या आर्किटेक्ट मित्रानं भूज हे भूकंपप्रवण क्षेत्रात येत असल्याने तळघर न बांधण्याचा सल्ला दिला होता. शुक्रवारी सकाळी जे काही घडलं ते फारच भयंकर आणि हृदय छिन्नविछिन्न करणारं होतं. खूप वेळ धरणीची कंपनं थांबेचनात. मी पुन्हा पुन्हा आक्रंदत होतो, 'देवा, कधी थांबवणार आहेस हे तू?' धडाड्धड इमारती खाली कोसळत होत्या आणि धुळीच्या राक्षसी ढगांनी शहराला जणू वेढलं होतं. माझे वडील म्हणाले की जसं एखादं प्रचंड विमान तुमच्या डोक्यावरच उतरतंय की काय असं वाटत होतं.

जेव्हा मी बॅडमिंटन कोर्टमधून बाहेर पडलो तेव्हा भूज मृतवत् झालेलं होतं. ती पंधरा मिनिटे म्हणजे माझ्या उभ्या आयुष्यातली सर्वात वाईट वेळ होती. मी गाडीनं घरी गेलो तेवढ्यात माझी पत्नी अलका आणि मुलगी रडतरडत माझ्याचकडे येताना दिसल्या. आम्ही सर्वांनी एकमेकांना घट्ट धरून ठेवलं आणि अश्रूंना मोकळीक दिली.

लगेच मला माझ्या रुग्णांची आठवण आली आणि मी तातडीने हॉस्पिटलकडे पळालो. जाताना मी कुणाला तरी लिफ्ट दिली; पण खरं सांगतो माझ्या शेजारी कोण बसले होते, मला माहीत नाही. माझ्या सर्व संवेदना बधीर झाल्या होत्या. हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. माझा हॉस्पिटल स्टाफ खूप दक्ष आहे. त्यांनी सर्व पेशंटना बाहेर रस्त्यावर आणून ठेवलं होतं. तिथं पोहोचल्यावर स्टाफपैकी एकजण म्हणाला, 'सर सगळं काही उद्ध्वस्त झालंय, आता विसरा (हॉस्पिटल)' मला तिथं डॉ. महादेव पटेल भेटले. त्यांनी दुःखावेगानं मला मिठीच मारली आणि आम्ही खूप रडलो.

तेवढ्यात कुणातरी मला हलवून बोललं, 'डॉक्टर, तमे ढिला ताशो तो केम चलशे?' (भावार्थ: तुम्हीच असा धीर सोडून कसे चालेल?) भूजच्या त्या सुजाण गृहस्थानं मला भानावर आणलं आणि त्वरित कृती करा असंच जणू सुचवलं. मी अजूनही मानसिकदृष्ट्या तयार झालो नव्हतो. मी म्हणालो, 'मी एकटा काय करू शकणार? त्यापेक्षा आपण सरकारी दवाखान्यात जाऊ.' तो गृहस्थ म्हणाला, 'तुम्हाला माहितीये, ते केव्हाच जमीनदोस्त झालंय.' मी सुन्न झालो व माझा स्टेथोस्कोप शोधू लागलो.

दरम्यान म्हणजे सकाळी ९.३० च्या सुमारास हॉस्पिटलभोवती खूप लोक जमा झाले होते. त्या सर्वांना अनेक जखमा झाल्या होत्या. कुणाची आतडी फुटून बाहेर आली होती तर कोणाचे हात, पाय तुटले होते. सर्वांवरच लगेच ऑपरेशन करण्याची आवश्यकता होती. मी सगळ्यांना ज्युबिली मैदानावर जमा व्हायला सांगितलं. हा निर्णय मी कसा घेतला कोण जाणे. कारण दहाच मिनिटात जखमी लोकांना ज्युबिली मैदानावर वैद्यकीय मदत मिळत असल्याचा सुगावा लागला. त्या सर्व गर्दीत अनेक डॉक्टर्सदेखील आले. पण त्या सर्वांच्यात काही तास तरी मी एकटाच सर्जन होतो. सगळे लोक माझं लक्ष त्यांच्याकडे वेधण्याचा प्रयत्न करू लागले. मी त्यातील दोघांना हात पसरून माझं संरक्षण करायला सांगितलं. माझ्याकडे एकही इंजेक्शन नव्हतं. मी अगदी हतबल झालो होतो. एवढंच नव्हे, तर जखमा शिवण्यासाठी लागणारी सुई व दोरादेखील उपलब्ध

नव्हता.

अशा परिस्थितीत मी काय केलं माहितीये? मी पेशंटना प्रेमानं थोपटलं, पाठीवरून हात फिरवला आणि धक्क्यातून सावरायला सांगितले. खोलवर, दीर्घ श्वास घ्यायला सांगितला. तिथं खूप सिरियस पेशंटदेखील होते. काही अत्यवस्थ होते तर काही मृतदेखील होते. नव्वद टक्के पेशंटना मेंदूला गंभीर स्वरूपाचा मार लागला होता. मी लोकांना मदतीचे आवाहन केले. एका तरुणाला मी चक्क एक औषध दुकान फोडून सिरिंजेस, सुई, दोरा, ग्लुकोज बाटल्या व औषधं आणायला सांगितली व याचा दोष माझ्यावर घेईन, असं आश्वासन दिलं.

त्यानं आणलेल्या गोष्टी तरीही अपुऱ्याच होत्या. मी अक्षरश: किंचाळलो, 'औषधं आणा.' मी पुन्हा जेव्हा ओरडलो तेव्हा लोकांची भीड जराशी चेपली. मी जरा सुस्कारा सोडला. आता सकाळचे ९.४० झाले होते. मला प्रसंगाचं गांभीर्य लक्षात येत होतं आणि त्याचबरोबर मी फार काही करू शकत नाहीये याची जाणीव होत होती. आणखी तासाभरातच अंजार गावातून अनेक गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेले पेशंट आले. तोपर्यंत डॉ. पटेल, डॉ. आचार्य, डॉ. पुजार, डॉ. भरत जोशी मला येऊन मिळाले होते. मला ऑपरेशन्स सुरू करायची होती. पण मी काहीच करू शकत नव्हतो. पूर्ण शहर कोसळलं होतं आणि एकही ऑपरेशन थिएटर शिल्लक राहिलं नव्हतं.

मी माझ्या एका सहकाऱ्याला माझ्या हॉस्पिटलमधून जमेल तसं ऑपरेशनचं साहित्य आणायला सांगितलं. नातेवाईकांना लाकडी फाळकुटं, फरशीचे तुकडे आणि कार्डबोर्ड आणून द्यायला सांगितले आणि त्याच्या मदतीने रुग्णांचे मोडलेले हात, पाय स्थिर केले. मी शाली, साड्या व शर्ट यांचा उपयोग बँडेजप्रमाणे करू लागलो. एका पेशंटच्या पायातून खूप रक्तस्राव होत होता. तेव्हा मग त्याच्या डोक्याला बांधलेली हेडगिअरची पट्टी काढून मी मांडीला बांधली व रक्तस्राव थांबवला.

एक मनुष्य आपल्या लहानगीला हातावर घेऊन आला व म्हणाला, 'डॉक्टर हिला पहिल्यांदा तपासा.' ती मृत आहे हे त्याच्या लक्षात आलं होतं. फक्त माझ्याकडून निश्चिती हवी होती त्याला. तो म्हणाला, 'लवकर सांगा डॉक्टर, मला माझ्या पत्नीलादेखील काँक्रिटच्या ढिगाऱ्यातून शोधून काढायचंय.' दु:खावेगामुळे त्याच्या सर्व भावनाच जणू करपून गेल्या होत्या. मी त्याला मुलीला आमच्या ताब्यात सोडून जाण्यास सांगितले.

त्या दिवशी माझ्यासाठी सर्वात क्लेशदायक आणि अवघड काम असं होतं की पेशंटच्या नातेवाईकांना हात, पाय तोडून प्राण वाचविण्याचा निर्णय घ्यायला लावणे. मी खूप रफ झालो होतो. मी शक्यतो असं कधीच वागत नाही. मी जवळजवळ प्रत्येकालाच ओळखत होतो. ते सगळे ओरडत होते, 'डॉक्टर, तुम्ही माझ्याकडे का पाहात नाही? तुम्ही मला ओळखले नाही का?'

या अशा सगळ्या गदारोळात काही कालावधीनंतर माझ्याकडे एक सुई आली. त्या ठिकाणची सर्वात मौल्यवान गोष्ट ती होती. माझ्या सहकाऱ्यांनी पेशंटना अशा प्रकारे ठेवले की मी एकावेळी तीन तीन पेशंटना टाके घालू लागलो. शेकडो जखमी उघड्या जमिनीवर पडले होते. ती सुई, दोरा आणि कात्री असे सामान घेऊन मी टाके घातले. मी पेशंटना सांगत होतो, 'रडू नका, शांत राहा.' माझ्याभोवती खूपच आरडाओरडा चालू होता. पेशंट वेदनेने विव्हळत होते तर त्यांचे नातेवाईक घाबरून रडत होते.

मी त्या दिवशी दीडशे तरी पेशंटना टाके घातले असतील. सकाळी अकरा वाजता होमगार्डस् आले. त्यानंतर संसद सदस्य पुष्पदान गढ्वी आले. मला शेवटी एक टेबल मिळाले. मी एक तंबू उभारून द्यायला सांगितला आणि त्यानंतर ऑपरेशन्स सुरू झाली. तरीसुद्धा काम अवघडच होतं कारण माझ्याकडे एकच कात्री होती आणि अनेक पेशंटचे तुटलेले हात अन् पाय ऑपरेशनने काढायचे होते. मी हे सर्व लोकांचे प्राण वाचविण्याकरिता करत होतो. इतर डॉक्टरनी बँडेजेस बांधायचं काम केलं. दुपारी ३ वाजेपर्यंत माझ्याकडे ५ टेबल्स व पुरेशी वैद्यकीय सामग्री आली.

बसस्टँडसमोरील खाद्यपदार्थ विक्रेता हरीश ठक्कर यांनी 'मी काही मदत करू का?' असं विचारताच मी त्यांना पाणी उकळण्यासाठी एक मोठं पातेलं आणि गॅस द्यायला सांगितला. ते त्यांनी त्वरित आणलं. शिवाय भूजमधील स्पेशल डिश, 'दाबेली' सर्व लोकांना वाटली. विचार करा– शेकडो दाबेली तासाभरात उपलब्ध झाल्या. जसा काही चमत्कारच.

माझं काम चालू असतानाच काही बातम्या कानावर येत राहिल्या की रमेश गेला (स्वर्गवासी झाला)

...अनेक मित्र, सगेसंबंधी गेले होते.

माझं टाके घालायचं काम चालू असतानाच एका सुहृदय माणसानं माझ्या तोंडात बिस्किटं भरवली. हळूहळू सर्व सुरळीत व्हायला लागलं. आम्हाला माहीतही नव्हतं की हे सर्व आमच्यासाठी कोण करतंय. वेदनाशामक डिक्लोरॅन इंजेक्शने, टी.टी. (धनुर्वाताची) इंजेक्शने यांचा तर नंतर पाऊसच पडला.

संध्याकाळी सातनंतर मात्र मला दमलो असल्याची जाणीव होऊ लागली. आता परिस्थिती हाताबाहेर गेली होती. मी 'जिल्हा आरोग्य अधिकारी' कार्यालयात गेलो. ती फक्त व्यवस्थापकीय जागा असल्याने त्या अधिकाऱ्याला वैद्यकीय ज्ञान नव्हतंच. मला फिरतं ऑपरेशन थिएटर व १०० तरी ऑपरेशन किट्स हवी होती. अगदी सोमवार पर्यंत देखील ते उपलब्ध झालं नाही.

मी राजकारणी लोकांना व अधिकाऱ्यांना विनवले, कृपया डॉक्टरांना बोलविण्याऐवजी आधी ऑपरेशनचे साहित्य मागवा. सुमारे २०० डॉक्टर्स इथं कच्छमध्ये आहेत. पण त्यांचा उपयोगच होत नाहीये. दिल्लीच्या ए.आय.एम.एस. मधून ३० तरुण स्पेशालिस्ट आले आहेत पण साहित्य नाही. ऐंशी टक्के वैद्यकीय मदत जोपर्यंत ऑपरेशन थिएटर व साहित्य नाही तोपर्यंत उपयोगाची नाही.

कुणीतरी क्लोरोमायसेटिननं भरलेलं एक हेलिकॉप्टर पाठविलं; पण तेही काही कामाचं नाही. कृपया मला फक्त १००० ग्लोव्हजच्या जोड्या हव्या आहेत. मला हे कळतंय की जे लोक मला मदत पाठवतात त्यांना इथल्या खऱ्या परिस्थितीची कल्पना नसणार.

अगदी २९ जानेवारीच्या रात्रीपर्यंत देखील आमच्याकडे सुसज्ज ऑर्थोपेडिक रुग्णालय-ऑपरेशन थिएटरसहित तयार झालेलं नाही. मिलिटरी हॉस्पिटलमध्ये काम चांगलं चाललंय पण तेदेखील अपुरंच पडतंय.

सर्व खाजगी दवाखाने बंद आहेत. सरकारी रुग्णालय अगदी भुईसपाट झालं आहे. मुलांनी व स्त्रियांनी जायचं कुठे?

आम्हाला असं एक तात्पुरतं किंवा प्रासंगिक हॉस्पिटल हवं आहे की जेथे कमीत कमी सहा महिने आम्ही रुग्णांवर उपचार करू शकू. मदतीचे काम एवढ्यावर संपणार नाही याची आम्हाला जाणीव आहे. पण रुग्णांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याची उभारणी करण्यासाठी किमान एवढी सुविधा व एवढा कालखंड हवाच.

***

मूळ लेखक :- **डॉ. ज्ञानेश्वर राव**
अनुवाद : **डॉ. सौ. भाग्यश्री काकडे**
भूलतज्ज्ञ, विवेकानंद रुग्णालय, लातूर.

## जरा डोकं चालवा!



१) सूर्यापासून सर्वात दूर असलेला ग्रह कोणता?
२) भारताने अवकाशात सोडलेल्या पहिल्या उपग्रहाचे नाव काय?
३) वनस्पतींना हिरवा रंग कशामुळे मिळतो?
४) अमीबा हे कशाचे नाव आहे?
५) भारताची पहिली अणुभट्टी कोठे सुरू झाली?
६) सूर्यकिरणे पृथ्वीवर किती वेळात पोहोचतात?
७) ओहम हे कशाचे परिमाण आहे?
८) कोणत्या शक्तीचा प्रकार हा पोकळीतून जात नाही?
९) ताऱ्यांचे अंतर मोजण्याचे परिमाण कोणते?

***

---

☺ हसा–हसा ☺

कार्ल सँडबर्ग हा एक अमेरिकन कवी होता. एकदा त्याच्या नाटककार मित्राने, त्याला आपल्या नाटकाच्या रंगीत तालमीला निमंत्रण दिले. त्याला सँडबर्गचा त्याच्या नाटकाविषयी अभिप्राय हवा होता. पण रंगीत तालीम सुरू झाल्यावर थोड्याच वेळात सँडबर्ग गाढ झोपी गेला. प्रयोग संपल्यावर तो नाटककार मित्र सँडबर्ग जवळ आला आणि रागारागाने म्हणाला, ''तुमचा अभिप्राय मला हवा होता. माझ्या दृष्टीने त्याला फार महत्त्व होतं आणि तुम्ही तर झोपी गेलात.

तेव्हा जांभई देत सँडबर्ग म्हणाला, ''तरुण मित्रा, झोप हाही एक अभिप्रायच आहे!''

**'हे शोध कुणी लावले?' ची उत्तरे**

१) जॉन बेअर्ड २) न्यूटन ३) सर हंफ्रे डेव्ही
४) अलेक्झांडर फ्लेमिंग ५) सॅम्युअल मोर्स
६) ॲलेक्झांडर ग्रॅहॅम बेल ७) राइट बंधू
८) जेम्स वॅट

कथा विशेषांक

# जनरेशन गॅप

**प्रा. सुहासिनी देशपांडे**

मोहित समोरचं ताट लोटून रागारागानं उठला आणि कोणी त्याला काही म्हणायच्या आत बाहेरचा दरवाजा धाड्कन बंद करून जिना उतरून गेलादेखील. मग कोणालाच जेवणाची इच्छा राहिली नाही.

अलीकडे असंच होतंय वारंवार. मोहित आणि त्याचे बाबा यांच्यात सारखे खटके उडतात.

जेवायला बसला की पानात पालेभाजी पाहून तो उखडेल, हातपाय आपटत निघून जाईल. बाबा असतील तर ते त्याला जबरदस्ती करतील, संतापतील. वेळच पडली तर खाड्कन कानाखालीही वाजवतील.

कोणत्याही क्षुल्लक कारणानं मोहितचं बिनसतं. मग त्याचा अन्नसत्याग्रह सुरू होतो. दिवस दिवस तो उपाशी राहतो. आईनं समजूत घालायचा प्रयत्न केला तरी तो काही न बोलता उठून निघून जातो.

मोहितचं हे वाढीचं वय आहे. त्याच्या शरीरात आणि मानसिकतेत मोठाच बदल घडून येतोय. चेहेऱ्याची हाडं वाढलीत एकदमच... नुसतीच उंची वाढल्यामुळे तो काटकुळा दिसतोय. हात-पाय बेढबपणे लांब लांब वाढलेत. आवाज चमत्कारिक झालाय. या बदलाशी जुळवून घेतानाही त्याला त्रास होतोय. तो सतत चीडचीड करतो.

बाबांनी बातम्या लावल्या की याला म्युझिक चॅनल हवा! अपुरे आणि कुठेतरी चिरल्या-फाडल्यासारखे उटपटांग कपडे घातलेल्या मॉडेल्स बघून, बाबांच्या कपाळावरची शीर उडते तर मोहित त्याचंच जीव तोडून समर्थन करतो.

'बाबाऽ, तुम्हाला नाही कळायचं फॅशन डिझायनिंग... कॅट वॉक... मॉडेलिंग... तुमच्या काळच्या नर्गिस नि मीनाकुमारी... काकूबाई !' बाबांना असला युक्तिवाद पटत तर नाहीच; पण मुलानं वडिलांसमोर असा वादविवाद करावा, हे त्यांना आवडत नाही. आजही गावी गेले तर बाबा नानांसमोर... त्यांच्या वडिलांसमोर उलटून बोलत नाहीत.

सकाळी सकाळी भूपाळ्या, भजनं, अभंग यासारखं सात्त्विक संगीत ऐकण्यासाठी, बाबा रेडिओ लावतात तर मोहितच्या आवडत्या म्युझिक चॅनलवर दाढीचे खुंट वाढलेले, डोक्यावर सुतळ्यांसारख्या अगणित वेण्या घातलेले, तोंड न धुतल्यासारखे पारोसे दिसणारे हब्शी आणि बघू नये अशा कपड्यातल्या हब्शिणी, 'पॉप म्युझिक' नावाचा गोंगाट करीत थयथयाट करताहेत !

बाबांनी संतापून टी.व्ही. बंद केला तर मोहित कुरकुरत त्यांनाच समजावून सांगेल. 'तुम्हाला नाही कळायचं बाबा ऽऽ म्युझिक अॅल्बम म्हणजे काय ते ! त्याच्यासाठी 'कान' असावा लागतो!'

कधी कधी बाबा 'मूड' मध्ये आहेत असं पाहून, मोहित चेकाळल्यासारखी जुन्या पिढीची थट्टा करतो. नाकातल्या नाकात गाऊन, जुन्या हिंदी गाण्यांची खिल्ली उडवतो आणि मराठी कार्यक्रम लागले की त्याच्या प्रतिभेला तर अगदी उधाण येतं.

'रसिक प्रेक्षकहो ऽ या आहेत सोनूबाई गेंगाणेश्वर... चला तर यांच्या स्वरात चिंब भिजायला' अशी मराठी निवेदनाची तो झकास नक्कल करतो की आई-बाबा दोघांनाही हसू आवरत नाही. पण त्याचबरोबर...

'आला खुषीत समिंदर त्याला नाही डर...' किंवा 'सावळाच रंग तुझा बकुळीच्या फुलापरी...' किंवा 'पंचमीचा सण आला, डोळे माझे ओले...' या गाण्यांची अवीट गोडी आपल्या या पोराला कोणत्या शब्दात पटवून द्यावी, हे न उमगून ते हैराण होतात. कधी कधी मात्र त्यांच्यातील ज्वालामुखीचा एकदम स्फोट होतो.

हे असंच चाललंय अलीकडे वारंवार. बापाचा जोडा मुलाच्या पायाला आला की मुलगा बापाचा मित्र होतो म्हणतात. पण तो जोडा पायाला येण्यापूर्वीच हा आडनिडा काळ, बहुधा दोघांनाही असा भावनिक ताणतणावाचा जात असावा. छोट्या छोट्या गोष्टीत दोघे एकमेकांच्या विरोधात जातात.

बाबांना उकडून केलेली बटाट्याची भाजी हवी तर मोहितला चमचमीत कुरकुरीत काचऱ्याच हव्या! बाबांना लसणाची फोडणी घालून केलेली मेथीची भाजी हवी तर

**रीत कालची आज संपली, नव्या रितीने पुढे चला, खोल अंतरी मात्र जपूया प्रेमाला अन् माणुसकीला**

मोहितला मेथीचे पराठे आणि सॉस पाहिजे.

मोहितच्या सावळ्या तजेलदार रंगाला शोभतील असे स्वच्छ पांढऱ्या, आकाशी किंवा लेमन रंगाचे कपडे त्याने घ्यावेत, असा बाबांचा आग्रह तर मोहितला तांबडे-पिवळे, ढगळ-पघळ




अर्थहीन चित्रांचे आणि इंग्रजी मजकुराचे टी-शर्ट्स हवेत. त्याच्या टी-शर्टवर We Boot the World असा मजकूर आणि Boot या शब्दाऐवजी मोठा थोरला बूट चितारलेला ! नापसंती दर्शवावी तर मोहित चिडक्या रडक्या सुरात म्हणणार 'तुम्हाला नाही ऽ कळायचंऽऽ बाबाऽऽ !' दोघं समोरासमोर आली की आईची धडधड वाढते!

मोहितच्या वागण्यामागे, केवळ पौगंडावस्थेमुळे निर्माण झालेले ताणतणावच नाहीत तर आणखीही काही कारणं आहेत.

मोहित आई-बाबांचा एकुलता एक मुलगा. उभयतांच्या साऱ्या आशा - आकांक्षा त्याच्यावरच केंद्रित झाल्या आहेत. आपण मराठी माध्यमातून शिकलो, इंग्रजीशी खूप झटापट करून इंग्रजीला बऱ्यापैकी हाताशी धरलं. पण आपला काळ वेगळा होता. म्हणून फारसं अडलं नाही. पण खूप काही मिळवलं असंही नाही. हा मोहितच्या आई-वडिलांचा विचार.

मोहितचे बाबा एका बड्या कंपनीत, मॅट्रिकनंतर ॲप्रेंटिसशिप करून वर्कर बनले तर आई छोट्या खाजगी प्राथमिक शाळेत तात्पुरती नोकरी करते. गेली कित्येक वर्षे ही नोकरी तात्पुरतीच आहे. तटपुंजा पगार आहे.

मोहितच्या जन्मानंतर परिवार त्यांनी वाढवलाच नाही. जे द्यायचं ते यालाच द्यावं, भरभरून. आपल्याला नाही जमलं ते आपल्या लेकानं करून दाखवावं. डॉक्टर, नाहीतर इंजिनिअर बनावं. सफाईदार 'स्टायलिश' इंग्रजी बोलावं. तेवढ्यासाठी त्यांनी मोहितला इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच नाही तर उच्चभ्रू, बड्या 'हाय-फाय' लोकांच्या 'कॉन्व्हेंट'मध्ये घातलं. जेणेकरून त्यांचं नाव घेताच आपली प्रतिष्ठा वाढावी!

मोहितला सुरुवातीला खूपच जड गेलं. पण शिकवणी लावून त्याला वर्गाबरोबर आणण्याचा आटापिटा त्याचे पालक करीत होते. नर्सरीतून तो घरी आला की त्याच्याशी इंग्रजीत बोलायचा, केविलवाणा प्रयत्न करीत होते.

'मोहित, गुड बॉय ना? मग खा हे बनाना!' इट बनाना!' सी स्पॅरो! सी दॅट क्रोऽ ब्लॅक ब्लॅक क्रोऽ!' अशी जमेल तेवढी धडपड करून त्याला इंग्रजीशी दोस्ती करायला लावत होते. कळायचं त्यांना कधी कधी की शाळेत जे शिकवतात त्याचा तो आनंद नाही घेऊ शकत. 'रिंगा रिंगा रोझेऽस... पॉकेट फुल ऑफ रोजेस' अशी सुरा-तालांशी जवळीक मात्र होत होती... तेवढंच बरे वाटे.

पण पहिली... दुसरी...तिसरी... मोहितबरोबर आई-बाबांचीही फरफट होत होती. भाजी-पोळीच्या डब्याऐवजी मोहितला मित्रांच्या टिफिनसारखे आकर्षक पदार्थ हवेहवेसे वाटायचे. सॅण्डविच, ब्रेडरोल, मॅगी, केक्स, कूकीज, जॅम, सॉस...! मोहितच्या शाळेमुळे आई-बाबाही जमेल तसे बदलत होते. मोहितच्या 'हॅपी बर्थडे'ला, वर्गाला चॉकलेट्स, पेन्सिली, शार्पनर वाटताना त्यांचं महिन्याचं अंदाजपत्रक कोलमडायचं. तरी सुरुवातीला हौसेनं आणि नंतर सक्तीनं हे चालूच होतं. त्याला हवं ते द्यायचं. कमी पडू द्यायचं नाही. कमीपणाही येऊ द्यायचा नाही, हा त्यांचा विचार असे.

एकवेळ बाबांच्या कपड्यांना लाँड्रीतून इस्त्री नसली तरी चालेल पण मोहितचे युनिफॉर्म लाँड्रीत टाकायचे. त्याचे निरनिराळे शूज, सॉक्स, स्कूल बॅग्ज, टिफिन बॉक्सेस, वॉटर बॅग्ज... खूप तारांबळ उडायची.

मोहितला कळायला लागलं तसं त्याला अनेक गोष्टी खटकायला लागल्या. मित्रांना घरी बर्थ डे पार्टीला बोलवायचं तर घर मित्रांसारखं नाही. स्कूलमध्ये 'पेरेंट्स मिटिंग्जला' आई-बाबा यायचे ते बसनं, स्कूटरनं का नाही? इतरांचे वडील कारमधून सूट-बूट, टाय मध्ये येतात आपले बाबा साधा बुशकोट,

पँट आणि चपलाच घालून काय येतात? त्याची घुसमट व्हायची. हळूहळू तो एकलकोंडा बनत गेला. वर्गमित्रांपासून वेगळा पडायला लागला.

तरी त्याच्या हट्टाखातर बाबांनी छोटासा ब्लॉक घेतला. सेकंड हॅन्ड स्कूटर घेतली. वडिलांची आर्थिक ओढाताण त्याला कळत नव्हती. पण कळत नव्हती म्हणावे तर तो क्वचितच हट्ट करायचा. प्रायमरीत असताना तो बाबांना मोकळेपणानं आणि निष्पापपणे म्हणायचा तरी – ‘बाबा, तुम्ही स्कूटरवर या.’ किंवा ‘बाबा, तुम्ही टाय बांधून प्रिन्सिपालना भेटायला या.’

पण पुढे पुढे त्याला आपल्या आणि इतर मुलांच्या राहणीमानातील, कल्चरमधील तफावत जाणवायला लागली. तो बोलण्याऐवजी कुढायला लागला. क्वचित शाळेत काही घडले की धुमसत घरी आलेला आठवतोय. मग रडायचा आणि म्हणायचा – ‘आपल्याकडे का नाही काऽऽ र आपण का नाही कुत्रा पाळत? आपल्याला मोठ्ठं घर हवंय... मला मित्रांना बर्थ डे पार्टीला बोलवायचंयऽ...!

मित्रांकडचं इंटिरिअर, फर्निचर, टी.व्ही., फ्रीज पाहून मोहितला वैषम्य वाटायचं. मग हप्त्याहप्त्यानं टी.व्ही., फ्रिज सारख्या गोष्टी घरात आल्या.

पण मोहितचे बाबा आटापिटा करून काही गोष्टी मिळवत असत. तोपर्यंत त्याचे मित्र आणखी पुढे गेलेले असायचे!

नाही म्हणायला, मोहित आठवी–नववीत आल्यावर छोटी बाल्कनी बंद करून त्याच्यासाठी वेगळी अभ्यासाची खोली बनविण्यात आली होती. तिचा त्याला कोण अभिमान वाटे. त्याच्यासाठी खास टेबल–खुर्ची, टेबललॅम्प, पुस्तकांचा शेल्फ आणि कपडे अडकवायला बार ठोकून घेतलेला. आपली खोली तो अगदी सुंदर आवरून ठेवत असे.

पण या काळात त्याचं मोटर कारचं आकर्षण इतकं वाढलं की मोहितनं खिडकीच्या काचांवर, खोलीच्या दारावर, भिंतीवर मोटरकारची वेगवेगळ्या मॉडेल्सची चित्रं कापून चिकटवून टाकली. रस्त्यावर फियाट आणि ॲम्बसॅडरबरोबर पिटुकली मारुती पळायला लागली आणि पाहाता पाहाता तऱ्हेतऱ्हेच्या नव्या नव्या गाड्यांनी रस्ते गजबजू लागले. त्याच्यापूर्वीच मोहितच्या संग्रहात परदेशी बनावटीच्या, जवळ जवळ सर्व कार्सची हजेरी लागलेली होती. कुठलंही मॉडेल तो सहज ओळखायचा. कार आपल्याकडे कधीच येणार नाही, ही खात्री असल्यामुळे त्यानं आपल्या दबलेल्या भावनांना अशा प्रकारे वाट करून दिली होती. पण ते पाहून बाबांचं मन कधी कधी खट्टू होत असे. त्यांना अपराधी वाटत असे. मग ते त्याला समजावून सांगत असत आणि आपल्या त्याच्याकडून असलेल्या अपेक्षा त्याच्या मनात भरवून देत असत. त्यानं खूप अभ्यास करावा, खूप चांगले गुण मिळवावेत, खूप मोठं व्हावं... वगैरे वगैरे...

पण अलीकडे म्हणजे अकरावीत आल्यापासून मोहितचं सारंच बिनसलं होतं. तो चटकन चिडतो, संतापतो, बाबांशी वितंडवाद घालतो, प्रसंगी त्यांना उलटून उत्तरं देतो. त्यांना जे आवडतं ते त्याला नेमकं आवडत नाही. किंबहुना, त्यांना आवडतं म्हणून तो त्याच गोष्टींचा द्वेष करतो! त्याच्या दृष्टीने आई एक गरीब बिचारी गोष्ट आहे. वादविवाद करण्याइतकी तिची पातळी आहे, असं त्याला वाटत नाही. तिच्या साध्या–सुध्या पदार्थांना तो नावं ठेवतो. ‘शी ! हा काय चिवडाय का?... आपल्याकडे कधीच असं काही नसतं? लोकांकडे बिस्कीट्स, टोस्ट, नानकटाई, फ्रायम्स आणि काय काय... बरण्या भरून असतात! आपल्याकडे खायला दे म्हटलं की ‘पोहे करू की सांजा?’ इडली म्हणजे आमच्याकडे अगदी पार्टीचा पदार्थ!'' तो तसं तणतणतो तेव्हा आई कसनुशी होते. पण बोलत नाही. तिला रागही येत नाही. आईच्या शाळेतच्या सहकारी मैत्रिणींना बर्गर, पिझ्झा, पनीर टिक्का आणि कसले कसले पदार्थ येतात. त्यातले कितीतरी तिनं पाहिलेलेही नसतात, मग चाखण्याची बातच सोडा. तिच्या लहानपणी, लाकडाच्या लाल पिवळा रंग उडालेल्या ठकी बाहुलीशी खेळताना तिला आपल्याकडे डोळ्याची उघडझाप करणारी, गोजिरवाणे हात–पाय असलेली, पिंगट केसांचा बो बांधलेली नि सॅटिनचा फ्रॉक घातलेली बाहुली नाही, याचं दुःख वाटायचंच की ! ती अधुरी राहिलेली इच्छा आजही आपल्याला कधी कधी त्रास देते, मग मोहित ज्या काळात राहतोय त्या काळाचा महिमाच अगाध आहे, असं तिला वाटतं. कालची गोष्ट आज जुनी होतेय.



**दान नको वा मदतही नको, हे अमुचे अधिकार, समजुनि घेऊनि देऊ आम्ही, नव्या जगा आकार.**

मोहितची आई साधी आहे पण खूप विचारी आहे. तिला काळजी वाटते की या वेगावर आपल्याला स्वार होता येणार नाही. हा वेग पाहून ती उदास होते.

तशातच आता मार्केट डाऊन आहे. विदेशी कंपन्या हात-पाय पसरताहेत. काल-परवा पर्यंत नफ्यात चाललेल्या देशी कंपन्या डळमळीत होऊन कोसळताहेत.

मोहितचे बाबाही काळजीत आहेत. रोज कुठल्या ना कुठल्या सेक्शनमधल्या लोकांना कामावरून कमी केल्याच्या बातम्या येत आहेत. एक दिवस आपलीही पाळी येणार... या विचारानं बेचैन आहेत. खरंच तसं झालं तर काय? अजून मोहितचं शिक्षण व्हायचंय. गावाकडच्या प्रपंचालाही थोडाफार हातभार लावावा लागतोय.

आज मोहित पानावरून उठून गेला ते त्याला कॉलेजसाठी नवे स्पोर्टस् शूज हवे म्हणून! हजार रुपयांचे जोडे? बाबा चिडणार नाही तर काय करतील? शिवाय, सायकलवरून कॉलेजला जावं लागतं म्हणूनही तो नाराज होतो. नवी बाईक नाही किमान स्कूटर तरी हवी असं वाटत होतं त्याला.

'शी ! काय सालं लाईफ आहे !' म्हणत तो पानावरून उठून गेला होता. दिवसभर तो घराकडे फिरकला नाही.

आई-बाबांचे चेहरे काळजीनं काळवंडले होते. दुहेरी काळजी होती त्यांना. कंपनीनं लेऑफ पुकारला होता. उत्पादन बंद होतं. आईची तुटपुंजा पगार देणारी शाळेतली नोकरी चालू होती, तेवढाच दिलासा होता.

मोहितला कसं समजावून सांगावं, काही कळत नव्हतं. बाबांची ॲसिडिटी या साऱ्या टेन्शनने वाढली होती. विचार करकरून डोकंही दुखत होतं. तशात मोहितची काळजी. कुठं गेला असेल? काय खाल्लं असेल? की उपाशीच? रागाच्या भरात घर सोडून वगैरे तर जाणार नाही ना?

तशाही अवस्थेत बाबा त्याच्या मित्रांकडे जाऊन आले होते. दिवसभर घरात कोणीच जेवलं नव्हतं.

रात्री उशिरानं मोहित परत आला. चेहेरा सुकलेला, थकलेला आई-बाबांना हुश्श वाटलं!

'चल जेवायला. आम्ही दोघंही दिवसभर जेवलो नाही बघ, तू नाही जेवलास म्हणून!' आईनं शांतपणे समजावलं.

मोहितनं थंड पाण्यानं हात-पाय-तोंड धुतलं. देवासमोर क्षणभर डोळे मिटून तो उभा राहिला.

तिघेही जेवायला बसले. पानात पडलेली नावडती भाजी-पोळी त्यानं न बोलता खाल्ली. जेवताना कोणीच बोललं नाही.

जेवणं झाल्यावर तिघेही अंथरुणावर पडले. पण झोप कुणालाच येत नव्हती. उद्याची चिंता बाबांच्या चेहेऱ्यावर पसरली होती तर दोघांना समजावून घेण्याची सोशिक कसरत करताना आईही थकून गेली होती. कपाळावर आडवा हात घेऊन ती झोपेचं सोंग करीत होती. मोहितही या कुशीवरून त्या कुशीवर करत होता.

'बाबा ऽ...' मोहित एकदम अंथरुणावर उठून बसला. 'बाबाऽ डोकं दाबून देऊ? बाम लावून देऊ?' आणि एकदम मोहित बाबांच्या छातीवर डोकं ठेवून हमसून हमसून



रडायला लागला.

''आय ॲम सॉरी, बाबा ! मी पुन्हा नाही असा वागणार... मला माहिती आहे, तुम्ही खूप मोठ्या क्रायसिस मधून जाताहात. आज मित्राकडे गेलो होतो तेव्हा त्याच्या बाबांकडून समजलं मला. पेपरमधेही वाचलं... आणि... आणि मी तुम्हाला त्रास दिला. शी! मला स्वत:ची शरम वाटते, बाबा!''

मोहित रडत होता. बाबांनी त्याला उठून जवळ घेतलं, त्याच्या पाठीवर हात फिरवत बाबा म्हणाले,

''बस! मोहित एवढीच अपेक्षा आहे. अरे, आपण सारे समजुतीनं वागलो ना तर... तर कोणत्याही संकटाला तोंड देता येईल.''

दिवसभराचा सारा तणाव संपला होता. मोहितची साधी सुधी आई अंधारातच डोळे पुसत होती. बाप-लेकांच्यातील सारे समज-गैरसमज संपले होते. आता ते बाप-लेक न राहाता मित्र बनलेत याची तिला खात्री पटली.

***

**प्रा. सुहासिनी देशपांडे**
**३, पुण्यश्री अपार्टमेंट**
**डहाणूकर कॉलनी,**
**कोथरूड, पुणे २९.**

# कविता पानोपानी

## कालचक्र

कालचक्र हे फिरते आहे
अविरत चंचल फिरते आहे! ।।धृ ।।

कुणी थांबवू शके न याला, सदैव याचा धाक जगाला
सुखदु:खाची फिरती पाती, हेच खरे आहे ।।१ ।।

किती थोर जन होऊनि गेले, स्मृतिने त्यांच्या दीप उजळले
स्फूर्तिदायि ते चरित्र त्यांचे, स्फुरण देत राहे! ।।२ ।।

आपण सारे जाणुनि घ्यावे, 'यत्न देव' हे ध्येय असावे
'नव्या युगाची' नवीन किरणे, तेज उजळताहे ।।३ ।।

मायापित्यांचे ऋण माथ्यावर, गुरुचरणांचे स्मरण निरंतर
भविष्य उज्ज्वल दावित राहिल, वाट क्रमित जाये ।।४ ।।

कालचक्र हे फिरते आहे, फिरते आहे, फिरते आहे !



***

– **वि.म. कुलकर्णी**
६१/४८ कमळवेल,
एरंडवणे, पुणे – ४.

# कविता पानोपानी



## हे नव्हे चांदणे

छे! न आई चांदणे हे सांडलेले भोवती
व्यर्थ खोटे बोलशील का? का ग नाही माहिती?

नील आकाशी मजेने चंद्र गे जो हासतो
हो गुराखी, रात्र सारी नित्य नेमे जागतो.

त्या न आई तारका ज्या हासती चंद्रासवे
गाई आणि वासरांचे थांबलेले ते थवे

एकटा तो चंद्रमा का रोज त्यांना राखतो!
आणि आईसारखी गे काळजी का वाहतो.

मी परंतु लेखितो वेडाच गं त्याला परी
दूध आईचे खुळा हा सांडतो सृष्टीवरी!

***

**– शंकर रामाणी**

हरि ॐ को. ऑ. हौ. सोसायटी,
शनिनगर, बदलापूर (प.)
जि. ठाणे ४२१५०३.



**मग अशाच एके समयी, लागेल नवी चाहूल। सृष्टीच्या बागेमधल्या, वेलीला नवखे फूल॥**

# त्याचा पहिला धनादेश

**– अविनाश दर्प**

वयाच्या साठीकडे झुकलेल्या इजिडोर नॉर्मन पेन याने आपले सारे वैवाहिक जीवन, इंग्लंडच्या उत्तर भागातील एका छोट्या, धुराने भरलेल्या गावातील रेल्वे स्टेशनवर, मालगाड्यात कोळशाची पोती चढविणारा हमाल म्हणून घालवले होते. हे काम कष्टाचे, घाणीने भरलेले आणि कमी मिळकतीचे असल्याने स्वत: तो आणि त्याची पंचावन्न वर्षांची बायको एलझी त्याच्या या नोकरीवर तसे नाखुषच होते. वखारीत काम करणाऱ्या इसमाची आपण पत्नी आहोत, याची तिला विलक्षण खंत वाटत असे. शिवाय त्याच्या या व्यवसायापायी, तो घरी येई तेव्हा ओळखू येणार नाही, असे त्याचे रूप असे. त्याखेरीज त्याच्या दोन वेळा घरी येण्याने त्याच्याबरोबर रोज कोळसा घरात येत असे. घर स्वच्छ ठेवण्याची तिला हौस होती. परंतु आता ती त्याकडेही लक्ष देईनाशी झाली होती.

एलजी अतिशय नाजूक आणि रूपसंपन्न होती. अशा परिस्थितीतही ती नेहमी प्रसन्न असे. रागावणे, संतापणे, आरडाओरडा, आदळआपट या गोष्टी तिच्यात अजिबात नव्हत्या. मात्र अतिशय शांत आणि समजुतीच्या स्वरात ती आपल्या नवऱ्याला, ''इझी, आता तू एखाद्या तुझ्या वयाला आणि प्रकृतीला झेपेल असा व्यवसाय शोधायला हवा. किती दिवस हे कष्टाचं काम तुला पेलवणार आहे?'' त्यालाही ते पटत होते; परंतु तरीही त्याने तसा प्रयत्नच केला नाही. आता नवीन काही व्यवसाय सुरू करावा आणि त्यात बस्तान बसवावे इतका तो तरुणही नव्हता.

''एलजी अगं आयुष्यात अनेक वेळा विश्वास बसणार नाहीत अशा घटना घडतात. अगं, मलाही नजिकच्या भविष्यात एखादं घबाड लाभेलही, कोणी सांगावे काय घडेल ते,'' तो तशी स्वप्ने वरचेवर रंगवीत असे.

एके दिवशी सकाळी ते दोघेही न्याहारी करीत असतानाच पोस्टमनने घंटा वाजवली; आणि दार उघडणाऱ्या श्री. पेन यांच्या हाती अमेरिकेची तिकिटे लावलेला एक मोठा लखोटा दिला.

''हे बघ, चहा थंड होईल, तुझं खाणंपिणं आटप, मग सावकाश तुला आलेलं पत्र वाच.'' टेबलावर दोघांचा चहा ठेवता ठेवता एलझी म्हणाली आणि खुर्ची ओढून स्वत:ही खायला बसली. इजिडोरने घाईघाईने अंड्याबरोबर लोणी लावलेला पाव खाल्ला. परंतु त्या पत्राच्या नादात चहा प्यायचा विसरलाच. इतकेच काय पण हात धुण्याचेही त्याच्या लक्षात आले नाही आणि त्या सुंदर लखोट्यावर दोन्ही बाजूला लोण्याचे डाग पडलेच. पत्रातल्या पहिल्या दोन तीन ओळी वाचल्याबरोबर तो मोठ्याने म्हणाला,

''एलजी, अगं ऐक यात काय आहे ते! माझ्या अमेरिकेतील अतिशय श्रीमंत चुलत्याने मृत्युसमयी माझ्यासाठी तीस हजार पौंडाची रक्कम ठेवली आहे.'' ''काय सांगतोय् तरी काय! छान, आता तरी निश्चितच समुद्रकाठावर आपल्याला छोटंसं घर घेता येईल.''

वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी कोणीही असा एकाएकी आणि एका दिवसात श्रीमंत होत नाही. या घटनेला वर्तमानपत्रांनीही रकानेच्या रकाने भरून चांगलीच प्रसिद्ध दिली. शेजारी-पाजारी तो काम करायचा तेथील मंडळी त्याच्याकडे आता वेगळ्या नजरेने बघू लागली. परन्तु इजिडोर मात्र, पत्रात सांगितलेल्या रकमेचा धनादेश हातात पडेपर्यंत आपल्या कामावर जात होता. मात्र आता त्याला काही काम सांगताना त्याच्या वरिष्ठांची भलतीच कुचंबणा होत होती. धनादेश हाती पडला आणि इजिडोर तडक नजिकच्या बँकेत गेला.

बँकेतल्या कारकुनाने या प्रसिद्धीस आलेल्या श्री. पेन यांना ताबडतोब मॅनेजरसाहेबांच्या केबिनमध्ये नेले. मॅनेजरसाहेबही श्री. पेन आपल्या बँकेतच पुढील व्यवहारासाठी येतील, अशी आशा करीतच होते. त्यामुळे मोठ्या खुषीत येऊन अतिशय अदबीने श्री. पेन यांना खुर्ची देण्यात आली आणि चहाचा ट्रेही आणण्यास सांगण्यात आले. बँकेच्या मॅनेजरनी श्री. पेन यांना विनंती केली, ''मि. पेन साहेब या साऱ्या रकमेबाबत, म्हणजे त्या रकमेची गुंतवणूक, खर्च वगैरे कसा करायचा, याचा निश्चित निर्णय होईपर्यंत, आपली ही रक्कम आमच्याच

बँकेत ठेवावी, असा मी आपल्याला सल्ला देईन. शिवाय मी तुम्हाला धनादेशासाठी एक पुस्तक देतो. जेव्हा आपल्याला काही रकमेची गरज असेल तेव्हा तो आकडा धनादेशावर लिहायचा आणि खाली सही करायची आणि तुम्हाला लागलीच ती रक्कम मिळेल, असा मी शब्द देतो.''

इजिडोरला ते पटले. त्याने त्याच बँकेत खाते उघडून तेथेच तो धनादेश सादर केला आणि नमुन्याची सही घेऊन, धनादेश कसा लिहायचा हे समजावून घेऊन तो निर्धास्तपणे घरी परतला. मोठ्या अभिमानाने त्याने एलजीला त्याला मिळालेले धनादेश पुस्तक दाखवले.

'अगं, आता पैसा हवा असेल तेव्हा रक्कम लिहून आणि सही करून... अगं मी माझी सही केली ना तेव्हा मॅनेजर साहेबांचे आणि माझे...''

''पुरे ते झाले ते बँकपुराण, समुद्रकिनाऱ्यावर घर घेण्याचं केव्हा ठरवतोयस ते सांगा आधी.''

''ठरलं, बस्, पहिला चेक समुद्रकाठावरील तुझं घर खरेदी करण्यासाठीच वापरायचा.''

''ते खरं, पण केव्हा, आता तर मला केव्हा घर विकत घेऊ असं झालं आहे.''

''ठीक आहे, नाही तरी गेल्या कैक वर्षात आपण समुद्रकाठावर सहल काढलेली नाही. आज आहे गुरुवार दोन दिवसांची सुट्टी घालविण्यासाठी उद्या दुपारच्या एकच्या आगगाडीने आपण ब्लॅकपूलला जाऊ आणि घराचाही शोध घेऊ मग तर झालं ना!''

दुसऱ्या दिवशी सकाळी ते दोघे निघण्याची तयारी करीत असतानाच दारावरची घंटी वाजली. एलजी आरश्यापुढे आपली हॅट नीट बसविण्यात गुंतली होती. ती म्हणाली, ''बघ रे कोण आलंय? आणि हे बघ निघण्याची वेळ झाली आहे. उगीच पाल्हाळ लावू नकोस.''

इजिडोरने दार उघडले. काळी पँट, काळा कोट आणि काळी हॅट घातलेला तो दारातील माणूस थोडासा राकट दिसत होता. दार उघडल्याबरोबर त्याने हसतच ''नमस्ते श्री पेन'' असे म्हटले व तो उघडलेल्या दारात उभा राहिला. खरं तर इजिडोरला एकूणच तो गृहस्थ अजिबातच आवडला नाही तरीसुद्धा इजिडोरने हसून त्याला प्रतिसाद दिला.

''आपण कोण? आणि आपल्याला माझं नाव कसं ठाऊक आहे?''

''ते जाऊ द्या. प्रथम आत चला.'' पाहुणा थोड्याशा उद्धटपणानेच म्हणाला.

तेवढ्यात इजिडोरला त्या गृहस्थाच्या हातातील पिस्तूल दिसले. तो इतका भांबावून गेला होता की तो तसाच उभा राहिला. त्याने तेवढ्यातही तेथून दिसणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला नजर टाकली. कदाचित आपला जुना पोलिस असलेला मित्र बॉब ब्राऊन दिसतोय का हे बघत होता. परंतु रस्त्यावर चिटपाखरूही नव्हते. सर्वत्र शांतता होती. शेजारच्या घरातील रेडिओ मात्र मोठ्या आवाजात गाणी गात होता; आणि त्याची एलजी आरशापुढे उभी राहून स्वत:शीच काहीतरी बडबडत होती.

''चल, वेळ दवडू नकोस. नाहीतर तुला गोळी घालीन. मी सांगतोय ते मुकाटपणे कर.''

भीतीने आणि नाईलाजाने इजिडोरने दोन पावले मागे सरकून त्या गृहस्थाला दिवाणखान्यात बैठकीच्या खोलीत येण्यास रस्ता दिला. त्या गृहस्थाने प्रथम दार बंद केले आणि ''श्रीमती पेन, मी तुमच्या नवऱ्याला ठार मारू नये, असे वाटत असेल तर क्षणाचाही विलंब न करता बाहेरच्या खोलीत या.'' असे दरडावले.

काय प्रकार आहे हे बघण्यासाठी एलजी घाईघाईने बाहेर आली आणि आपल्या नवऱ्यावर पिस्तूल रोखून धरलेल्या त्या गृहस्थाला बघून भीतीने पांढरीफटक पडली. जवळच्या खुर्चीवर कशीबशी बसली.

''बसू नकोस! प्रथम दोघेही आतल्या खोलीत चला.''

आपल्या घाबरलेल्या बायकोला हाताचा आधार देत आत नेणारा इजिडोर, क्षणभर थांबला आणि म्हणाला, ''एकूण तू चोर आहेस तर?''

''बरोबर ओळखलंस'' त्यांना आतल्या खोलीत ढकलत तो गृहस्थ म्हणाला. एलजी टेबलाजवळ मटकन् खुर्चीवर बसली आणि रडायला लागली. इजिडोर मात्र आपण घाबरलेलो नाही हे दाखवीत तिच्या शेजारी उभा राहिला. तो गृहस्थ टेबलाच्या एका कोपऱ्यावर बसला.



**ढळत्या या आयुष्याचे कसे कुणी माप घ्यावे? भोगा आले निमूट ते माथ्यावर शाप घ्यावे!**

‘‘हे बघा, या घरात काही तरी मौल्यवान मिळेल अशा विचारात जर तुम्ही आला असाल तर तुम्ही फारच मोठी चूक केलीत. आमच्याकडे, या घरातील सर्व वस्तूंवर तुम्ही नजर फिरवा. तुम्हाला वाटतंय् आम्ही श्रीमंत आहोत म्हणून?’’

‘‘श्रीयुत पेन, तुम्ही खोटं न बोलण्याचा जरा शहाणपणा दाखवा. मी रोजची वर्तमानपत्र वाचतो. तेव्हा आता तरी मी अयोग्य घरी आलोय असं म्हणण्याचा तुम्ही मूर्खपणा करणार नाही. शिवाय तुम्ही मिळालेली रक्कम कोठे ठेवली आहे हेही मला माहीत आहे.’’



‘‘ठीक आहे, परंतु आपण म्हणता ती माझी रक्कम मी बँकेत ठेवली असल्याने ती तुम्हाला क्वचितच चोरता येणार नाही. ती बँकेत अगदी म्हणजे अगदी सुरक्षित आहे.’’

‘‘नाही नाही. निदान माझ्यापासून तरी तुमची रक्कम सुरक्षित नाहीच नाही. माझंही त्याच बँकेत खातं आहे. तुम्हीही पैसे ठेवण्यासाठी ह्या जवळच्याच बँकेची निवड कराल, असा माझा अंदाज होता. तो खरा ठरल्याने तर मी कालपासूनच म्हणजे तुम्ही सर्व रक्कम या बँकेत ठेवल्यापासून अगदी खूष आहे. तुमच्याप्रमाणेच मीही कालच मॅनेजरला भेटायला गेलो होतो.’’

‘‘तुम्हाला काय म्हणायचंय! मला काहीच बोध होत नाही. इजिडोर भांबावून म्हणाला. एलजी अजूनही तिच्या छोट्याशा हातरुमालाची मदत घेत अश्रू पुसत होती. स्वत:ला सावरायचा प्रयत्न करीत होती. ‘‘मि. पेन आता मी काय सांगतोय ते नीट ऐका म्हणजे साऱ्याचा खुलासा होईल. तुम्ही बँकेत काल प्रथमच गेलात, परंतु तुमच्याबाबतची बातमी वर्तमानपत्रातून वाचल्याबरोबर मी माझ्या हालचालींना सुरुवात केली. तुम्ही कोठे राहाता, याचा शोध घेतला आणि माझे काम सोपे झाले. तुमच्या उतारवयाची कल्पनाही वर्तमानपत्रातून मिळालीच होती. तेव्हा तुम्ही जवळच्या बँकेचा आधार घेणार, असा अंदाज करून, मी प्रथम या बँकेत खाते उघडले. अगदी वरचेवर मी काही तरी काम काढून बँकेत जातो; मॅनेजरला भेटतो. आता तर तो माझा जवळजवळ मित्रच झालाय म्हणायला काहीच हरकत नाही. त्याचा आणि त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करण्याचा उद्योग मी करीत होतो. त्यात मी शंभर टक्के यशस्वी झालोय. माझं काम मी फार म्हणजे फारच सोपं केलंय. तेव्हा हे पेन घ्या आणि तुमच्या नव्या कोऱ्या चेकवर रिचर्ड जॉन्सन या नावे पाच हजार पौंडाची रक्कम घाला आणि जीव वाचवायला मोकळे व्हा!’’ तो टेबलावर पेन ठेवत म्हणाला.

‘‘छे छे, मी नाही हे करू शकणार. मी वेंधळा. मॅनेजरनं दिलेलं चेकबुक कालच हरवलं कुठे तरी.’’

‘‘हे पाहा मि. पेन तुम्ही परत खोटं बोलायला लागलात. तुमच्या कोटातल्या आतल्या खिशात अगदी कोरं करकरीत चेकबुक मला दिसतंय. शहाणपणा बस् झाला. इंग्लंडमधल्या बँका दुपारी तीनला बंद होतात, याची तुम्हाला पूर्ण कल्पना आहे. त्यापूर्वी पैसे घेऊन मला पॅरिसला जाण्याचं विमान पकडायचंय. ही मी तुम्हाला शेवटची संधी देतोय. चला पटकन!’’



**सुख निश्चिताचे विरे, उरे धुक्याचा हा दुवा। व्यर्थ भासले त्यातच, अर्थ होता असा नवा ।।**

तो पिस्तुल डोक्याला भिडवून म्हणाला. ''इझी, पैशापेक्षा तू मला अधिक मोलाचा आहे. देऊन टाक त्याला चेक.'' इलजी म्हणाली.

इजिडोरने खिशातलं चेकबुक टेबलावर ठेवलं आणि त्या गृहस्थाचं पेन उचललं. ''चल, रिचर्ड जॉन्सनच्या नावानं पाच हजार पौंडाचा चेक लिही आणि मी पंचवीस हजार पौंड तुमच्यासाठी ठेवलेत यातच समाधान मान.''

इजिडोरने अतिशय काळजीपूर्वक चेकवर लिहिण्यास सुरुवात केली. त्याचे नाव आणि रक्कम लिहून, स्वत:ची सही करण्यापूर्वी त्याने वर बघून त्याला विचारले,

''मी बरोबर सही करतोय, याची तुम्हाला कशी कल्पना येणार?'' तेव्हा अजूनही मी...'' तोंड बंद कर सर्व गोष्टींचा विचार करूनच योजना आखलेली आहे. दोन दिवसापूर्वी रात्रीच, तू काम करतोस, तेथून मी तुझं ओळखपत्र मिळविलेलं आहे. हे बघ, या कार्डावर 'आय.एन.पेन' अशी स्वाक्षरी आहे. आता मुकाट्याने अशीच सही चेकवर कर.''

इजिडोरने त्या कार्डाकडे बघितलं, त्याच्यावरची आपली सही बघितली. क्षणभर त्याने त्या गृहस्थाकडे विचित्र नजरेनं बघितलं आणि मोठ्याने हसत तो म्हणाला, ''पाचच हजार का? दहा हजार का नाहीत? अं!'' ते ऐकून एलजी अतिशय घाबरली. आपल्या नवऱ्याला हा धक्का सहन न झाल्याने त्याला वेड लागले असावे असे तिला वाटले.

तो चोरही अवाक् झाला. पण उसने अवसान आणून तो खेकसला, ''खिदळायला काय झालं. चल पटकन् सही कर.''

''हो हो. त्यात मला अर्थातच आनंद आहे. समजलं?'' त्याने मग कार्डावरीलप्रमाणे 'आय.एन.पेन' अशी सही केली आणि चेक त्या गृहस्थाच्या हाती देता देता म्हणाला, ''मला नाही वाटत एवढ्या मोठ्या रकमेच्या नोटा, बँक बंद होता होता तुम्हाला मिळतील.''

''हे बघ गृहस्था, तू काल बँकेतून बाहेर पडल्यावर मी माझ्या मित्राला म्हणजे बँक मॅनेजरला मला पाच हजार पौंडाचा चेक मिळणार असल्याचे आणि नोटांच्या रूपात पैसे हवे असल्याचे सांगून ठेवले आहे तेव्हा त्या नोटा माझी वाट बघत असतील. मी हा चेक सादर केल्यावर त्यात काही आश्चर्यही वाटणार नाहीये आणि तो चकार शब्दाने त्याविषयी चौकशी करणार नाही. त्याचा माझ्यावर विश्वास आहे आणि त्याला तू आणि मी मित्र असल्याचेच वाटणार आहे.''

''असं म्हणतोस, गंमतच आहे सारी ही.'' असे म्हणून इजिडोर जेव्हा मोठ्याने हसू लागला, तेव्हा त्या गृहस्थाचा संयम अजिबात राहिला नाही आणि संतापून त्याने आपले पिस्तूल इजिडोरच्या दोन्ही भुवयांमध्ये टेकवले.

''हे बघ, तू मला ठार मारू शकणार नाहीस. तसा वेडेपणा केलास तर उरलेलं सारं आयुष्य तुला तुरुंगात घालवावं लागेल. एक लक्षात ठेव तू येथून गेल्याबरोबर मी पोलिसांना फोन करणार आहे. तुला रक्कम नक्की मिळू शकणार नाही.'' इजिडोर ठामपणे म्हणाला; आणि तशाही परिस्थितीत एलजीला त्याचे कौतुक वाटले.

''परत परत तू माझ्या योजनेवर अविश्वास दाखविण्याची चूक करतोयस.'' असे म्हणून त्या गृहस्थाने खिशातून नायलॉनची दोरी काढून त्या दोघांना खुर्च्यांना आवळून बांधले. नंतर त्यांच्या तोंडात बोळे कोंबून त्याने त्यांची तोंडे बांधली. फोनची वायर कापून टाकली आणि त्यांचा ट्रान्झिस्टर मोठ्या आवाजात सुरू केला.

''जा काय करायचंय ते कर. तुम्ही मोकळे होईपर्यंत माझे काम आटोपून माझा पॅरिसचा प्रवास निश्चितच सुरू झाला असेल. माझ्याजवळ माझा पासपोर्ट आहे, तिकिटही आहे आणि मूर्खा लक्षात ठेव, चेकवर तू लिहिलेलं नाव फक्त या बँकेत आणि या रकमेसाठी आहे. तुमचीच चार-पाच तासात सुटका होईल असं वाटत नाही. तुम्ही मला एवढी मोठी रक्कम दिली आहे. तेव्हा तुम्ही दोघांनी मरावं, असं मला वाटत नाही. मी पॅरिसला पोहोचल्याबरोबर पोलिसांना फोन करून तुझी सुटका करण्याची व्यवस्था करीन हं. अच्छा, तर मग मी निघतो. धन्यवाद! तो इजिडोरच्या डोक्यावर खिजवण्यासाठी टप्पल मारून चालता झाला.

चोर निघून गेल्यावर चिडून थकलेली बिचारी इली खुर्चीतच निर्धास्तपणे झोपी गेली. कदाचित



**मीच मनाशी प्रश्न निर्मितो, मीच उत्तरे देतो। विषादात मन जाता, उधळुन लगाम हाती घेतो।।**

रेडिओवरील ''मला समुद्र किनाऱ्यावर आवडत नाही.'' या आशयाच्या गाण्याने अंगाईगीताचे काम केले असावे. इजिडोर मात्र अजूनही तसाच बसून होता आणि आता हा चोर बँकेत गेल्यावर काय काय घडत असेल, याचे डोळ्यापुढे चित्र उभे करीत होता. मात्र तोंड बांधल्याने इच्छा असूनही त्याला हसता येत नव्हते आणि त्याचेच त्याला दु:ख होत होते.

आता पावणे तीन वाजले होते. श्री. रिचर्ड जॉन्सन मॅनेजरशी बोलत असावेत. मॅनेजर त्याने सादर केलेला चेक अतिशय काळजीपूर्वक बघत असावेत. त्याने श्री. जॉन्सन यांना केबिन बाहेर बसण्यास सांगितले आहे.

तेवढ्यात भिंतीवरील घड्याळाने तीनचे टोल दिले. कोणत्याही क्षणी आपल्या दारावरील बेल वाजेल, अशी अपेक्षा करीत इजिडोर बसला होता. पण तसे काहीच घडले नाही. रेडिओवर मात्र समुद्रकिनारा, त्यावरील सकाळ-संध्याकाळची थंड झुळूक, मावळता सूर्य, केशरी पाणी, पांढरे शुभ्र सीगल्स यांच्या सौंदर्याचे दुसरे गाणे गात होता. त्याने काही काळ इजिडोर सुखावला. तीन वाजून पंधरा मिनिटे झाली तरीसुद्धा... त्याला आता त्या गाण्याचा संताप आला होता. रेडिओ बंद करून टाकण्याची तीव्र इच्छा झाली होती.

... तर मग श्री. जॉन्सन, एअरपोर्टवर पोचला की काय, असा विचार त्याच्या मनात डोकावला आणि तेवढ्यात बैठकीच्या खिडकीची मोठी काच जमिनीवर आदळून फुटल्याचा मोठा आवाज झाला. इजिडोर दचकलाच पण एलजीही दचकून जागी झाली. इजिडोरचा पोलिस मित्र त्यांच्यापुढे उभा होता. घाईघाईने मित्राने त्यांची तोंडे मोकळी करून त्यांच्या तोंडातील बोळे ओढून काढून फेकून दिले आणि म्हणाला, ''इजिडोर मला तू बावळट वाटायचास, पण तू खरोखर ग्रेट आहेस. हे बघ इझी, तुझी युक्ती फारच नामी होती. आम्ही त्या बदमाशाला ताब्यात घेतला आहे. या तऱ्हेने अनेक लोकांना त्याने लुबाडले असल्याने, फार दिवसांपासून आम्ही त्याला पकडण्याच्या प्रयत्नात होतो. आमच्या पोलिसखात्याचे काम तूच केलेस. त्यामुळे तू आणखीनच प्रसिद्धीच्या झोतात येणार आहेस. समजतंय का मी काय सांगतोय ते? आता तुझा सत्कार होईल खात्यातर्फे आणि तोसुद्धा खाजगीरित्या. शिवाय या कार्यक्रमाचा फोटो किंवा त्याला पकडल्याची बातमी देण्याचीही आमची पद्धत नाही. नाहीतर त्यामुळे इतर गुन्हेगार सावध होतात आणि हो, शिवाय तुला त्याला पकडल्याबद्दल माहीत नाही किती पण रोख रकमेचं बक्षिसही मिळेल.'' इतकं सगळं एका दमात बोलून बॉब ब्राऊन थांबला.

''इजी, हा सारा काय प्रकार आहे?'' इलजी म्हणाली.

''हे बघ इली, मी चेकवर आय. एन. पेन अशी सही केली आहे.''

''बरं मग?''

''बरं मग, काय? मी काल बँकेत खातं उघडताना तशीच सही फॉर्मवर केली. तेव्हा मी माझ्या आद्याक्षरांना एकत्र केल्यावर त्याचा 'इन' झाला आणि पेन म्हणजे तर काय वेदना, दु:खच. या श्रीमंतीच्या प्रसिद्धीनं मी मनात धास्तावलो होतो. मग मी मॅनेजरला सांगितलं की या पैशांनी माझ्यावर संकट आले तर मी 'इन पेन' अशी करीन नाही तर सरळ 'इजिडोर पेन' अशी सही करीन. लक्षात ठेवा. म्हणून या फॉर्मवर मी दोन्ही सह्या करून ठेवल्यात समजलं.'' चेकवर जेव्हा 'आय.एन.पेन' अशी सही असेल तेव्हा तुम्ही संकटात असून तुम्हाला मदतीची गरज आहे, असं आम्ही समजू; असं मॅनेजरने त्याला आश्वासनही दिलं होतं.

इजिडोरकडून हे ऐकून इलजी म्हणाली, ''पण तू तर मला हे काहीच सांगितलं नाहीस.''

''कसं सांगणार, बँकेतून आल्यावर सगळं सविस्तर सांगत होतो तर 'पुरे तुझे बँक पुराण' नावाचा बोळा तू माझ्या तोंडात कोंबलास ना.''

अजूनही इजिडोरने तो चेक सांभाळून ठेवला आहे आणि तो त्याच्या मित्रांना ही घटना अतिशय अभिमानाने सांगत असतो.

पुन: पुन: सुद्धा.

***

**अविनाश दर्प**
१११८/८/ए,
राधाकृष्ण सोसा.,
लकाकी रोड, पुणे १६.



**दूर दूर त्या दिवसापासून, आलो येथे दरियापाशी, फेसाळती पण या दरियावर, त्या दिवसाच्या धूसर राशी ।।**


# भूमितीतील सौंदर्य !

भूमिती म्हणजे सिद्धांत, प्रमेये, आकृत्या यांचं जंजाळ! त्यामुळे हा विषय क्लिष्ट असं अनेकांचं मत बनलेलं असतं. पण भूमितीतील रेषांतही काव्य असतं. सौंदर्य असतं. वर्तुळ, त्रिकोण, चौकोन इ. नियमित आकृत्यांच्या आकर्षक मेळातूनही सुंदर आकृत्या तयार होतात.


अशाच दोन सौंदर्याकृती कशा तयार होतात, याचा परिचय करून घेऊया.

## १. चौरसाचा वापर करून सौंदर्याकृती तयार करणे

प्रथमत: ABCD हा एक मोठा चौरस काढून घ्या. आकृतीत




दाखविल्याप्रमाणे ह्या चौरसाच्या प्रत्येक बाजूवर A, B, C आणि E, F, G, H ह्या बिंदूपासून समान अंतरावर अनुक्रमे हे चार बिंदू काढा. ह्या बिंदूंचे अंतर चौरसाच्या बाजूंच्या तुलनेत लहान असायला हवे. हे चार बिंदू जोडले की तुम्हाला पहिल्या चौरसाच्या आत आणखी एक नवीन, पण जरासा तिरका चौरस मिळेल. ह्या नव्या चौरसाच्या चारही बाजूंवर त्याच दिशेत व तेवढेच अंतर मोजून जे चार बिंदू मिळतील ते जोडलेत की आणखी एक तिरका चौकोन मिळेल. नवनवीन चौरस काढण्याची ही क्रिया अशीच चालू ठेवा. प्रत्येक वेळी तुम्हाला अधिकाधिक लहान व





अधिकाधिक तिरका चौकोन मिळत जाईल. जितक्या लहान चौरसापर्यंत तुम्हाला ह्या क्रियेची पुनरावृत्ती करता येईल तेवढी करा. वरील आकृतीमध्ये दाखविल्या- प्रमाणे तुम्हाला आपोआप चार वक्र मार्ग दिसू लागतील.

याच पद्धतीचा उपयोग करून, समभुज त्रिकोणाचा वापर करून अशीच एखादी सौंदर्याकृती या सुट्टीत तुम्ही तयार करा.

***

## २. वर्तुळाच्या साहाय्याने मनमोहक आकृतीबंध तयार करणे.

सुयोग्य व्यासाचे एक वर्तुळ काढा व त्याच्या परिघाचे समान भाग करा. वर्तुळाचे १५ अंशाचे विभाग केले तर परिघावर एकूण २४ बिंदू मिळतील. परिघावरील हे बिंदू केंद्र आहेत असे



मानून, समान व्यासाची २४ वर्तुळे रेखाटा. आकृती तयार होत असतानाच एक मनमोहक आकृतीबंध निर्माण होत आहे, असे तुमच्या लक्षात येईल.

***

('चला भूमितीशी खेळूया' या प्रा. मोहन आपटे यांच्या पुस्तकातून साभार)

## हस्तलिखित, ध्वनिफित निर्मिती व कोलाज या स्पर्धांचा निर्णय व परीक्षकांचे अभिप्राय

छात्र प्रबोधनाने या वर्षी घेतलेल्या हस्तलिखित स्पर्धेत ५३ विद्यार्थी-गटांनी भाग घेतला. सहभागाची ही संख्या उत्साहवर्धक आहे. छात्र प्रबोधनचा उद्देश फक्त स्वत: एक मासिक काढणे एवढ्यापुरता मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना नवनिर्मितीची प्रेरणा देणारी ती एक कृतिशील चळवळ आहे, हे या स्पर्धेच्या निमित्ताने स्पष्ट झाले. विद्यार्थीच संपादक, विद्यार्थीच लेखक, विद्यार्थीच चित्रकार अशाप्रकारे संपूर्णपणे विद्यार्थ्यांनीच ही हस्तलिखिते तयार केली. शेकडो विद्यार्थ्यांचे हात, मने या नवनिर्मितीच्या कार्यात, प्रतिभेच्या आविष्कारात रमली होती. या कामातून मिळणारा निखळ आनंद हेच खरे तर या स्पर्धेचे प्रत्येकाला मिळालेले बक्षीस आहे. तथापि, त्यातही काही हस्तलिखितांची कामगिरी ही अधिक देखणी, अधिक कौतुकास्पद झालेली आहे. त्यांना आपण जाहीर केल्याप्रमाणे बक्षिसे देत आहोत. स्पर्धेचा निकाल पुढे दिला आहे. सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व यशस्वी स्पर्धकांचे मन:पूर्वक अभिनंदन !

छात्र प्रबोधन आयोजित तुम्हीच संपादक व्हा- हस्तलिखित स्पर्धेचा निर्णय

क्र.१-'भरारी' ज्ञान प्रबोधिनी, रसायनी उपक्रम केंद्र

क्र.२- 'भावगंध' फाटक हायस्कूल, रत्नागिरी

क्र.३-१) 'इंद्रधनू' प्रेरणा बनकर, २) स्वतंत्र गट- 'अग्रज्ञेय' चंद्रकांत पाटकर विद्यालय, डोंबिवली

उत्तेजनार्थ- १) 'कस्तुरी' - न्यू इंग्लिश स्कूल, सातारा

२) 'बीज अंकुरे अंकुरे'- चंद्रकांत पाटकर हायस्कूल, डोंबिवली

३) आनंदनगरी- अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत

**विशेष बक्षिसे**

उत्कृष्ट जाहिरात- 'स्वानंद' गोगटे क्लास, प्रेरणा

उत्कृष्ट कथा १) 'पैज'- भावगंध लेखिका- मानसी जोशी

२) **DNA** ची किमया- (लेखक- रोहित पांढारकर) विज्ञान व वैभव जागुष्टे 'विज्ञान कथा विश्व'

उत्कृष्ट आतील चित्रे - १. हसा हसत राहा. पु.लं. चे चित्र - जुई सोनावणे 'साहित्याचा खजिना'

२. नीलेश पाटील- हृदयपुष्प

उत्कृष्ट मुखपृष्ठ- 'कस्तुरी' न्यू इंग्लिश स्कूल सातारा

आतील सजावट- शक्तिमान भारत

उत्कृष्ट लेख- श्रेयस उकिडवे

२) चिंटू- लेखक- प्रणव पंडित 'व्यक्ति तितक्या प्रकृती'

वरील हस्तलिखितांव्यतिरिक्त खालील हस्तलिखिते चांगली गुणवत्ता असणारी आहेत.

१. 'स्वानंद' - गोगटे क्लासेस, पेण. २. 'बहर' - अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत. ३. 'अमृतकुंभ'- अभिनव ज्ञान मंदिर, कर्जत. ४. 'अनंतरंग'- अभिनव ज्ञान मंदिर, कर्जत. ५. 'शिक्षा'- सुदामस्मृती, हनुमान नगर नांदिवली रोड, डोंबिवली ६. 'जागृती' - न्यू इंग्लिश स्कूल कसाळ, ता. कुडाळ.

७. 'संतवाङ्मय'- पी. जोग हायस्कूल, पुणे. ८. 'शक्तिमान भारत'- भारत विद्यालय, अकोला.

१०. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' - ज्ञान प्रबोधिनी, पुणे. ११. 'बालमित्र'- पाटकर विद्यालय, डोंबिवली.

१२. 'कथाजगत' - पाटकर विद्यालय, डोंबिवली. १३. 'सौरभ'- टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली.

१४. 'भरारी'- टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली.

१५. 'एच्.आय्.व्ही. एड्स'-न्यू इंग्लिश स्कूल, वसई

१६. 'स्त्रीशक्ती' - न्यू इंग्लिश स्कूल, वसई.

याशिवाय अन्य सहभागी शाळा-

अभिनव ज्ञानमंदिर कर्जत-

१२ हस्तलिखिते, पाटकर विद्यालय- डोंबिवली, ज्ञान प्रबोधिनी- पुणे, मालपाणी विद्यालय- संगमनेर, श्री सारंगस्वामी विद्यालय - परभणी, न्यू इंग्लिश स्कल - वसई, दहिवली- कर्जत, जत हायस्कूल, उंटवाडी - नाशिक, पंकज विद्यालय - चोपडा, आर.सी.एफ्. हायस्कूल - कुरुळ, आशिष मगरे - स्वतंत्र, जयरामभाई हायस्कूल - नाशिकरोड, गुरुकुल, प्रकल्प, ज्ञान प्रबोधिनी-नवनगर निगडी.

तुम्हीच संपादक व्हा –

परीक्षकांचे मनोगत

'छात्र प्रबोधन' ने आयोजित केलेल्या या स्पर्धेसाठी, परीक्षक म्हणून काम करणे हा खूप आनंददायी अनुभव होता. सध्या इंग्रजीचे स्तोम नको इतके वाढले आहे. त्यात पालकांच्या काही गैरसमजुतींमुळे मुलांना मराठी धड बोलताही येत नाही. पण हस्तलिखित अंकाच्या या स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता. एकूण ५३ अंक स्पर्धेसाठी आले. त्यांत मुंबई आणि परिसरातील शाळांप्रमाणे परभणी, संगमनेर, कुडाळ, रत्नागिरी, पेण अशा गावांतील शाळांचाही सहभाग आहे. या सर्व स्पर्धकांचे कौतुक वाटते.

बहुतेक अंक चांगले आहेत. अंकाच्या निर्मितीत खूप वेगळा आनंद मिळाला, एकजुटीचा अनुभव आला, अभ्यास सांभाळूनही हे काम आम्ही चांगल्या प्रकारे करू शकलो, आमचा आत्मविश्वास वाढला इ. प्रतिक्रिया सहभागी विद्यार्थ्यांनी कळवल्या आहेत. त्यांची अशी पत्रे म्हणजे स्पर्धा यशस्वी झाल्याची पावतीच आहे. ज्यांच्यासाठी स्पर्धा योजली त्यांना त्यामागचा नेमका उद्देश समजला, याचे संयोजकांनाही मोठे समाधान वाटले. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील लेखक, कवी, चित्रकार यांनी एकत्र यावे, सुंदर हस्ताक्षरात एक-दोघांनी सर्व मजकूर लिहून काढावा, दोघा-तिघांनी अंकाची सजावट करावी... यामुळे केवळ एक हस्तलिखित तयार होते, असे नाही तर निर्मितीच्या आनंदाचा एक विलक्षण अनुभव मुलांना मिळतो. स्वत:च्या गुणांची त्यांना जाणीव होते. त्यांना विधायक कामाची प्रेरणा मिळते. ही जाणीव, ही प्रेरणा समाजाची मोठी शक्ती असते.

या स्पर्धेचा निर्णय वाचल्यावर, लहान गावातील विद्यार्थीही पारितोषिके पटकावू शकतात, हे कळून, मुलांचा उत्साह नक्कीच वाढेल. जाहिरातीचे पारितोषिक पेणच्या गोगटे क्लासमधील नीलेश वेदपाठक याने मिळवले आहे. अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत या शाळेच्या जुई सोनावणेने पु.ल. देशपांडे यांचे अर्कचित्र (कॅरिकेचर) सुरेख काढले आहे. नीलेश पाटील, अभिनव ज्ञानमंदिर कर्जत यानेही सुंदर चित्रे काढली आहेत.

बऱ्याच अंकांतून पु.ल.देशपांडे, कौन बनेगा करोडपती, गुजराथमधील भूकंप, या विषयांचा प्रभाव जाणवला. काही ठिकाणी लेख जसेच्या तसे उतरवून काढले आहेत. संकलनात्मक अंकात हे ठीक आहे. पण सर्वसाधारण अंकात असे नसावे. 'शिक्षा' या वेगळ्या विषयावरच एक अंक आहे. त्यातील काही लेख शिक्षिकांनी लिहिले आहेत! काहींनी दुसऱ्यांच्या कविता आपल्या नावावर दिल्या आहेत. अंकातील साहित्य हे त्या त्या मुलाचे-मुलीचे, स्वत:चेच असायला हवे. शाळेतील शिक्षकांनीही मुलांना याबाबत सूचना द्यायला हवी. एका अंकात भुतखेते इ. विषयांवर कथा आहेत. असले अंधश्रद्धेचे विषय कटाक्षाने टाळले पाहिजेत.

तसेच, माहितीचे संकलन अचूक असले पाहिजे. देवीची लस, लुई पाश्चरने शोधून काढली, असे एके ठिकाणी लिहिले आहे. देवीची लस एडवर्ड जेन्नरने शोधून काढली. निरंजन घाटे हे संशोधक आहेत, असे एकाने लिहिले आहे. श्री. घाटे संशोधक नाहीत, विज्ञानकथा लिहिणारे लेखक आहेत. अशा चुका टाळणे शक्य आहे.

बहुतेक अंकातील हस्ताक्षर चांगले आहे. बहर, संतवाङ्मय, स्वानंद, काजवा, इंद्रधनु वगैरे अंकांमधील हस्ताक्षर सुंदर आहे. शुद्धलेखनही चांगले आहे.

एच्.आय.व्ही.एड्स या विषयावर एक अंक आहे हे विशेष!

विज्ञानविषयक लेख किंवा संपूर्ण अंक, असेही प्रयत्न चांगले आहेत. माझ्या छोट्या मित्रमैत्रिणींनी तयार केलेल्या अंकांमुळे, मायमराठीला उज्ज्वल भविष्य लाभेल, अशी आशा वाटते. पुरस्कारप्राप्त अंक खरोखरच सुरेख आहेत. सर्व विजेत्यांचे अभिनंदन ! सर्व स्पर्धकांनाही शाबासकी- स्पर्धा यशस्वी केल्याबद्दल ! धन्यवाद.

**स्पर्धेचे परीक्षक –** शकुन्तला फडणीस, शैलजा देशमुख, आश्लेषा महाजन.

**ध्वनिफीत निर्मिती स्पर्धा :** निकाल

क्र.१-'आली दिपावळी' टिळकनगर विद्यामंदिर- डोंबिवली.

क्र.२- 'क्षितिजावरचे तारे भाग २', अभिनव ज्ञानमंदिर प्रशाला- कर्जत.

क्र.३- 'नवरंग', नाशिक एज्यु.सो. प्राथमिक विद्यालय- उंटवाडी.

उत्तेजनार्थ- १) 'स्वरनिनाद' फाटक हायस्कूल- रत्नागिरी.

२) 'पंख सुरांचे' - ज्ञानप्रबोधिनी उपक्रम केंद्र, रसायनी.

'तुम्हीच संपादक व्हा' या स्पर्धेच्या 'पंख सुरांचे- ध्वनिफीत

निर्मिती स्पर्धा' आपण जाहीर केली होती. एकूण सात गटांनी आपल्या ध्वनिफिती स्पर्धेसाठी पाठवल्या. ज्ञान प्रबोधिनी उपक्रम केंद्र, रसायनी, टिळकनगर विद्यामंदिर- डोंबिवली, अभिनव ज्ञानमंदिर प्रशाला, कर्जत यांच्या दोन ध्वनिफिती, नाशिक एज्यु. सोसायटी उंटवाडी सिडको- नाशिक, फाटक हायस्कूल- रत्नागिरी, सुमित सोमवंशी- बदलापूर यांचा सहभाग स्पर्धेत होता.

**ध्वनिफीत स्पर्धा**

**परीक्षकांचे मनोगत**

'ध्वनिफीत स्पर्धा' या नाविन्यपूर्ण स्पर्धेचे परीक्षण करत असताना मुलांची कल्पनाशक्ती, धडपड, नवीन काही करण्याची जिद्द, एकत्रित प्रयत्न, सादरीकरण, विविध विषयातील ज्ञान हे सर्व मला ऐकायला मिळाले अन् कौतुक वाटले. ध्वनिफीत म्हटली की सर्वप्रथम आपल्या दृष्टीस पडते ते त्याचे बाह्यआवरण (बहुधा त्यास इन्ले कार्ड म्हणतात.) या स्पर्धेत फक्त फाटक हायस्कूलनेच हे बाह्यआवरण अत्यंत आकर्षक व सुबक, व्यावसायिक ध्वनिफितीच्या तोडीस तोड असे केले आहे. याबद्दल त्यांचे कौतुक व्हावयास हवे.

ध्वनिफितीचे शीर्षकही आकर्षक हवे, असे की जे वाचल्यावर आतील मजकुराची कल्पना येऊन ती ऐकाविशी वाटावी. यादृष्टीने मला सर्वात आवडलेले शीर्षक म्हणजे बदलापूरच्या शाळेचे 'इटुकल्या पिटुकल्यांची धमाल'. ● कर्जतच्या शाळेचे 'क्षितिजावरचे तारे' हे शीर्षक चांगले आहे. कर्जतच्या शाळेने दोन ध्वनिफिती पाठविल्या आहेत. त्यांचे शीर्षक व शीर्षकगीत मात्र दोन्हींचे एकच आहे. यामुळे गुण अर्थातच कमी झाले. ●बदलापूरच्या ध्वनिफितीमध्ये एका बालरोगतज्ज्ञाची मुलाखत घेतली आहे. ती अतिशय प्रभावी आहे. ●रसायनीच्या शाळेने स्वरमंडलावर गीत वाजविले आहे. उत्तम, नाविन्यपूर्ण तसेच एका मुलाने पक्ष्यांचे आवाज काढले आहेत. स्वरसाजमध्ये अगदी वेगळीच वाद्ये वाजविली आहेत. काही ध्वनिफितीत शीर्षकगीतच केलेले नाही, तर काहींमध्ये नाविन्य भरपूर, आशयवैविध्य खूप पण सादरीकरणाचा दर्जा तितका चांगला नाही. म्हणजे एकावेळी या सर्व गोष्टींचे भान असणे प्रभावाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. ● नाशिकच्या शाळेच्या ध्वनिफितीमध्ये नाविन्य, आशय वैविध्य खूपच आहे. लहान (प्राथमिक शाळेतील) मुलांचे सादरीकरणही छान आहे. परंतु त्यांचे निवेदन शाळेतील शिक्षिकेने श्रीमती कस्तुरे यांनी केले.

हे परीक्षण करताना आम्हाला आनंद मिळाला आणि एक वेगळाच अनुभव मिळाला.

**परीक्षण – सौ. नलिनी गुजराथी, सौ. तेजस्विनी भावे.**

यावर्षीची तिसरी स्पर्धा होती कोलाज चित्रस्पर्धा. दिवाळी अंकात श्री. प्रभाकर भावे यांचा यासंदर्भातील लेख प्रकाशित झाला होता. त्यातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार चित्रे काढायची होती. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला एकूण ६८ जणांनी या स्पर्धेत भाग घेतला.

**कोलाज चित्र स्पर्धा निकाल**

क्र. १ – श्रेय व्होरा, इ. ८ वी, विद्या प्रतिष्ठान बाल-विकास मंदिर, बारामती.

क्र. २ – आनंदी देशपांडे, इ. ८ वी, विद्या प्रतिष्ठान बाल-विकास मंदिर, बारामती.

क्र. ३ – स्वप्निल भिसे, इ. ७ वी, टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली.

उत्तेजनार्थ- क्र. १ – प्रियांका पारख, इ. ९ वी, मालपाणी विद्यालय, संगमनेर.

क्र. २ – स्वाती भानगिरे, इ. ८ वी, महाराष्ट्र आरोग्य मंडळ माध्यमिक विद्यालय, महमदवाडी.

क्र. ३ – किरण जाजू, इ. ९ वी, पुणतांबा.

**परीक्षकांचे मनोगत**

या चित्रांचे परीक्षण करताना केलेली निरीक्षणे पुढीलप्रमाणे-

● सर्वच मुलांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

● काही चित्रांत रंगाचा वापर केला आहे.

● काही चित्रांतून केवळ दाटीवाटीमुळे आशय स्पष्ट होत नाही.

● अनेकांनी कल्पनाशक्ती वापरली आहे.

● काही चित्रांच्या उठावासाठी अनावश्यक बाह्यरेखा (आऊट लाईन्स) वापरल्या आहेत.

● पार्श्वभागासाठी डार्क शेड वापरल्याने काही चित्रांचा उठाव कमी आहे.

सर्व स्पर्धांमधील सहभागी व यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन व कौतुक !




रंग देखता देखता, डोळे आलेत भरून, झुलू लागली पालवी अंगप्रत्यंगांमधून

# हे तुम्हाला माहीत आहे का?

प्रखर उजेडातून एकदम काळोख्या खोलीत गेल्यास काहीच दिसत नाही, परंतु नंतर मात्र खोलीतील वस्तू हळूहळू दिसू लागतात, याचे कारण काय? हे आपण पाहूया.

आपला डोळा तीन प्रकारच्या आवरणांनी बनलेला असतो. यातील सर्वांत जो आतील थर असतो त्याला दृष्टिपटल (किंवा रेटिना) असे म्हणतात. (आकृती अ पाहा.)



आकृती – अ


बाहेरच्या वस्तूकडून येणारा प्रकाश डोळ्यात शिरून, दृष्टिपटलावर पडला, की ती वस्तू आपल्याला दिसते. आपल्या दृष्टिपटलात काही विशिष्ट प्रकारच्या लहानलहान पेशी असतात. (खडूची कांडी दंडगोलाकार असतात. (खडूची कांडी दंडगोलाकार असते.) पेशींमध्ये ऱ्होडॉप्सिन नावाचे एक द्रव्य असते. या द्रव्यामुळे आपल्याला आजूबाजूच्या वस्तू दिसतात. डोळ्यात शिरलेला प्रकाश जेव्हा दृष्टिपटलावर पडतो तेव्हा त्या प्रकाशामुळे ऱ्होडॉप्सिनचे दोन घटकांमध्ये विघटन होते (म्हणजे ऱ्होडॉप्सिनपासून दोन वेगळी द्रव्ये बनतात.) विघटनाच्या या रासायनिक क्रियेमुळे, दृष्टीच्या चेतातंतूंमधून, मेंदूतील दृष्टिकेंद्राकडे संदेश पाठविले जातात. मेंदूला हे संदेश मिळाले की आपल्याला ती वस्तू दिसते. आपले डोळे नेहमीच उघडे असतात व आपल्या डोळ्यांत बाहेरचा प्रकाश नेहमीच जात असतो. मग दृष्टिपटलातील ऱ्होडॉप्सिनचे विघटन होऊन ते द्रव्य संपून कसे जात नाही? दृष्टिपटलातील ऱ्होडॉप्सिन संपून गेले तर सगळीच माणसे आंधळी होतील. मग असे का होत नाही?

ऱ्होडॉप्सिनच्या विघटनामुळे निर्माण झालेल्या दोन द्रव्यांचा सतत संयोग होत असतो. म्हणजे, ती दोन द्रव्ये एकमेकांशी सतत जुळत असतात व या जुळणीतून ऱ्होडॉप्सिन पुन्हा तयार होत असते. त्यामुळे प्रखर उजेडात आपण जरी खूप वेळ बसलो तरी डोळ्यांना त्रास होतो, परंतु आंधळेपणा येत नाही. प्रकाशामुळे ऱ्होडॉप्सिनचे विघटन फार जलद होते. दोन घटकद्रव्यांचा पुन्हा संयोग होऊन ऱ्होडॉप्सिन तयार होण्यास मात्र त्या मानाने किंचित् जास्त वेळ लागतो. पेढ्याच्या ताटावर बसलेल्या माश्या हाताने हाकलल्या तरी त्या जशा पुन्हा तेथेच येऊन बसतात, तसाच थोडासा हा प्रकार आहे.

आपण जेव्हा प्रखर प्रकाशात (दुपारच्या कडक उन्हात) असतो तेव्हा खूप प्रकाश डोळ्यात शिरल्यामुळे बऱ्याच ऱ्होडॉप्सिनचे विघटन होते. परंतु यानंतर जर आपण लगेच काळोखात गेलो तर तेथील अपुऱ्या प्रकाशामुळे, तसेच डोळ्यातील ऱ्होडॉप्सिनचे प्रमाण कमी झालेले असल्यामुळे, या द्रव्याचे विघटन कमी प्रमाणात होते. यामुळे मेंदूकडून जाणाऱ्या संदेशांची संख्या कमी होते.साहजिकच आपल्याला नीट दिसत नाही. अंधारात काही वेळ राहिल्यानंतर मात्र ऱ्होडॉप्सिन हळूहळू तयार होते व त्याच्या विघटनामुळे थोड्याच वेळात, आजूबाजूचे स्पष्ट दिसू लागते.

बराच वेळ उन्हात बसल्यावर जर आपण एकदम अंधारात गेलो तर थोड्या वेळानंतरच वस्तू दिसू लागतात, हे आपण पाहिले. याउलट, बराच वेळ अंधारात बसल्यावर जर आपण लगेच उन्हात गेलो तर सुरुवातीला डोळे दिपतात. याचे कारण काय असावे? जेव्हा आपण अंधारात असतो तेव्हा फारच थोडा प्रकाश डोळ्यात जात असतो. त्यामुळे बरेच ऱ्होडॉप्सिन दृष्टिपटलात तयार झालेले असते. अशावेळी जर एकदम प्रखर उजेड डोळ्यात गेला तर ऱ्होडॉप्सिनचे मोठ्या प्रमाणात विघटन होऊन मेंदूतील दृष्टिकेंद्राकडे एकदम मोठ्या संख्येने संदेश पाठविले जातात. एवढ्या मोठ्या प्रमाणात अचानकपणे मेंदूकडे येणारे संदेश आपण सहन करू शकत नाही. साहजिकच आपले डोळे मिटले जातात.

प्रखर उजेडात एकदम काळोखात गेल्यास लगेच दिसत नाही, याचे



आणखीही एक कारण आहे. प्रखर उजेडात डोळ्याची बाहुली लहान झालेली असते. काळोखात गेल्यावर ती मोठी व्हायला थोडा वेळ लागतो. बाहुली मोठी झाल्यावर जास्त प्रकाश डोळ्यात शिरू शकतो व त्यामुळे

अंधारातील वस्तू दिसायला मदत होते.

ऱ्होडॉप्सिन तयार करण्यासाठी लागणाऱ्या दोन घटकांपैकी एक घटक 'अ' जीवनसत्त्वापासून मिळतो. त्यामुळे 'अ' जीवनसत्त्व जर भरपूर प्रमाणात खाल्ले नाही (गाजरात व पालेभाज्यात भरपूर 'अ' जीवनसत्त्व असते.) तर 'रातांधळेपण' येते. रातांधळ्या माणसाला मंद प्रकाशात आपल्याकडे स्पष्ट दिसत नाही.

●●●

('कुतूहल' या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राच्या पुस्तकातून साभार)

कथा विशेषांक

**(अनुवादित कथा)**




प्रिय देवा,

माझे नाव चार्ल्स. काल मी बारा वर्षाचा झालो. तुला बहुतेक कळलं असेलच. हे पत्र मी स्वत: टाईप करतोय. मला हाताने लिहिणे अवघड जाते. या प्रश्नाला Dysgraphia म्हणतात. मला Attention Deficit Disorder पण आहे. याला जोडूनच Learning Disability हा ही प्रश्न येतो. माझा बुद्ध्यांक (I.Q.) मात्र बराच आहे.

मला हातात पेन्सिल कधीच नीट धरता येत नाही. कधीच दिलेल्या रेघांच्यामध्ये बरोबर रंगविता येत नाही. मी दर वेळी नीट लिहायचा, रंगवायचा खूप प्रयत्न करतो. पण बरेचदा माझी अक्षरे वेडीवाकडीच येतात. रंगवताना चित्र रंगवण्याऐवजी माझे हातच रंगतात. आमच्या शाळेत, कधी मुलांना आपापसात वह्या बदलून एकमेकांचा अभ्यास तपासायला सांगतात. कोणीच माझ्याबरोबर वही बदलायला तयार नसते. कारण माझे अक्षर कोणाला कळत नाही.

माझे हात काय करतात ते माझ्या मेंदूला कळत नाही. मी हातात पेन्सिल धरतो, पण माझ्या मेंदूला ते कळत नाही. मी जेव्हा पेन्सिल घट्ट पकडतो, तेव्हाच मी पेन्सिल हातात धरली आहे ते माझ्या मेंदूला कळते. लिहिण्यापेक्षा बोलणे, तोंडी अभ्यास मला जास्त सोपा जातो. पण दर वेळेस मला शिक्षक अशी परवानगी देतातच असे नाही. 'सहलीचे वर्णन' हा निबंध लिहिणे म्हणजे मला शिक्षाच वाटते. मला बोलण्याची परवानगी दिली तर मी खूप वर्णन सांगू शकतो. आपल्या देशाची राजधानी बघताना मला देशाचा किती अभिमान वाटत होता. पण त्या देशप्रेमाच्या भावना मला लिहिता आल्या नाहीत. चित्रकलेत तर मला 'शून्य'सुद्धा मिळू शकते. खरे तर माझ्या मनात मी किती गोष्टी काढतो आणि रंगवतो. फक्त प्रश्न असा आहे की माझ्या हातांना ते प्रत्यक्षात कागदावर काढणे मुळीच जमत नाही.

आहे हे ठीक आहे. याबाबत माझी मुळीच तक्रार नाही. मी खरंच मजेत आहे. तू मला मस्त मन दिले आहेस आणि छान खेळकरवृत्ती, विनोदबुद्धी दिली आहेस. मला माझे प्रश्न सोडवता येतात. मला वादविवाद करायला आवडतो. आमच्या वर्गात बायबलवर चर्चा असतात. मी त्यात भाग घेतो आणि सगळ्या मुलात उठून दिसतो. मला मोठेपणी वकील व्हायचे आहे. मला माहीत आहे, ते मला नक्की चांगले जमू शकेल. खटल्याचा नीट अभ्यास करणे, पुरावे गोळा करणे आणि खरेपणाने मांडणे हे मला करायचे आहे.

तू मला वेगळे बनवले आहेस. मला खात्री आहे, तू माझी नीट काळजी घेशील. मला माहिती आहे, माझ्या भविष्यासाठी तू आधीच योजना केली आहेस. तू मला जगताना आशा बाळगायला शिकवलेस.

माझे आई, बाबा मला खूप मदत करतात. त्यांनी माझ्यासाठी लॅपटॉप कॉम्प्युटर आणला आहे. यावर्षीच्या शिक्षिका पण खूप छान आहेत. बहुतेक अभ्यासासाठी मला लॅपटॉप वापरायला त्या परवानगी देतात. चित्रकलेसाठी मी लॅपटॉप वापरला तरी चालेल अशी त्यांनी मला परवानगी दिली, ज्याचा मला विशेष आनंद झाला. आता पहिल्यांदाच माझ्या मनातले चित्र मी प्रत्यक्षात काढू शकेन असे वाटते.

हे देवा, हे पत्र तुला 'Thank you' म्हणण्यासाठी आहे. तुला फक्त सांगायचे होते की माझे छान चालू आहे. आयुष्यात काही गोष्टी अवघड असतात, पण तुला एक सांगू का? मी आव्हाने झेलायचे ठरवले आहे. कुठल्याही प्रसंगातून मी जाऊ शकतो, असा माझा विश्वास आहे. तू मला 'मी' बनवलेस म्हणून मनापासून धन्यवाद. तुझे निरपेक्ष प्रेम आणि तू दिलेल्या सर्वच गोष्टींचा मी कायम ऋणी राहीन.

तुझा चार्ल्स.

***

**मराठी रूपांतर – उमा बापट**
सान्ताबार्बरा, एस. पॅटर्सन अव्हेन्यू
कॅलिफोर्निया, ९३१११, यु.एस.ए.

**मूळ कथा** Dear God This is Charles by Charles Jnglehart,

## विद्यार्थ्यांच्या विकसनाच्या चळवळीत आपलेही योगदान हवे आहे!

*खालील ठिकाणी, स्थानिक कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांसाठी नियमित उपक्रम सुरू केले आहेत. व्यक्तिमत्त्व विकसनाच्या अनुषंगाने साप्ताहिक उपक्रम, प्रासंगिक साहस सहली, अभ्यासपूर्ण प्रकल्प भेटी, विक्री उपक्रम, इ. प्रकारचे कार्यक्रम प्रामुख्याने ५ वी, ६ वी ते १० वी, ११ वी या वयोगटासाठी तेथे चालतात. असे उपक्रम विविध गावांमध्ये सुरू व्हावेत हीच या मासिकामागची मूळ कल्पना आहे. जेथे जेथे स्थानिक व्यक्ती पुढाकार घेऊन असे कार्यक्रम नियमितपणे, स्वयंसेवीवृत्तीने, विद्यार्थ्यांसाठी राबवू इच्छितात अशांना प्रबोधिनीकडून शक्य ते सर्व सहकार्य उपलब्ध होईल. त्या सर्वांनी छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयाशी अवश्य संपर्क साधावा. या उपक्रम केंद्रांशिवाय अजून काही ठिकाणी छात्र प्रबोधन मासिकाची नोंदणी/वितरण केंद्रे आहेत. तेथे मासिकाची नोंदणी तसेच प्रबोधिनीद्वारा प्रकाशित पुस्तकांची विक्री होते. त्यांचे पत्ते पान क्र. २७ पासून पुढे पानाच्या शेवटी दिले आहेत. ते अवश्य पाहावेत. आपल्या गावात असे केंद्र असल्यास त्यांच्याशी संपर्क साधून आवश्यक ते सर्व सहकार्य करावे. केंद्र अधिक बळकट करण्यासाठी, नियमित उपक्रम सुरू होण्यासाठी अथवा चालू असलेले उपक्रम अनेक ठिकाणी सुरू होण्यासाठी, केंद्र अधिक वैविध्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण होण्यासाठी आपण स्वत:हून योगदान करावे ही अपेक्षा. जेथे अशी केंद्रे अजून नाहीतच तेथे आपण पुढाकार घेऊन वितरण केंद्र/नोंदणी केंद्र सुरू करावे. त्याबाबत पत्रव्यवहार केल्यास तपशील कळवले जातील. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाच्या चळवळीत आपल्यासारख्या अनेकांचे योगदान गरजेचे आहे. आपण त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद द्याल असा विश्वास वाटतो.*

## छात्र प्रबोधनची उपक्रम केंद्रे

बोरिवली केंद्र - सौ.अंजली जोशी, ४०१ माणिक टेरेस, कस्तुर पार्क, डोंबिवली पार्क, बोरिवली (प.) मुंबई ४०००९२ ८९८६२५९
डोंबिवली केंद्र - सौ. सविता ढोणसाळे, बी/१३ कॉमेटकुंज हौ.सो., डोंबिवली (पू.) ४५४६८८.
नागोठणे केंद्र-सौ. साधना गोसावी, बी-२५० पेट्रोकेमिकल्स टाऊनशिप, ता.पेण, जि.रायगड ४०२१२५ ७६०९
अलिबाग केंद्र-श्री.राम जोशी, १ कृष्णविहार, समर्थनगर, पिंपळभाट, अलिबाग ४०२२०१ २५३०९
इचलकरंजी केंद्र-श्री. विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६८ अ, झेंडा चौक, इचलकरंजी, जि. कोल्हापूर ४१६११५ ४२४००८
रत्नागिरी केंद्र-सौ. सुजाता नलावडे, ७९८ ब, माजगाव रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी ४१५६१२ २२००४
सांगली केंद्र-श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली ४१६४१६ ३३१३८२
अंबेजोगाई केंद्र-श्री. प्रसाद चिक्षे, मधुस्मृती, केशवनगर, अंबेजोगाई, जि.बीड ४३१५१७
नाशिक केंद्र-सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म.गांधी रस्ता, नाशिक ४२२००१ ५७४८३०
पुणे केंद्र-चौकशी कक्ष, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. ४४७७६९१

## छात्र प्रबोधनची अन्य केंद्रे

संगमनेर केंद्र-कु. सोनाली जाजू, बाजारपेठ, जगदीश मंदिराजवळ, विठोबा गल्ली, संगमनेर २५२५८
कोपरगाव केंद्र-डॉ. अंजली फडके, फडके हॉस्पिटल, धरणगाव रोड, कोपरगाव, जि. अहमदनगर ४२३६०१ ७३९२७
प्रवरानगर केंद्र-चि. अमित विलायते, भगवती सप्तश्रृंगीनगर, बाभळेश्वर दोड, ता. राहाता, जि. अहमदनगर ४१३७१३ ७३९२७
कर्जत केंद्र-श्री. गजानन चावरे, गवंडे गल्ली, कर्जत, जि. अहमदनगर ४१४४०२ २२९१२
अहमदनगर केंद्र-कु. मानसी होळेहोन्नूर, ५६/२, अवधूत लेन, रासनेनगर, सावेडी, अहमदनगर ४२३१६४
निगडी केंद्र-ज्ञान प्रबोधिनी नवनगर केंद्र, पेठ क्र. २५, प्राधिकरण, पुणे ४११०४४ २५२५८
भोसरी केंद्र-डॉ.सौ.संगिता बोहेती, दिशा, मारुती मंदिराजवळ, पी.एम.टी.चौकामागे, भोसरी ७११०५७५
सासवड केंद्र-सौ. स्नेहल देशपांडे, 'गुरुकुल' सोसायटी, सोपानदेव मार्ग, मु.पो.सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे २२१३९
दौंड केंद्र-डॉ. राजेंद्र जोशी, चैतन्य हॉस्पिटल, दौंड, जि. पुणे ६२४५०/६२४९६

**हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ चैत्र शके १९२३, १ एप्रिल २००१ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले.**

**गुढीपाडवा, दिवस सणाचा, आनंदाचा, उत्साहाचा, नव वर्षाचा, नव आशांचा, नव्या नव्या शुभ संकल्पांचा.**

छात्र प्रबोधन-हिवमुरादे केंद्र-श्री.अशोक मुरादे, मु.हिवरा (मुरादे), पा.पिंप्रि (निपाणी), ता. नांदगाव, जि. अमरावती

# ज्ञान प्रबोधिनीद्वारा आयोजित उन्हाळी सुट्टीतील शिबिरे

## व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे

**पाचवी ते नववीपर्यंतच्या मुला-मुलींसाठी**

एप्रिल महिन्यात वेगवेगळ्या कालावधींमध्ये, वार्षिक परीक्षा संपल्यानंतर खालील गावांमध्ये तीन दिवसांची, रोज आठ तासांची व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे, ज्ञान प्रबोधिनीतर्फे योजली जाणार आहेत.

| जिल्हा | गाव | कालावधी |
|---|---|---|
| रायगड | कर्जत | १७ ते १९ एप्रिल |
| | पनवेल | २१ ते २३ एप्रिल |
| | पेण | २५ ते २७ एप्रिल |
| | हाशिवरे | २८ ते २९ एप्रिल |
| | लोधिवली | २७ ते २९ एप्रिल |
| अहमदनगर | पारनेर | १४ ते १६ एप्रिल |
| | जामखेड | १८ ते २० एप्रिल |
| | लोणी | २३ ते २५ एप्रिल |
| | पुणतांबा | २७ ते २९ एप्रिल |
| ठाणे | कल्याण | ८ ते १३ एप्रिल |
| | शहापूर | १८ ते २१ एप्रिल |
| | भिवंडी | २३ ते २५ एप्रिल |
| | बदलापूर | २७ ते २९ एप्रिल |
| | डोंबिवली | २७ ते २९ एप्रिल |
| सांगली | भिलवडी | १७ ते १९ एप्रिल |
| | जत | २१ ते २३ एप्रिल |
| | शिराळा | २६ ते २८ एप्रिल |
| पुणे | सासवड | १३ ते १५ एप्रिल |
| | बारामती | १८ ते २० एप्रिल |
| | दौंड | २२ ते २४ एप्रिल |

**सर्वसाधारण शुल्क : रु. ५०/-**

**वैशिष्ट्ये -** खेळ, योगासने, उपासना, समूहगायन, हस्तकौशल्ये, विज्ञान प्रयोग, कथाकथन, चर्चा, बौद्धिक कौशल्यांचे प्रशिक्षण, नावीन्यपूर्ण स्पर्धा, अभ्यासपूर्ण प्रकल्पभेटी, मुक्त अभिव्यक्तीला वाव.

## विज्ञान शिबिरे

**नववीत जाणारे ते बारावीपर्यंतच्या मुला-मुलींसाठी**

**कालावधी -** १० ते १८ मे २००१ - **मुलांसाठी**

१५ ते २३ मे २००१ - **मुलींसाठी**

**शुल्क -** रु. ६००/- **शिबिरस्थान -** ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

वैशिष्ट्ये - विविध विषयांमधील प्रयोग करणे, विज्ञान प्रकल्प करणे, उपकरणे तयार करणे, मूलभूत वैज्ञानिक कौशल्ये शिकणे, महत्त्वपूर्ण संशोधन संस्थांना भेटी, विविध शास्त्रज्ञ, वैज्ञानिक यांच्यासमवेत गप्पागोष्टी, शेवटचे तीन दिवस ग्रामीण भागात जाऊन विज्ञान जागृतीचे विविध कार्यक्रम करणे, ग्रामीण भागातील परंपरागत ज्ञान - शहाणपण याचे संकलन करणे

***स्वत:ची वैज्ञानिक दृष्टी कृतीतून व अनुभवातून विकसित करत अनेकांमध्ये वैज्ञानिक जागृती वाढवण्यासाठी प्रयत्न करूया. त्यासाठी शिबिरामध्ये आवर्जून सहभागी व्हा !***

## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका

विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग २००१

वयोगट : इ. ८ वी ते १० वी

| विषय | कालावधी | शुल्क |
|---|---|---|
| १. स्वयंअध्ययन (वर्ग १) | २३ एप्रिल ते २८ एप्रिल | रु. ३००/- |
| कौशल्ये (वर्ग २) | ३० एप्रिल ते ५ मे | रु. ३००/- |
| २. प्रकल्प करुया विज्ञानातील! | २३ एप्रिल ते २९ एप्रिल | रु. ४००/- |
| ३. लेखन कौशल्ये | ३० एप्रिल ते ५ मे | रु. ३००/- |
| ४. इंग्रजी संभाषण | २३ एप्रिल ते २८ एप्रिल | रु. ३००/- |

वर्ग एक व दोनसाठी इंग्रजी व मराठी माध्यमाचे स्वतंत्र वर्ग होतील तर तीन व चार फक्त मराठी माध्यमात होतील. (वर्ग रोज ३ तास होतील.)

ठळक वैशिष्ट्ये :- • खेळकर वातावरण • कृतीला प्राधान्य • गटकार्य • दृक्श्राव्य साधनांचा उपयोग • पाठपुराव्याची व्यवस्था

• अधिक माहितीसाठी संपर्क : स्वागतिका (स्वागत कक्ष) अथवा प्रा. मिलिंद नाईक (वेळ ११ ते ५), ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे २४११०३०. दूरभाष : ४४७७६९१, २४४७८०९५.

e-mail-prabodhini@vsnl.com. या शिबिरांमध्ये बाहेर गावाहून सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय प्रबोधिनीमध्ये/तर्फे होणार नाही.

## सर्व शिबिरांबाबत

*वरील सर्व शिबिरांची माहितीपत्रके व नोंदणीपत्रके मुख्य व स्थानिक केंद्रांवर १० मार्चनंतर उपलब्ध होतील. सर्वत्र प्रवेशसंख्या मर्यादित असल्याने लवकरात लवकर शुल्क भरून नावनिश्चिती करावी. ही सर्व शिबिरे ज्ञान प्रबोधिनीच्या युवक - युवती विभाग, शैक्षणिक उपक्रम संशोधिका व छात्र प्रबोधन या विभागांच्या संयुक्त प्रयत्नांनी होतील. शिबिरांची माहितीपत्रके व नोंदणीपत्रके पोस्टाने हवी असल्यास स्वत:चा नाव-पत्ता लिहिलेले व तीन रुपयांचे तिकीट लावलेले पाकीट पाठवावे.*




**संपर्क पत्ता:** संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे 411030.
(०२०) ४४७७६९१, ४४७८०९५

Book Post / **पुस्तकडाक**
**(छापील मजकूर)**

**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रु. १०/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक** : सौर ११ चैत्र, शके १९२३
१ एप्रिल २००१